रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

# कृषीवल

१९३७-२०२६ ९० वर्ष

रायगड सोमवार । दि. २८ सप्टेंबर २०२६ । अंक ११२ । पृष्ठे ८ । किंमत ५ ₹ । आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in

## रायगडमध्ये १२ ठिकाणी रोजगार महाकुंभ

**अलिबाग :** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या वतीने २९ सप्टेंबर रोजी रायगड जिल्ह्यात १२ ठिकाणी 'रोजगार महाकुंभ–महाराष्ट्र' आयोजित करण्यात आला आहे. जिल्ह्यातील नोकरी इच्छुक युवकांनी नोंदणी करून संबंधित ठिकाणी मुलाखतीसाठी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. या रोजगार मेळाव्यासाठी जिल्ह्यातील १४९ कंपन्यांनी नोंदणी केली असून एसएससी, एचएससी, आयटीआय, डिप्लोमा, इंजिनिअरिंग, फार्मसी तसेच विविध पदवीधारक उमेदवारांना रोजगार व अप्रेंटिसशिपच्या संधी पान २ वर

## भाऊचा धक्का-रेवस जलवाहतूक होणार पूर्ववत

**चिरनेर :** पावसाळी हंगामामुळे मागील चार महिन्यांपासून बंद असलेली भाऊचा धक्का–रेवस सागरी मार्गावरील प्रवासी बोट वाहतूक सेवा अखेर १ ऑक्टोबरपासून पूर्ववत सुरू करण्यात येणार आहे. या जलवाहतूक सेवेमुळे अलिबाग तसेच कोकणात ये–जा करणाऱ्या हजारो प्रवाशांची गैरसोय दूर होणार असून, प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. दरवर्षी पावसाळ्यापूर्वी २६ मेपासून भाऊचा धक्का–रेवस, मोरा–भाऊचा धक्का तसेच गेटवे मुंबई–मांडवा या सागरी मार्गांवरील प्रवासी वाहतूक खबरदारी म्हणून बंद केली जाते. सप्टेंबरपासून ही सेवा टप्प्या– पान २ वर

## वेधक

### 'दुष्काळावर विशेष अधिवेशन बोलवा'

**मुंबई :** महाराष्ट्रातील दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामीण जनतेला तातडीने मदत देण्याची मागणी केली आहे. दुष्काळाच्या प्रश्नावर सविस्तर चर्चा करून ठोस निर्णय घेण्यासाठी विधिमंडळाचे विशेष अधिवेशन बोलावावे, अशी मागणीही त्यांनी केली आहे. पावसाअभावी राज्यातील खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले असून पाणी व चाऱ्याचा प्रश्नही गंभीर होत असल्याचे पवार यांनी पत्रात नमूद केले आहे. तातडीने पंचनामे करून आर्थिक मदत देण्याची मागणीही त्यांनी केली आहे.

### सवलतीसाठी एनसीएमसी कार्ड अनिवार्य

**मुंबई :** एसटी महामंडळाच्या विविध सवलत योजनांचा लाभ घेणाऱ्या अमृत ज्येष्ठ नागरिक, ज्येष्ठ नागरिक आणि महिला प्रवाशांसाठी १ ऑक्टोबरपासून एनसीएमसी कार्ड अनिवार्य करण्यात येणार आहे. कार्ड नोंदणी व वितरणाची प्रक्रिया राज्यातील एसटी आगार आणि बसस्थानकांवर सुरू आहे. कार्डची नोंदणी केल्यानंतर मिळणाऱ्या क्यूआर कोडच्या पावतीवर ३० दिवसांपर्यंत सवलतीचे तिकीट घेता येणार आहे. वाहकाच्या ईटीएम मशीनवर पावतीवरील क्यूआर कोड स्कॅन करून ही सवलत मिळेल. दरम्यान, या कालावधीत प्रवाशांनी एनसीएमसी कार्ड ॲक्टिव्ह करून त्यात टॉप अप करणे आवश्यक आहे.

### महापौरांचा अमेरिका दौरा चर्चेत

**नवी मुंबई :** नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील यांच्या प्रस्तावित अमेरिका अभ्यास दौऱ्यावरून राजकीय चर्चा सुरू झाली आहे. या दौऱ्यासाठी सुमारे २८ लाख रुपयांच्या खर्चाला मंजुरी देण्यात आल्याचे वृत्त आहे. दुष्काळी परिस्थिती आणि पश्चिम आशियातील युद्धजन्य वातावरणाच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक निधीतून होणाऱ्या या खर्चाच्या औचित्यावर विरोधकांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. शहराच्या विकासाशी संबंधित बाबींचा अभ्यास करण्यासाठी हा दौरा प्रस्तावित असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, दौऱ्याचा नेमका कालावधी, सहभागींची संख्या, खर्चाचा तपशील आणि नवी मुंबईला अपेक्षित ठोस फायदा याबाबत अधिकृत माहिती स्पष्ट होणे आवश्यक आहे.

# आता 28 नव्हे, 30 दिवसांचा रिचार्ज!




**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

महिन्याला २८ दिवसांचा रिचार्ज करून पुन्हा पुन्हा रिचार्जच्या कटकटीत अडकणाऱ्या भारतातील कोट्यवधी मोबाईल प्रीपेड ग्राहकांसाठी मोठी आनंदाची बातमी आहे. भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरणाने (TRAI) दूरसंचार ग्राहक संरक्षण नियमांमध्ये १३वी सुधारणा जारी केली असून, ग्राहकांना अधिक वैधता कालावधीचे पर्याय उपलब्ध करून देण्याबरोबरच केवळ कॉल आणि एसएमएसची गरज असणाऱ्यांसाठी स्वतंत्र पॅक उपलब्ध करण्याची तरतूद केली आहे. त्यामुळे मोबाईल रिचार्जच्या पद्धतीत महत्त्वाचा बदल होण्याची शक्यता आहे. याबाबतच्या महत्त्वपूर्ण निर्णयाची रविवारी घोषणा करण्यात आली. त्यामुळे ग्राहकांना दिलासा मिळाला आहे.

सध्या अनेक प्रीपेड ग्राहक २८ दिवसांच्या वैधतेचे रिचार्ज करतात. परिणामी वर्षभरात १२ महिन्यांपेक्षा जास्त वेळा रिचार्ज करण्याची वेळ येते. ३० दिवसांच्या वैधतेचा पर्याय उपलब्ध पान २ वर

२८ दिवसांच्या वैधतेमुळे अनेक ग्राहकांना वर्षभरात १३ वेळा रिचार्ज करावा लागू शकतो. ३० दिवसांचा पर्याय प्रत्यक्ष उपलब्ध झाल्यास वर्षातील रिचार्जची संख्या १२ पर्यंत आणण्याची शक्यता निर्माण होते. त्यामुळे ग्राहकांचा वेळ, रिचार्जची वारंवारता आणि अनावश्यक खर्च याबाबतही फरक पडू शकतो.



# शेतकऱ्यांना आता जागतिक बाजारपेठ!

## रायगड जिल्हा एमपेक्स सहकारी फेडरेशनची वार्षिक सभा संपन्न

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा एमपेक्स सहकारी संस्थेचे फेडरेशन या जिल्हास्तरीय महासंघाची वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवारी मोठ्या उत्साहात आणि मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाली. जिल्ह्यातील शेतकरी आणि उद्योजकांना जागतिक बाजारपेठ मिळवून देणाऱ्या रामपेठ या महत्त्वाकांक्षी वेब पोर्टलचे उद्घाटन मा. आमदार जयंत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. पान २ वर

### रामपेठ वेब पोर्टलचे उद्घाटन

सभेतील सर्वात महत्त्वाचा क्षण म्हणजे रामपेठ या वेब पोर्टलचे लाँचिंग. मा. आमदार जयंत पाटील यांच्या हस्ते या पोर्टलचे अधिकृत उद्घाटन करण्यात आले. जिल्ह्यातील उद्योजक आणि शेतकरी यांना हक्काची मार्केटिंग सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हे पोर्टल विकसित करण्यात आले आहे.

# तटकरेंवर बाण, स्वकीयांवर वार!

- तटकरेंच्या वाढत्या प्रभावाची धास्ती दळवींना?
- शिंदे गटातील वरिष्ठांची तटकरेंसोबतची जवळीक झोंबली

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

खा. सुनील तटकरे यांच्यावर टीकेचे बाण सोडताना आमदार महेंद्र दळवींच्या वक्तव्यांचा रोख आता स्वकीय नेतृत्वाकडेही वळू लागला आहे. तटकरेंचा वाढता राजकीय प्रभाव, शिंदे गटातील वरिष्ठ नेत्यांची त्यांच्याशी वाढती जवळीक आणि महायुतीतील बदलती समीकरणे दळवींना झोंबत आहेत का? तटकरेंना विरोध करताना वारंवार स्वकीयांनाच सवाल करण्याची वेळ का येत आहे? तटकरेंच्या राजकीय प्रभावाची धास्ती की स्वतःच्या राजकीय अपेक्षांची धग भंग पावत असल्याची जाणीव दळवींना झाली असून, आपला कार्यक्रम होणार असल्याची चिंता वाढली असल्याची चर्चा सध्या सुरू आहे. त्यामुळे वरिष्ठांचे तटकरे प्रेम त्यांना झोंबले असल्याचे पान २ वर

### लोहारेतील जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्गालगत लोहारे येथील शिवराज बिअर शॉपीच्या मागे सुरू असलेल्या मोठ्या जुगार अड्ड्यावर अलिबाग पोलीस मुख्यालयाच्या आदेशानुसार शनिवारी दुपारी पोलिसांनी धाड टाकली. या कारवाईत तब्बल ४२ आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून, सुमारे १२ लाखांचा मुद्देमाल आणि १ लाख ३ हजार ९४० रुपयांची रोकड जप्त करण्यात आली.

रायगड जिल्हा परिषदेच्या लोहारे गटातील निवडणूक प्रचारादरम्यान या जुगार अड्ड्याबाबत पान २ वर

# कळंबोलीत एका रात्रीत शंभर पाण्याचे मीटर गायब

- पितळेसाठी चोरी होत असल्याचा संशय व्यक्त
- भंगार बाजारात किंमत मिळत असल्याने लक्ष्य

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

कळंबोली वसाहतीत पाणीपुरवठा करणारे सुमारे शंभर पाणीमीटर एका रात्रीत चोरीला गेल्याची माहिती समोर आली आहे. एकाच रात्री एवढ्या मोठ्या संख्येने मीटर गायब झाल्याने या चोरीमागे नियोजनबद्ध हालचाली होत्या का, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

पाणीमीटरमध्ये वापरल्या जाणाऱ्या पितळेसह इतर धातूच्या भागांना भंगार बाजारात किंमत मिळत असल्याने हे मीटर चोरीचे लक्ष्य बनले असण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे, अनेक ठिकाणी मीटर इमारतींच्या बाहेरील भागात किंवा सहज पोहोचता येईल अशा ठिकाणी बसवलेले असल्याने ते काढणे चोरट्यांना तुलनेने सोपे ठरू शकते.

एका रात्रीत सुमारे शंभर मीटर चोरीला जाणे हा मात्र महत्त्वाचा मुद्दा आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर मीटर काढण्यासाठी किती जण सहभागी होते, चोरीसाठी वाहनाचा वापर झाला का, कोणत्या भागातील मीटर लक्ष्य करण्यात आले, याचा तपास होणे गरजेचे आहे.

यापूर्वीही विविध शहरांमध्ये पाणीमीटरमधील धातूच्या भागासाठी चोरीची प्रकरणे समोर आली आहेत. त्यामुळे कळंबोलीतील घटनेतही मीटरचा धातू भंगारात विकण्यासाठी चोरी करण्यात आली का, याचा तपास पोलीस तसेच संबंधित पाणीपुरवठा यंत्रणेने करणे आवश्यक आहे. दरम्यान, चोरी झालेल्या मीटरची संख्या, नेमका परिसर आणि संबंधित यंत्रणेकडे तक्रार दाखल झाली आहे का, याबाबत अधिकृत माहिती मिळाल्यानंतर या प्रकरणाचे स्वरूप अधिक स्पष्ट होणार आहे.

### छत्तीसगडमध्ये पुराचा कहर

**नवी दिल्ली :** छत्तीसगडमध्ये झालेल्या मुसळधार पावसामुळे भामरागड तालुक्यात निर्माण झालेली पूरस्थिती रविवारी तिसऱ्या दिवशीही कायम आहे. पूर ओसरण्याचा वेग कमी असल्याने तालुक्यातील ५० हून अधिक गावांचा संपर्क तुटलेलाच आहे. पुरामुळे दूरसंचार सेवाही विस्कळीत झाली असून, आल्लापल्ली–भामरागड (राष्ट्रीय महामार्ग १३०) आणि असरअली–सोमणपल्ली (राष्ट्रीय महामार्ग ६३) हे दोन्ही मार्ग बंद आहेत. तसेच कांदोळी–दामरंचा आणि भामरागड–आरेवाडा हे प्रमुख मार्गही बंद आहेत. संभाव्य पूरस्थितीच्या पार्श्वभूमीवर प्रशासन सतर्क झाले आहे.

# अलिबाग स्थानकाची स्वच्छता कागदावरच

## सार्वजनिक स्वच्छतागृहासह परिसरात घाणीचे साम्राज्य





**प्रमोद जाधव**
**। रायगड ।**

स्वच्छतेमध्ये तृतीय क्रमांक मिळवणाऱ्या अलिबाग एसटी बसस्थानकांची स्वच्छता कागदावर अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. स्थानकाच्या परिसरात ठिकठिकाणी कचऱ्यासह गवताचे साम्राज्य निर्माण झाले आहे. स्वच्छतागृह बंद स्थितीत असून, त्या परिसरात दुर्गंधी निर्माण झाली आहे. त्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. स्वच्छतेसाठी नेमण्यात आलेल्या ठेकेदारांचे कामकाज संशयास्पद असल्याची चर्चा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

अलिबाग हे जिल्ह्याचे ठिकाण आहे. या जिल्ह्याच्या ठिकाणी एसटी महामंडळाचे आगार व स्थानक अलिबागमध्ये आहे. पान २ वर

### आगार व्यवस्थापकांचे दुर्लक्ष

अलिबाग एसटी बस स्थानकातील स्वच्छतागृहामधील अस्वच्छतेबाबत गेल्या अनेक दिवसांपासून प्रवासी वर्गाकडून तक्रारी केल्या जात आहेत. मात्र, या तक्रारीचे निराकरण करण्यास आगार व्यवस्थापक उदासीन ठरले आहेत. आगार व्यवस्थापकांकडून अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याचा आरोप प्रवासीवर्गाकडून व्यक्त केला जात आहे.

**तळ्यातील २६ बौद्ध लेण्यांकडे पर्यटन विभागाचे दुर्लक्ष | पायाभूत सुविधांचा दुष्काळ, स्थानिक रोजगाराची संधी वाया**

# २००० वर्षांचा ऐतिहासिक ठेवा विकासाच्या प्रतीक्षेत

**श्रीकांत नांदगावकर**
**। तळा ।**

रायगड म्हटले की अलिबागचे समुद्रकिनारे आणि मुरुडचा जंजिरा डोळ्यासमोर येतो. मात्र, याच रायगडच्या तळा तालुक्यात मुंबईपासून अवघ्या १३० किमी अंतरावर २६ बौद्ध लेण्यांचा तब्बल २००० वर्षांचा ऐतिहासिक ठेवा दुर्लक्षित अवस्थेत आहे. तळा शहरापासून अवघ्या ७ किमी अंतरावर राजपुरी खाडीच्या काठावर असलेल्या कुडा लेण्यांकडे पर्यटन विभागाचे दुर्लक्ष झाल्याने ऐतिहासिक वारशासोबतच स्थानिक रोजगाराची मोठी संधीही वाया जात आहे.



२०० फूट उंच डोंगरात असलेल्या या लेण्या इसवी सन पूर्व १ल्या शतकापासून ते ६व्या शतकापर्यंत सातवाहन काळात खोदल्या गेल्या. दोन स्तरांवर असलेल्या २६ लेण्यांमध्ये ४ चैत्यगृहे आणि २२ विहार आहेत. प्रवेशद्वारावरील हत्तींची भव्य शिल्पे, स्तूप, ब्राह्मी लिपीतील ३२ शिलालेख आणि ११व्या लेणीतील दुर्मिळ जलघोड्याचे (हिप्पोकॅम्पस) शिल्प ही येथील वैशिष्ट्ये आहेत. हीनयान पंथापासून महायानकडे झालेला प्रवासही येथे पाहायला मिळतो. एएसआय संरक्षित असूनही येथे मूलभूत सोयी–सुविधांचा अभाव आहे.

इंदापूर–तळा रस्ता काँक्रिटचा असला तरी लेण्यांपर्यंतचा शेवटचा १.५ किमीचा चढाव कच्चा आणि घसरडा आहे. सार्वजनिक वाहतूक नसल्याने रिक्षासाठी ४०० रुपये मोजावे लागतात. परिसरात पिण्याचे पाणी किंवा स्वच्छतागृह नाही. राहण्यासाठी एमटीडीसी रिसॉर्टही नाही. लेण्यांमध्ये वटवाघळांचा वावर पान २ वर

### स्थानिक अर्थकारणाला फटका

मुरुडला येणाऱ्या १० लाख पर्यटकांपैकी केवळ ५ टक्के पर्यटक कुडा लेण्यांकडे वळले, तरी वर्षाला ५० हजार पर्यटक आणि अडीच कोटींची उलाढाल गावात होऊ शकते. यातून २०–२५ तरुणांना स्थानिक गाईड, होमस्टे आणि गावरान जेवणाच्या व्यवसायातून रोजगार मिळू शकतो. त्यामुळे गणपतीनंतर मुंबईकडे होणारे स्थलांतरही थांबण्यास मदत होईल.

शेकाप



शेतकरी कामगार पक्ष, पुरोगामी विद्यार्थी संघटना, पुरोगामी युवक संघटना, सांस्कृतिक आघाडी यांच्या संयुक्त विद्यमाने...

स्वर्गीय मीनाक्षीताई पाटील स्मृती

भव्य रायगड जिल्हास्तरीय खुली वक्तृत्व स्पर्धा २·०·२·६

प्रथम येणाऱ्या 50 स्पर्धकांना प्रवेश दिला जाईल.

•प्रथम क्रमांक 15,001/-₹ व आकर्षक चषक
•द्वितीय क्रमांक 11,001/-₹ व आकर्षक चषक
•तृतीय क्रमांक 7,001/-₹ व आकर्षक चषक
•चतुर्थ क्रमांक 5,001/-₹ व आकर्षक चषक
•पंचम क्रमांक 3,001/-₹ व आकर्षक चषक

उतेजनार्थ प्रत्येकी 2001 ची पाच बक्षिसे व चषक

•विषय•
1) आजचा विद्यार्थी आणि उद्याचा भारत
2) रायगडचा विकास आणि जनतेची अपेक्षा
3) सत्तेच्या सिंहासनावर नव्हे, जनतेच्या हृदयात घर करणारी 'ताई', मीनाक्षीताई
4) कलम जब जागती है, तब सत्ता काँपती है
5) मजबुती का नाम महात्मा गांधी
6) जखमी लोकशाहीच्या कपाळावर आशेचे कुंकू लावतीय मी

•संपर्क•
वेदांत कंटक मो. 8329775531
हर्ष ढवळे मो. 9730817227

वार: शनिवार 3 ऑक्टोबर 2026 रोजी
ठिकाण: शेतकरी भवन, अलिबाग
वेळ: सकाळी 9.00 वाजता

स्पर्धेचे नियम व अटी

१. स्पर्धा फक्त मराठी भाषेतून असेल.
२. प्रत्येक स्पर्धकाला आपले विचार मांडण्यासाठी ४ + २ अशी सहा मिनिटे देण्यात येतील.
३. सदर स्पर्धा दर्जेदार व स्पर्धकांमध्ये स्पर्धेची शिस्त आणि स्पर्धेचे गांभीर्य राहावे यासाठी प्रत्येक स्पर्धकाकडून १०० रुपये प्रवेश फी घेतली जाईल.
४. प्रत्येक स्पर्धकाला उत्तम दर्जाचा सकाळचा चहा व नाश्ता, दुपारचे जेवण व संध्याकाळी चहा व नाश्ता आयोजकांतर्फे देण्यात येईल.
५. सदर स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील १२ वर्षांपासून पुढे कोणताही स्पर्धक सहभागी होऊ शकतो.
६. स्पर्धक रायगड जिल्ह्यातील असावा, व यासाठी त्याचे आधार कार्ड व अन्य रहिवासी कागदपत्र तपासली जातील. तपासणी दरम्यान जर स्पर्धक जिल्ह्याच्या बाहेरचा आढळला तर त्याला तिथल्या तिथे बाद करण्यात येईल.
७. कोणतेही बक्षीस विभागून दिले जाणार नाही.
८. सदर स्पर्धेसाठी उत्तम दर्जाचे आणि पारदर्शी परीक्षक असल्याने परीक्षकांचा निर्णय हा अंतिम असेल.
९. स्पर्धेच्या ठिकाणी कोणतीही गैरवर्तणूक केल्यास त्या स्पर्धकाला स्पर्धेतून बाद करण्यात येईल व त्याचबरोबर आयुष्यभर या स्पर्धेत पुन्हा प्रवेश मिळणार नाही.
१०. ऐनवेळी काही बदल असल्यास आयोजन समिती ते बदल करू शकते.
११. प्रथम येणाऱ्या ५० स्पर्धकांना प्रवेश दिला जाईल.

# शेकाप जिल्हा चिटणीस मंडळ सदस्यपदी राजेश कासारे



। माणगाव । प्रतिनिधी ।

भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस तथा माजी आमदार जयंत पाटील यांच्या आदेशानुसार माणगाव तालुक्यातील पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते राजेश शांताराम कासारे यांची शेकापच्या रायगड जिल्हा चिटणीस मंडळ सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाचे जिल्हा चिटणीस सुरेश खैरे यांनी ही नियुक्ती केली असून, कासारे यांना जयंत पाटील व सुरेश खैरे यांच्या स्वाक्षरीचे अधिकृत नियुक्तीपत्र देण्यात आले. त्यांच्या नियुक्तीचे सर्व स्तरांतून स्वागत होत असून, कार्यकर्त्यांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

राजेश कासारे हे माणगाव तालुक्यात शेतकरी कामगार पक्षाचे निष्ठावंत व प्रामाणिक कार्यकर्ते म्हणून परिचित आहेत. गेल्या १७ वर्षांपासून ते पक्षाचे काम सातत्याने करीत आहेत. माजी आमदार जयंत पाटील यांचे विश्वासू कार्यकर्ते म्हणूनही त्यांची ओळख आहे. तालुक्यात पक्षाची संघटनात्मक बांधणी मजबूत करण्यासाठी त्यांनी सातत्याने योगदान दिले आहे.

शेकापची ध्येय-धोरणे आणि विचारधारा तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी कासारे यांनी विविध उपक्रमांतून काम केले आहे. गोरगरीब, कष्टकरी, शेतकरी आणि सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांना केंद्रस्थानी ठेवून त्यांनी पक्षाचे संघटन वाढविण्यासाठी प्रयत्न केले आहेत.

नवीन जबाबदारी मिळाल्यानंतर राजेश कासारे यांनी पक्ष नेतृत्वाचे आभार व्यक्त केले. ते म्हणाले, ''पक्ष नेतृत्वाने माझ्यासारख्या छोट्या कार्यकर्त्यावर विश्वास दाखवून जिल्ह्यावर काम करण्याची संधी दिली आहे. या विश्वासाला कुठेही तडा जाऊ न देता आजपर्यंत ज्या पद्धतीने पक्षाचे काम केले, त्याच पद्धतीने यापुढेही जोमाने काम करेन.''

जिल्हा चिटणीस मंडळ सदस्यपदी झालेल्या या नियुक्तीमुळे माणगाव तालुक्यातील शेकाप कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, कासारे यांच्या माध्यमातून जिल्ह्यात पक्ष संघटन मजबूत करण्याच्या अपेक्षा व्यक्त होत आहेत.

# नळपाणी योजना संकटात

## उल्हास नदीच्या गढूळ पाण्यामुळे डोकेदुखी

। नेरळ । प्रतिनिधी ।

उल्हास नदीच्या पाण्यावर अवलंबून असलेल्या नळपाणी योजना या सध्या संकटात आल्या आहेत.मावळात झालेली ढगफुटी मुळे गेली काही दिवस उल्हास नदीचे पाणी गढूळ बनले आहे. या गढूळ पाण्यामुळे नळाद्वारे जाणारे पाणीदेखील गढूळ जात असून, गढूळ पाणी मोठी समस्या बनली आहे.

मागील काही दिवस मावळात आणि कर्जत तालुक्याच्या डोंगर भागात ढगफुटीसदृश्य पाऊस होत आहे. त्याचा मोठा परिणाम उल्हास नदीचे पाणी गढूळ झाले आहे. ढगफुटीसदृश्य पावसामुळे नदीचे पाणी गढूळ झाले असून, प्रामुख्याने डोंगर रांगेत अशा प्रकारची ढगफुटी होताना दिसत आहे. कर्जत तालुक्यात तीन-चार ठिकाणी अशी ढगफुटी शेतकऱ्यांनी अनुभवली असून, ढगफुटीसदृश्य पावसामुळे नद्यांमधून वाहात



येणारे पाणी हे गढूळ बनते.त्यात कर्जत येथून पुढे ठाणे जिल्ह्यात जाणारी उल्हास नदी गढूळ पाण्यामुळे प्रसिद्ध झाली आहे. सर्वत्र गढूळ पाण्याची चर्चा सुरू असून, कर्जत तालुक्यातील बहुतांश नळपाणी योजना या उल्हास नदीच्या पाण्यावर अवलंबून आहेत. या नळपाणी योजनांमधून नळाद्वारे घरोघरी जाणारे पाणी गढूळ जात असल्याने गढूळ पाण्याची मोठी समस्या आहे.

माथेरान आणि नेरळ सारख्या मोठ्या नळपाणी योजना उल्हास नदीच्या पाण्यावर असून, कर्जत शहराची नळपाणी योजना पेज नदीवर अवलंबून आहे असून, मोठ्या नळपाणी योजना यांच्या जलशुद्धीकरण केंद्र कार्यान्वित असून, गढूळ पाण्याची समस्या काही प्रमाणात कमी आहे. मात्र, तालुक्यातील ग्रामीण भागातील नळपाणी योजना यांच्याकडे जलशुद्धीकरण केंद्राचा अभाव आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील जनतेला पिण्याच्या पाण्यासाठी अनेक उपाय अवलंबवावे लागत आहेत. ही बाब जनतेच्या आरोग्यासाठी धोकादायक बनली आहे. त्यामुळे उल्हास नदीच्या गढूळ पाण्यावर जनतेला आपल्या आरोग्यासाठी पुढाकार घ्यावा लागणार आहे. गढूळ पाणी ही संपूर्ण कर्जत तालुक्यासाठी समस्या बनली असून, शेतकरी एका-एका भागात होत असलेल्या पावसापेक्षा जोरदार पावसाच्या प्रतीक्षेत आहे.

# बँक व्यवहार उरकण्यासाठी रविवारीच ग्राहकांची धावपळ

## तीन दिवसांच्या संपामुळे परिणाम होण्याची शक्यता

। खांदेश्वर । प्रतिनिधी ।

बँक कर्मचारी संघटनांनी विविध प्रलंबित मागण्यांसाठी सोमवारपासून तीन दिवसांचा देशव्यापी संप पुकारल्याने त्याचा परिणाम होण्याच्या भीतीने रविवारीही ग्राहकांनी बँकांच्या शाखांकडे धाव घेतली. सलग सुट्ट्या आणि त्यानंतर तीन दिवस शाखा व्यवहार बंद राहण्याची शक्यता असल्याने महत्त्वाचे आर्थिक व्यवहार उरकण्यासाठी सकाळपासूनच सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमध्ये ग्राहकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली.



२८ ते ३० सप्टेंबरदरम्यान बँक कर्मचारी संपावर जाणार आहेत. त्यापूर्वी २६ सप्टेंबरला चौथा शनिवार आणि २७ सप्टेंबरला रविवारची सुटी असल्याने बँकांच्या प्रत्यक्ष शाखा सेवा सलग अनेक दिवस प्रभावित होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पैसे काढणे, रोख रक्कम जमा करणे, धनादेश व्यवहार तसेच खातेविषयक महत्त्वाची कामे पूर्ण करण्यासाठी ग्राहकांनी रविवारीच बँक गाठली.

युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन्सच्या नेतृत्वाखाली हा संप पुकारण्यात आला आहे. बँक कर्मचाऱ्यांसाठी पाच दिवसांचा कामकाजाचा आठवडा लागू करावा, तसेच कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर निर्णय घ्यावा, अशा प्रमुख मागण्या संघटनांनी केल्या आहेत. कामगिरीशी संबंधित प्रोत्साहन योजनेबाबतही संघटनांनी आक्षेप नोंदवला होता. सरकारने ही योजना तूर्तास स्थगित ठेवली आहे.

संपाच्या काळात सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या शाखांमधील रोख रक्कम जमा करणे, पैसे काढणे, धनादेश वटविणे, खातेविषयक कामकाज यांसारख्या प्रत्यक्ष सेवांवर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी अत्यावश्यक बँकिंग व्यवहार शक्यतो संपापूर्वीच पूर्ण करण्यास प्राधान्य दिले. दरम्यान, एटीएम, यूपीआय, इंटरनेट बँकिंग आणि मोबाइल बँकिंग यांसारख्या डिजिटल सेवा सुरू राहण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे प्रत्यक्ष शाखेतील व्यवहारांऐवजी नागरिकांकडून ऑनलाइन आणि डिजिटल बँकिंगचा अधिक वापर होण्याची शक्यता आहे.

# मुख्य निवडणूक आयुक्तांच्या राजीनाम्याची मागणी

## उरणच्या गांधी चौकात माकप, जनसंघटनांची निदर्शने

। उरण । प्रतिनिधी ।

देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा द्यावा, तसेच मतदार यादीतील विशेष गहन पुनरीक्षण (एसआयआर) प्रक्रिया रद्द करावी, या मागण्यांसाठी रविवारी उरणच्या गांधी चौकात मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष व विविध जनसंघटनांच्या वतीने जोरदार निदर्शने करण्यात आली. एसआयआर प्रक्रियेवरून देशभरात राजकीय वाद सुरू असून, डाव्या पक्षांनीही ज्ञानेश कुमार यांच्या पदावरून हटवण्याची मागणी केली आहे.




यावेळी ''ज्ञानेश कुमार राजीनामा द्या'', ''एसआयआर रद्द करा'', ''वगळण्यात आलेली मतदारांची नावे पुन्हा यादीत समाविष्ट करा'' अशा घोषणा देण्यात आल्या. माकप, सीआयटीयू, जनवादी महिला संघटना, किसान सभा आणि डीवायएफआयचे कार्यकर्ते आंदोलनात सहभागी झाले.

माकपचे रायगड जिल्हा सचिव कॉ. रामचंद्र म्हात्रे, कामगार नेते भूषण पाटील, संजय ठाकूर, हेमलता पाटील, शेकापचे रवी घरत, शशी यादव यांनी यावेळी मार्गदर्शन केले. निवडणूक प्रक्रियेबाबत उपस्थित केलेल्या आक्षेपांची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी आंदोलकांनी केली.

# एक्स्प्रेस तातडीची साखळी ओढून थांबवली

### वेळेत उपचार मिळाल्याने बालकाला जीवनदान

। कर्जत । प्रतिनिधी ।

इंद्रायणी एक्स्प्रेस थांबवून बालकावर उपचार वेळेवर मिळाल्याने या बालकाची प्रकृती स्थिर झाली. कर्जत येथे रक्षा सामाजिक संस्थेचे कार्यकर्ते वेळेत पोहचल्याने मोठी दुर्घटना टळली असून, वेळेवर वैद्यकीय मदत मिळाल्याने तीन वर्षीय बालकाचा जीव वाचला आहे.

मुंबई येथून पुण्याकडे जाणाऱ्या इंद्रायणी एक्स्प्रेसमधून प्रवास करणाऱ्या तीन वर्षीय बालकाची प्रकृती अचानक बिघडल्याने कर्जतजवळ साखळी ओढून रेल्वे थांबवण्यात आली. उल्हासनगर येथील प्रतिभा नागनाथ फुंदे या आपल्या तीन वर्षीय मुलगा यश आणि भावासह पुण्याकडे प्रवास करीत होत्या. कर्जत स्थानक काही सोडल्यानंतर मिनिटांतच यशला तापामुळे फिट आली आणि तो बेशुद्ध झाला. गाडीत प्रवास करणाऱ्या रक्षा सामाजिक संस्थेचे सदस्य भूषण हजारे यांनी प्रसंगाचे गांभीर्य ओळखून कर्जत स्थानकातून गाडी पुढे पुण्याकडे जात असताना स्थानकाच्या काही मीटर बाहेर गुंडगेजवळ साखळी ओढून रेल्वे थांबविली. रेल्वे नोंदीनुसार सकाळी ७.४५ ते ७.५५ या वेळेत ही कारवाई झाली. त्यानंतर राहुल गुप्ता यांच्या मदतीने यश यास तात्काळ कर्जत शहरातील डॉ. जैन यांच्या रुग्णालय दाखल करण्यात आले.

# नवी मुंबई सुवर्णकार विकास मंडळाची त्रैमासिक सभा संपन्न

। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।

नवी मुंबई सुवर्णकार विकास मंडळाची त्रैमासिक सभा शनिवार, दि. २६ सप्टेंबर रोजी नवीन पनवेल येथे संपन्न झाली. मंडळाचे अध्यक्ष अनुपस्थित असल्याने उपाध्यक्ष हेमकांत पुरुषोत्तम सोनार यांनी अध्यक्षस्थान भूषविले. सभेच्या प्रारंभी सुवर्णकार समाजाचे आराध्य



दैवत श्री संत नरहरी सोनार महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पहार अर्पण व दीपप्रज्वलन करण्यात आले. मंडळाचे सचिव विजय भामरे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी मागील सभेचा आढावा घेण्यात आला तसेच सभेच्या पत्रिकेवरील विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.

यावेळी युवक अध्यक्ष चंद्रकांत विसपुते, महिला मंडळाच्या अध्यक्षा संगिता धनराज विसपुते, ज्येष्ठ सदस्य उदय विभांडिक, सहसचिव मनोज सोनार, सहकोषाध्यक्ष मिलिंद खरोटे, योगेश रणधीर, डॉ. सिद्धार्थ सोनार, रेखा भामरे आदी उपस्थित होते.

पान १ वरुन

## रायगडमध्ये १२ ठिकाणी रोजगार महाकुंभ

उपलब्ध होणार आहेत. उमेदवारांना ''महास्वयम् रोजगार पोर्ट'' (https://rojgar.mahaswayam.gov.in?utm_source=chatgpt.com) वर नोंदणी करून ऑनलाइन अर्ज करता येणार आहे. मेळाव्यापूर्वी उमेदवारांना सीव्ही तयार करणे, व्यक्तिमत्त्व विकास, मुलाखत कौशल्य, संवाद कौशल्य व मॉक इंटरव्ह्यू याबाबत १६ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमार्फत मोफत प्रशिक्षण देण्यात आले आहे.नवीन पनवेल, लोणेरे, खारघर, पाली, कर्जत, रोहा, खोपोली, कामोठे, पेण, अलिबाग आदी १२ ठिकाणी रोजगार मेळावे होणार आहेत. जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## आता २८ नव्हे, ३० दिवसांचा रिचार्ज!

झाल्यास ग्राहकांना महिन्याच्या हिशोबाने रिचार्ज करण्याची सुविधा मिळू शकते. म्हणजेच २८ दिवसांच्या चक्राऐवजी पूर्ण महिन्याच्या कालावधीशी जुळणारा पर्याय ग्राहकांसाठी उपलब्ध होणार आहे. नव्या नियमांचा आणखी एक महत्त्वाचा भाग म्हणजे केवळ आवाजातील कॉल आणि एसएमएसची गरज असलेल्या ग्राहकांसाठी स्वतंत्र विशेष दराचे पॅक उपलब्ध करून देणे. ज्या वैधता कालावधीसाठी कॉल, एसएमएस आणि इंटरनेट डेटा असलेले विशेष पॅक उपलब्ध असतील, त्याच वैधता कालावधीसाठी केवळ कॉल आणि एसएमएसचे पॅकही उपलब्ध करून देण्याची तरतूद करण्यात आली आहे. अशा पॅकच्या दरात डेटाची सुविधा नसल्याने त्यानुसार मोठ्या प्रमाणात प्रमाणबद्ध कपात करण्याची तरतूद आहे.

याचा फायदा विशेषतः इंटरनेट डेटाचा फारसा वापर न करणाऱ्या ग्राहकांना होऊ शकतो. ज्येष्ठ नागरिक, साधा मोबाईल वापरणारे ग्राहक, फक्त फोनवर बोलणे किंवा एसएमएससाठी मोबाईल वापरणारे ग्राहक यांना आपल्या गरजेनुसार पॅक निवडण्याचा पर्याय मिळणार आहे. एकूणच, ३० दिवसांच्या वैधतेचा पर्याय आणि केवळ कॉल-एसएमएससाठी स्वतंत्र पॅक यामुळे प्रीपेड ग्राहकांना आपल्या वापरानुसार रिचार्ज निवडण्याची अधिक मुभा मिळणार आहे.

**रिचार्जमध्ये ग्राहकांना पर्याय**

नव्या व्यवस्थेमुळे ग्राहकांना गरज नसलेल्या डेटासाठी पैसे मोजण्याची आवश्यकता कमी होऊ शकते. कॉल, एसएमएस आणि इंटरनेट डेटा या तिन्ही सेवांचा वापर करणाऱ्या ग्राहकांसाठी नेहमीचे एकत्रित पॅक उपलब्ध राहतील; तर केवळ कॉल आणि एसएमएसची गरज असणाऱ्यांसाठी स्वतंत्र पर्याय उपलब्ध होतील. त्यामुळे ग्राहकांना आपल्या वापरानुसार रिचार्ज निवडता येणार आहे. TRAIने या बदलाचा मसुदा ७ एप्रिल २०२६ रोजी प्रसिद्ध करून संबंधितांकडून अभिप्राय मागवला होता. त्यानंतर २२ सप्टेंबर २०२६ रोजी 'दूरसंचार ग्राहक संरक्षण (१३वा सुधारणा) नियम, २०२६' अधिकृतपणे जारी करण्यात आले.

**नियमांची अंमलबजावणी महत्त्वाची**

TRAIने नियम जारी केले असले तरी प्रत्यक्षात विविध दूरसंचार कंपन्या हे पर्याय कशा प्रकारे उपलब्ध करून देतात, त्यांच्या किंमती किती असतात आणि ग्राहकांना हे पॅक किती सहज उपलब्ध होतात, हे महत्त्वाचे ठरणार आहे. त्यामुळे नव्या नियमांचा प्रत्यक्ष फायदा ग्राहकांपर्यंत पोहोचण्यासाठी कंपन्यांकडून त्याची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.

## शेतकऱ्यांना आता जागतिक बाजारपेठ!

हे या सभेचे मुख्य आकर्षण ठरले.या वार्षिक सभेला प्रमुख पाहुणे म्हणून माजी आमदार जयंत पाटील यांची विशेष उपस्थिती होती. त्यांच्यासोबत रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे उपाध्यक्ष सुरेश खेरे, बँकेचे सर्व संचालक मंडळ आणि मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित होते. या सभेचे अध्यक्षपद रामपेठचे अध्यक्ष निनाद पाटील यांनी भूषवले.

सभेच्या सुरुवातीला संस्थेच्या मागील आर्थिक वर्षाचा लेखाजोखा मांडण्यात आला आणि वार्षिक अहवालाचे वाचन करण्यात आले. गेल्या वर्षभरात संस्थेने यशस्वीपणे राबवलेल्या गोदाम सेवा, कर्मचारी प्रशिक्षण सेवा, मनुष्यबळ सेवा आणि डाटा सेवा या सर्व आघाड्यांवरील कामकाजाचा विस्तृत आढावा यावेळी सभासदांसमोर ठेवण्यात आला.

सभासदांना मार्गदर्शन करताना मंदार वर्तक यांनी सहकार चळवळीची पुढील दिशा स्पष्ट केली. जिल्हा मध्यवर्ती बँकेची महत्त्वाची भूमिका आणि रामपेठच्या माध्यमातून ही बँक कशा प्रकारे जिल्ह्याच्या विकासाला गती देणार आहे, याची सविस्तर मांडणी त्यांनी आपल्या भाषणात केली.

प्रमुख पाहुणे मा. आमदार जयंत पाटील यांनी आपल्या अभ्यासपूर्ण भाषणात संपूर्ण रामफेडच्या कामकाजाचे सविस्तर विवेचन केले. ही संस्था आगामी काही वर्षांत जिल्ह्याच्या विकासात फार मोठे योगदान देईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच, संस्थेच्या भविष्यातील कामकाजात कशा प्रकारे विविधता असणार आहे आणि संस्था कोणकोणत्या नवीन क्षेत्रात पाऊल ठेवणार आहे, याचेही मार्गदर्शन त्यांनी केले.

**जगभरात विकता येणार शेतमाल**

या डिजिटल सुविधेमुळे आता रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना आपला शेतमाल थेट जगातल्या कुठल्याही ग्राहकाला विकता येणार आहे. शेतकऱ्यांना मध्यस्थांशिवाय जागतिक बाजारपेठेशी जोडणारी ही एक अत्यंत नाविन्यपूर्ण पद्धत विकसित करण्याचा यशस्वी प्रयत्न या माध्यमातून करण्यात आला आहे. यामुळे जिल्ह्यातील कृषी व उद्योग क्षेत्राला मोठी चालना मिळेल, अशी आशा व्यक्त करत या सभेची सांगता झाली.

## लोहारेतील जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा

विधानपरिषदेचे भाजपा गटनेते प्रवीण दरेकर यांनी जाहीर सभेत टीका केली होती. मात्र, त्यानंतरही जुगार अड्डा सुरूच असल्याची चर्चा होती. त्यामुळे या कारवाईकडे पोलिसांच्या हालचाली म्हणून पाहिले जात आहे.

शनिवारी दुपारी सव्वातीनच्या सुमारास पोलिसांनी छापा टाकला. यावेळी माणगाव, लोणेरे, टेमपाले, गारळ, उणेगाव, गोरेगाव, शिरगाव, महाड, पोलादपूर आणि वाडा-कुंभरोशी परिसरातील ४२ जण जुगार खेळताना आढळून आले. पोलिसांनी त्यांच्या अंगझडतीतून ३० मोबाईल, तीन मोटारसायकली, दोन वॅगनआर कार, प्लास्टिक कॉइन्स, जुगाराचे साहित्य व फर्निचर, तसेच रोकड असा मुद्देमाल जप्त केला.रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आँचल दलाल यांच्या आदेशानुसार व म्हसळा परिमंडळाच्या पोलीस उपअधीक्षक योगिता कुंटे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. ३८ आरोपी प्लास्टिक कॉइन्सच्या माध्यमातून तीन पत्तीचा जुगार खेळताना, तर चार जण जुगारासाठी जागा व साहित्य उपलब्ध करून देताना आढळले. याप्रकरणी पोलादपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.दरम्यान, गणेश विसर्जन मिरवणुकीच्या तयारीत पोलादपूर पोलीस व्यग्र असताना ही कारवाई झाल्याने आरोपींना पोलीस ठाण्यात आणणे आणि गुन्हा दाखल करण्याच्या प्रक्रियेमुळे विसर्जन मिरवणूक तब्बल साडेतीन तास उशिराने सुरू झाली.

## तटकरेंवर बाण, स्वकीयांवर वार!

आरोप राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी नाव न देण्याच्या अटीवर सांगितले आहे.कोकणची विधान परिषदेची हक्काची जागा वरिष्ठांच्या आदेशानुसार राष्ट्रवादी काँग्रेसला देण्यात आली. महाराष्ट्रात शिंदे सेनेच्या पाच जागा असताना कोकणची जागा सोडावी लागली, हे कोकणवासियांचे दुर्दैव असल्याचे दळवींनी म्हटले. या निर्णयात मंत्री उदय सामंत यांची भूमिका महत्त्वाची होती आणि त्यांचे तटकरे कुटुंबियांवरील 'प्रेम' उतू आले होते, अशी टीकाही त्यांनी केली.पण, प्रश्न एवढ्यावरच थांबत नाही. तटकरेंशी स्वकीय नेत्यांची जवळीक वाढत असताना दळवींचा संताप नेमका कुणावर आहे? तटकरेंवर की आपल्या पक्षातील वरिष्ठांवर? कारण, तटकरेंच्या घरी गणपती दर्शनासाठी गेलेल्या मंत्री भरत गोगावले यांच्याबाबतही दळवींनी नाराजी व्यक्त केली होती. त्यामुळे 'तटकरेंशी जवळीक साधणारे स्वकीयही दळवींच्या निशाण्यावर' असे चित्र निर्माण झाले आहे.कोकणची विधान परिषद जागा राष्ट्रवादीकडे गेल्यानंतर दळवींची नाराजी सातत्याने समोर आली. त्यांच्या कन्या जुईली दळवी यांच्या उमेदवारीचा मुद्दाही याच संघर्षाच्या केंद्रस्थानी होता. अखेरीस अनिकेत तटकरे महायुतीचे उमेदवार झाले आणि बिनविरोध निवडून आले. या संपूर्ण घडामोडीत तटकरेंचा राजकीय प्रभाव पुन्हा अधोरेखित झाला.

मग दळवींच्या मनात नेमकी सल कोणती? कोकणची जागा गेल्याची? तटकरेंच्या वाढत्या प्रभावाची? की आपल्याला अपेक्षित असलेली राजकीय संधी हुकल्याची? राजकारणात पदे आणि संधी बदलत असतात; पण दळवींच्या वक्तव्यांमधून वारंवार 'आम्हाला न्याय मिळाला नाही' हा सूर उमटत असल्याने त्यामागे आणखी काही राजकीय गणित आहे का, असा सवाल उपस्थित होत आहे.महायुतीच्या निर्णयप्रक्रियेत तटकरेंचे राजकीय वजन वाढताना दिसत असताना शिंदे गटातील काही वरिष्ठ नेत्यांशी त्यांचे संबंधही अधिक सलोख्याचे होताना दिसत आहेत. भरत गोगावले यांची तटकरेंच्या घरी झालेली गणेशोत्सवातील भेट त्याचे ताजे उदाहरण ठरली. या पार्श्वभूमीवर दळवींची अस्वस्थता आणखी चर्चेचा विषय ठरत आहे.

तटकरेंवर हल्ला चढवताना स्वकीयांवरच प्रश्न उपस्थित करण्याची वेळ का येते? वरिष्ठ नेते तटकरेंच्या जवळ जात असतील तर त्याची दळवींना एवढी खंत का? दळवींचे राजकीय म्हणणे ऐकून घेणारे कमी झाले आहेत का? की तटकरेंच्या वाढत्या राजकीय प्रभावामुळे आपल्या राजकीय वजनावर परिणाम होईल, अशी धास्ती निर्माण झाली आहे?

रायगडच्या राजकारणात हे प्रश्न आता उघडपणे चर्चिले जात आहेत. तटकरेंवर बाण सोडताना प्रत्येक वेळी स्वकीयांनाच चिमटा बसत असेल, तर या राजकीय नाराजीचा खरा निशाणा तटकरे की स्वतःचेच नेतृत्व? याचे उत्तर दळवींच्याच पुढील भूमिकेतून स्पष्ट होणार आहे. तोपर्यंत कोणी विचारात घेत नसला तरी हा थयथयाट असाच सुरू राहणार की काय, याविषयी चर्चेला उधाण आले आहे.

## अलिबाग स्थानकाची स्वच्छता कागदावरच

अलिबाग आगारात अडीचशेहून अधिक कर्मचारी आहेत. त्यामध्ये दीडशेहून अधिक चालक व वाहकांचा समावेश आहे. स्थानकात ६८ एसटी बसेस असून, एसटीला महिन्यातून सुमारे पाच कोटी रुपयांचे उत्पन्न मिळते. अलिबाग तालुक्यासह अनेक भागातील हजारो प्रवासी एसटीतून प्रवास करतात. वेगवेगळ्या विभागातील जिल्हा व तालुका शासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालये आहेत. नोकरीबरोबरच शिक्षणासाठी अलिबागमध्ये येणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. पर्यटकांची ओघही अलिबागमध्ये प्रचंड आहे. नियमित कामाला येणारे प्रवासी, पर्यटक, विद्यार्थी एसटी बसमधून प्रवास करणाऱ्यावर अधिक भर देतात. प्रवाशांना चांगली सुविधा मिळावी, म्हणून स्थानकाच्या परिसरात सामाजिक बांधिलकीतून स्वच्छतागृह उभारले आहे. लाखो रुपये खर्च करून हे स्वच्छतागृह मागील काही वर्षांपूर्वी बांधले आहे. स्थानक स्वच्छ व सुंदर दिसावे यासाठी एसटी महामंडळाने एका खासगी कंपनीला ठेका दिला आहे. या कंपनीमार्फत अलिबाग स्थानकाची स्वच्छताराखली जाते. मात्र, स्थानकाच्या आवारातच ठिकठिकाणी कचऱ्याचे साम्राज्य आहे. स्थानकाच्या आवारात असलेल्या हिरकणी कक्षाच्या बाजूलाच कचऱ्याचा ढिगारा पडलेला असतो. स्थानकामधील स्वच्छतागृहाची अवस्था दयनीय झाली आहे. स्वच्छतागृहाच्या परिसराला गवत, झुडपांनी विळखा घातला आहे. स्वच्छतागृहातील अनेक साहित्य तुटलेल्या अवस्थेत आहेत. स्वच्छतागृहाच्या बाजूने फिरकणाऱ्यांना नाक दाबून प्रवास करावा लागत आहे. गेली अनेक दिवसांपासून हे स्वच्छतागृह बंद स्थितीत आहे. त्यामुळे त्याची अवस्था अधिकच बिकट झाली आहे. अलिबाग स्थानकाच्या परिसरातील कोपऱ्यात गेल्या अनेक वर्षांपासून असलेल्या स्वच्छतागृहात जाणे नकोसे झाले आहे. दुर्गंधीबरोबरच साचलेल्या सांडपाण्यामुळे आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. अलिबागसह अन्य स्थानकाच्या स्वच्छतेसाठी प्रवाशांकडून दोन रुपये स्वच्छता भार कराच्या रुपात एसटी महामंडळाकडून घेतला जातो. कर घेऊनही अलिबाग स्थानकात स्वच्छतेचे तिनतेरा अशी परिस्थिती आहे.

स्वच्छतागृहातील स्वच्छतेसह दुरुस्तीच्या कामासाठी संबंधित कामगारांना सांगण्यात आले आहे. मात्र, त्यांच्याकडून काम वेगात न झाल्याने प्रवाशांची गैरसोय होत आहे. मात्र, तातडीने हे काम करून घेतले जाईल.

– राकेश देवरे, आगार व्यवस्थापक

**हिरकणी कक्षाला गवताचा विळखा**

अलिबाग एसटी बस आगारात महिलांसाठी हिरकणी कक्ष उभारण्यात आले आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून हे कक्ष बंद स्थितीत आहे. त्यामुळे या हिकरणी कक्षाच्या बाजूला गवत वाढले असून, हे कक्ष वाहन पार्किंगचे केंद्र बनले आहे. आगारात वेगवेगळी सुरक्षा यंत्रणा असतानाही याकडे मात्र अक्षम्य दुर्लक्ष असल्याचे दिसून आले आहे.

## २००० वर्षांचा ऐतिहासिक ठेवा विकासाच्या प्रतीक्षेत

असून पाणी गळतीमुळे शिल्पांची झीज होत आहे. गुगल मॅपवर चुकीचे लोकेशन आणि सोशल मीडियावर माहितीचा अभाव असल्याने पर्यटक येथे पोहोचत नाहीत.जिल्हा पर्यटन आराखड्यात कुडा लेण्यांचा उल्लेखही नाही. पर्यटनाचा सर्व निधी अलिबाग-काशिद-मुरुडपुरताच मर्यादित असल्याने तळा तालुक्यातील या ऐतिहासिक ठेव्याकडे दुर्लक्ष होत आहे.लेण्यांपर्यंतच्या रस्त्याचे काँक्रिटीकरण, पायऱ्या व रेलिंग, स्वच्छतागृहांची सुविधा आणि तळागड-कुडा लेणी असे एकत्रित पर्यटन सर्किट विकसित केल्यास तळा तालुका रायगडच्या पर्यटन नकाशावर येऊ शकतो.

## भाऊचा धक्का-रेवस जलवाहतूक होणार पूर्ववत

टप्प्याने सुरू करण्यात येते. मोरा-भाऊचा धक्का आणि गेटवे मुंबई-मांडवा मार्गावरील वाहतूक यापूर्वीच सुरू झाली आहे. मात्र, सतत बदलणाऱ्या हवामानामुळे भाऊचा धक्का-रेवस मार्गावरील प्रवासी बोट सेवा सुरू करण्यात आली नव्हती.आता सागरी वाहतुकीसाठी वातावरण अनुकूल झाल्याने ही सेवा १ ऑक्टोबरपासून सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या मार्गावरील प्रवासाचे तिकीट १०० रुपये आहे. भाऊचा धक्का येथून सकाळी ६.३० वाजता पहिली बोट सुटणार असून, त्यानंतर ८, १०, १२, दुपारी ४ आणि ५ वाजता बोटी सुटणार आहेत.मात्र, हवामानातील बदल किंवा समुद्र खवळल्यास सुरक्षिततेच्या दृष्टीने वेळापत्रकात बदल करण्यात येऊ शकतो, अशी माहिती मुंबई जलवाहतूक संस्थेचे सेक्रेटरी शराफत मुकादम यांनी दिली. चार महिन्यांनंतर सुरू होणाऱ्या या जलवाहतुकीमुळे अलिबागसह कोकणात जाणाऱ्या प्रवाशांची मोठी गैरसोय दूर होणार आहे.

# टक्केवारीच्या कारभारात श्रीवर्धनकर तहानलेलेच

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या राज्याच्या अधिकृत दुष्काळी यादीत संपूर्ण रायगड जिल्ह्यातून केवळ श्रीवर्धन तालुक्यावर कृत्रिम दुष्काळाचे भीषण संकट घोंगावत आहे. निसर्गाने भरभरून देऊनही श्रीवर्धनकरांना पाण्यासाठी वणवण का करावी लागणार आहे? या संतप्त प्रश्नाने सध्या श्रीवर्धन तालुक्यात प्रशासनाविरोधात संतापाची लाट उसळली आहे. या भीषण परिस्थितीमागे कोट्यवधी रुपये खर्चून राबवण्यात आलेली रानवली धरण नळ पाणी योजना आणि त्यामध्ये झालेला अवाढव्य भ्रष्टाचार हेच खरे कारण असल्याचे बोलले जात आहे. तसेच, लोकप्रतिनिधींच्या टक्केवारीच्या कारभाराने या योजनेचा पुरता फाज्जा उडाल्याचे देखील बोलले जात आहे.

भारतीय हवामान खात्याच्या आणि जिल्हा प्रशासनाच्या आकडेवारीनुसार, यंदाच्या मान्सून हंगामात जून ते सप्टेंबर अखेरपर्यंत श्रीवर्धन तालुक्यात एकूण २,५०० मिलीमीटरपेक्षा जास्त पावसाची नोंद झाली आहे. जुलै महिन्यात तर तालुक्यात पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. निसर्गाने एवढी मोठी कृपा केली असताना आणि अद्यापही पावसाचा परतीचा प्रवास सुरू असताना, मुख्य रानवली धरणात अवघा ३५ टक्केच पाणीसाठा शिल्लक का राहिला? हा साठा फार-फार तर आगामी नोव्हेंबर किंवा डिसेंबर महिन्यापर्यंतच पुरेल असा अंदाज आहे. मुसळधार पाऊस पडूनही धरणात पाणी का साठले नाही आणि साठलेले पाणी गेले कुठे? सतत फुटणाऱ्या पाईप लाईनमुळे हजारो लिटर पाणी वाया गेले. या अक्षम्य दुर्लक्षामुळेच ऐन हिवाळ्यात श्रीवर्धन शहरात पाण्याचा तीव्र भडका उडून श्रीवर्धनमध्ये अक्षरशः पाणी प्रश्न पेटणार, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.



■ श्रीवर्धनवर कृत्रिम दुष्काळाचे सावट

■ नळ पाणी योजनेचा पुरता बोजवारा

## मलिदा खाण्याच्या वृत्तीमुळे करदात्यांची लूट!

रानवली धरण नळ पाणी योजना सुरू झाल्यापासून ती श्रीवर्धनकरांसाठी वरदान ठरण्याऐवजी डोकेदुखी ठरली आहे. स्थानिक नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार, निकृष्ट दर्जाच्या कामामुळे या योजनेची मुख्य पाइपलाइन आतापर्यंत तब्बल १०० पेक्षा जास्त वेळा फुटली आहे. प्रत्येक वेळी पाईप फुटल्यानंतर दुरुस्तीच्या नावाखाली सुमारे ५० ते ६० हजार रुपये खर्च केले जातात. म्हणजेच केवळ तात्पुरत्या दुरुस्तीच्या नावाखाली आजवर लाखो रुपयांची उधळपट्टी करण्यात आली आहे. कंत्राटदारांचे निकृष्ट दर्जाचे काम, अधिकाऱ्यांचे त्या कंत्राटदारांना असलेले मूक समर्थन आणि फक्त स्वतःचा मलिदा (टक्केवारी) खाण्याच्या वृत्तीमुळेच हा प्रचंड आर्थिक भुदंड सर्वसामान्य, करदात्या श्रीवर्धनकरांच्या माथी मारला जात आहे.

> “रानवली धरण नळ पाणी योजनेच्या निकृष्ट कामामुळे आणि वारंवार फुटणाऱ्या पाइपलाइनमुळे आज श्रीवर्धनकरांवर ऐन हिवाळ्यात पाणीटंचाईचे संकट ओढवले आहे. शासनाने तालुक्यात दुष्काळ जाहीर केला असला, तरी प्रशासकीय ढिसाळपणामुळे धरणात केवळ ३५ टक्के पाणी शिल्लक राहणे हे गंभीर आहे. पाइपलाइनच्या नावाखाली होणारी करदात्यांच्या पैशांची उधळपट्टी थांबवून तातडीने कायमस्वरूपी उपाययोजना न केल्यास, जनतेला सोबत घेऊन आम्ही तीव्र आंदोलन छेडू.”
>
> – देवेंद्र भुसाने, गटनेते, श्रीवर्धन नगरपरिषद

या संपूर्ण प्रकरणावर स्थानिक राजकीय वर्तुळातून आणि सामाजिक स्तरातून अत्यंत तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. नाव न सांगण्याच्या अटीवर काही ज्येष्ठ नागरिकांनी आणि विरोधी कार्यकर्त्यांनी थेट आरोप केला आहे की, ‘‘शहरातील टक्केवारीची चोरी आणि भ्रष्टाचाराची नग्न रूपे उघड्यावर पडू नयेत म्हणून श्रीवर्धन मतदार संघावर राज्य करणाऱ्या घराणेशाहीचा एक विशिष्ट असा राजकीय खेळ अत्यंत पद्धतशीरपणे सुरू आहे. विकासकामांच्या नावाखाली स्वतःची घरे भरणारे हे नेते जनतेच्या मूलभूत प्रश्नांकडे जाणीवपूर्वक डोळेझाक करत आहेत. मात्र, आगामी काळात जेव्हा नळाला पाणी येणार नाही आणि तीव्र पाणीटंचाई निर्माण होईल, तेव्हा श्रीवर्धनची जनता या भ्रष्ट कारभाराचा आणि नेत्यांचा जाब विचारल्याशिवाय राहणार नाही, असे बोलले जात आहे.

## जन आंदोलनाचा उद्रेक होण्याची शक्यता

पावसाचे प्रमाण योग्य असूनही केवळ नियोजनाचा अभाव, अकार्यक्षमता आणि भ्रष्ट कारभारामुळे जनतेला कृत्रिम दुष्काळाच्या खाईत लोटले जात आहे. नोव्हेंबर-डिसेंबरनंतर निर्माण होणाऱ्या संभाव्य पाणीबाणीला सामोरे जाण्यासाठी प्रशासनाकडे सध्या कोणतीही ठोस पर्यायी योजना उपलब्ध नाही. ही गंभीर परिस्थिती वेळीच सुधारली नाही, पाइपलाइनचे काम कायमस्वरूपी दर्जेदार केले नाही आणि रानवली धरणाच्या पाण्याचे योग्य नियोजन केले नाही, तर आगामी काही दिवसांत श्रीवर्धनमध्ये पाण्यासाठी मोठा जनक्षोभ उसळण्याची आणि संतप्त नागरिक रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करण्याची चिन्हे दिसत आहेत.

# नेरळमधील विद्युत रोहित्रला भीषण आग

**। कर्जत । प्रतिनिधी ।**



नेरळ शहरातील कुंभार आळी परिसरात धारप हॉलसमोर असलेल्या विद्युत रोहित्रला शनिवारी (दि.२६) सकाळी साडेनऊ वाजताच्या सुमारास अचानक भीषण आग लागल्याची घटना घडली. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये काही काळ खळबळ उडाली होती. यावेळी आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी विद्युत कर्मचारी तसेच स्थानिकांनी प्रयत्न केले. तब्बल अर्धा ते एक तासाच्या अथक प्रयत्नांनंतर आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश मिळाले.

नेरळ शहरातील कुंभार आळी परिसरात धारप हॉलसमोर असलेल्या विद्युत रोहित्रमधून मोठ्या प्रमाणात आगीचे लोट आणि धूर निघू लागल्याने परिसरातील नागरिकांमध्ये काही काळ खळबळ उडाली होती. या घटनेची माहिती मिळताच सजग नागरिकांनी महावितरण विभागाच्या अधिकाऱ्यांना तातडीने संपर्क साधला. त्यानंतर विद्युत अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. मात्र, तोपर्यंत रोहित्राने मोठ्या प्रमाणात पेट घेतल्याने आग आटोक्यात आणण्यासाठी मोठी कसरत करावी लागली. तब्बल अर्धा ते एक तासाच्या प्रयत्नांनंतर आगीवर नियंत्रण मिळवण्यात आले. या घटनेत विद्यूत रोहित्र पूर्णपणे जळून खाक झाला असून, परिसरातील वीजपुरवठ्यावर त्याचा परिणाम झाला. ही घटना घडून १५ तास लोटले तरी नवीन विद्यूत रोहित्र बसवून झाले नव्हते. त्यामुळे नेरळ गावातील अर्ध्याहून अधिक भागातील वीज पुरवठा बंद राहिला. त्यानंतर रात्री अकरा वाजताच्या सुमारास विद्यूत रोहित्र बदलण्यात आले आणि त्यानंतर वीज पुरवठा पूर्ववत झाला. तसेच, या ठिकाणी आतापर्यंत एकूण चार ट्रान्सफॉर्मर आगीच्या विळख्यात आल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, विद्युत विभागाच्या कर्मचाऱ्यांनी वेळीच घटनास्थळी धाव घेतल्याने मोठी दुर्घटना टळली.

# विनयभंगप्रकरणी मूक मोर्चा



(छायाचित्रः उदय कळस)

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

म्हसळा तालुक्यात मागील दोन महिन्यांत अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार केल्याच्या दोन गंभीर घटना समोर आल्या आहेत. या प्रकरणांमध्ये म्हसळा पोलिसांनी एकूण आठ आरोपींना अटक केली आहे. दरम्यान, या घटनांचा निषेध करण्यासाठी सर्वधर्मीय नागरिकांनी एकाच महिन्यात दुसऱ्यांदा मूक मोर्चा काढला. यावेळी संबंधित आरोपींवर कठोरात कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

म्हसळा तालुक्यात मागील दोन महिन्यांत कांदळवाडा आणि म्हसळा शहरात अल्पवयीन मुलींना आमिष दाखवून त्यांची फसवणूक करून लैंगिक अत्याचार केल्याच्या दोन गंभीर घटना समोर आल्या आहेत. या प्रकरणांमध्ये म्हसळा पोलिसांनी दोन स्वतंत्र गुन्ह्यांत एकूण आठ आरोपींना अटक केली आहे. या घटनांचा निषेध करण्यासाठी सर्वधर्मीय नागरिकांनी एकाच महिन्यात दुसऱ्यांदा मूक मोर्चा काढला. म्हसळा-पाभरे फाटा येथून तहसीलदार कार्यालयापर्यंत मूक मोर्चा काढून नागरिकांनी प्रशासनाचे लक्ष वेधले. यावेळी

### ■ आरोपींवर कडक कारवाईची मागणी

तहसील कार्यालयाच्या प्रांगणात समाजातील मान्यवर तसेच तालुक्यातील लोकप्रतिनिधींनी घटनेचा तीव्र निषेध व्यक्त करत संबंधित आरोपींवर कठोरात कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांनी केली. याबाबत म्हसळा तहसीलदार अव्वल कारकून सचिन धोंडगे आणि पोलीस उप अधीक्षक योगिता कुटे यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनाद्वारे, ‘‘अल्पवयीन मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर असून, अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी पोलीस प्रशासनाने प्रभावी उपाययोजना कराव्यात. तसेच, दोषींवर कायद्यानुसार कठोर कारवाई करावी,’’ अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच, या मोर्चादरम्यान समाजातील विविध घटकांनी प्रशासनाने अशा घटनांची गांभीर्याने दखल घेऊन जनजागृती व प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची आवश्यकता व्यक्त केली. पालकांनी तसेच नागरिकांनीही मुलांच्या सुरक्षिततेबाबत अधिक सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले.

## निवडक

### सौरभ नाझरेंचा सर्वोत्कृष्ट सन्मान

**मुरुड-जंजिरा :** हेंद्राबाद फोटो ट्रेंड व सिग्मा अकॅडमी ऑफ फोटोग्राफी तर्फे वेडिंग छायाचित्र स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत मुरूड तालुक्यातील सौरभ नाझरे यांना वेडिंग विभागात राज्यातून प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाल्याचे नुकतेच जाहिर करण्यात आले आहे. या स्पर्धेत हजारो छायाचित्रकार सहभागी झाले होते.



त्यातून सौरभ नाझरे यांचा लग्नातील विशेष फोटो निवडण्यात आला. त्यांना १० हजार रुपयांचे रोख पारितोषिक, सन्मानपत्र व चषक देण्यात येणार आहे. तसेच, त्यांना प्रिवेडिंग विभागात देखील एका फोटोला पुरस्कार मिळाला आहे. या स्पर्धेचे परीक्षण जागतिक पातळीचे परीक्षक नामवंत छायाचित्रकार एम.सि. शेखर, जिनेश प्रसाद, अनुराग बडोळिया व चंदन सुंदर यांच्यासह भारतातील विविध भागातून आलेल्या परीक्षकांनी केले. मुरूड तालुक्यातील सौरभ नाझरे हे गेली १५ वर्षे व्यवसाईक फोटोग्राफी करत आहेत. त्यांनी निसर्गचित्रांसोबत लग्न समारंभात विशेष फोटोग्राफीत प्राविण्य मिळवल्याने नाविन्यपूर्ण फोटो शूट कार्यसाठी प्रसिद्ध आहेत. रायगड फोटोग्राफी असोसिएशनच्या २०२३ फोटो स्पर्धेत देखील त्यांनी प्रथम क्रमांक मिळवला होता. सौरभ यांचे वडील सुधीर नाझरे यांचा पारंपरिक छायाचित्रणाचा व्यवसाय असल्याने वडिलांचे मार्गदर्शन घेऊन फोटोग्राफी क्षेत्रात उंच भरारी घेतली आहे.



### कागदी पिशव्या निर्मिती कार्यशाळा

माणगाव : तालुक्यातील द.ग. तटकरे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने शनिवारी (दि.२६) कागदी पिशव्या निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. पर्यावरणाचे संरक्षण, प्लास्टिक पिशव्यांचा वापर कमी करणे, तसेच पर्यावरणपूरक पर्यायांचा अवलंब करण्याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करणे हा या कार्यशाळेचा प्रमुख उद्देश होता. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना सहज उपलब्ध होणाऱ्या साहित्याचा वापर करून कागदी पिशव्या तयार करण्याचे प्रात्यक्षिक व मार्गदर्शन देण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत कागदी पिशव्या तयार केल्या. या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला वाव मिळण्याबरोबरच व्यावहारिक कौशल्ये आणि पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण झाली. या कार्यशाळेत एकूण २३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यामुळे पर्यावरणपूरक जीवनशैलीचा संदेश देणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त व प्रेरणादायी ठरला.

### घरफोडी करणारी टोळी जेरबंद

**पनवेल :** रात्रीच्या वेळी घरफोडी करून चोरी करणाऱ्या चौघांना गुन्हे शाखा कक्ष-३च्या पथकाने ताब्यात घेतले आहे. चौकशीत नवी मुंबई, रायगड आणि ठाणे परिसरातील आठ घरफोडीचे गुन्हे उघडकीस आल्याचा दावा पोलिसांनी केला आहे. तळोजा पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या घरफोडीच्या गुन्ह्याच्या समांतर तपासादरम्यान ही कारवाई करण्यात आली. तळोजा पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्याच्या तपासादरम्यान पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज तसेच गोपनीय माहितीच्या आधारे संशयितांचा शोध सुरू केला. त्यानुसार सापळा रचून लहु पवार (४०), सचिन पवार (२२), अंकुश पवार (३४) आणि शहाजी पवार (५०) या चौघांना ताब्यात घेण्यात आले. पोलिसांच्या तपासानुसार, या आरोपींनी वेगवेगळ्या ठिकाणी आणि वेगवेगळ्या साथीदारांच्या मदतीने घरफोडीचे गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यामध्ये तळोजा, पनवेल तालुका, पनवेल शहर, खोपोली आणि कळवा पोलीस ठाण्यांत दाखल असलेल्या गुन्ह्यांचा समावेश आहे. पोलिसांच्या माहितीनुसार तळोजा पोलीस ठाणे, पनवेल तालुका पोलीस ठाणे, पनवेल शहर पोलीस ठाणे, खोपोली पोलीस ठाणे आणि कळवा पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या एकूण आठ गुन्ह्यांचा तपास या कारवाईत उघडकीस आला आहे.

# कर्जतमध्ये हुतात्मा स्मृती दिन साजरा

**। नेरळ । प्रतिनिधी ।**



चिरनेर सत्याग्रह आंदोलनातील हुतात्मा नाग्या कातकरी यांना नेरळमध्ये अभिवादन करण्यात आले. यावेळी शालेय विद्यार्थ्यांनी कातकरी बोलीमध्ये मनोगत व्यक्त करीत खऱ्या अर्थाने अभिवादन केले.

१९३० मध्ये उरण तालुक्यातील चिरनेर येथे झालेल्या आंदोलनात हुतात्मा झालेले नाग्या महादू कातकरी यांचा स्मृती दिन कर्जत येथील आदिवासी कातकर वाडीत साजरा करण्यात आला. यावेळी सर्व महापुरुषांच्या विचारांना व हुतात्मा नाग्या कातकरी यांच्या प्रतिमेला विनम्र अभिवादन करण्यात आले. तसेच, हुतात्मा नाग्या कातकरी यांचा दैदिप्यमान इतिहास काळाच्या पडद्याआड गेला आणि येथील विषमतावादी समाजव्यवस्थेमुळे त्यांच्या बलिदानाच्या इतिहासाची पाने कोरीच राहिली, अशा भावना ज्येष्ठ शिक्षक वेच्या गावित यांनी व्यक्त केल्या. यावेळी पोलीस पाटील चंद्रकांत जाधव, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सुनिल पांडुरंग पवार, मुख्याध्यापक वेच्या गावित, बळीराम वाघचौरे, पांडुरंग पवार, सचिन ओगले आणि आजी-माजी विद्यार्थी उपस्थित होते.

## ५० हजार रुपयांच्या मुद्देमालाची चोरी

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

५० हजार रुपयांच्या मटेरियलची चोरी केल्याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मारुती उदगीरे हे रिमेल्टेड लीड हे मटेरियल ट्रकने पालघर येथून आळंदी पुणे येथे घेऊन जात होते. पहाटे ३.०० वाजताच्या सुमारास मुंबई-पुणे महामार्गावरील अमेटी कॉलेजच्या आणि भाताण बोगद्याच्या मध्ये आळंदीकडे जात असताना पाठीमागून आलेल्या वाहनावरील व्यक्तीने ट्रकमधील रिमेल्टेड लीड चोरून नेल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

## अकरा लाखांची फसवणूक

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून अकरा लाखांची फसवणूक केल्याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. खारघर येथील योगेश सोनवणे यांना त्यांच्या मोबाईलवर शेअर मार्केट मधील व्हाट्सअप ग्रुपच्या माध्यमातून बीटीएसटी प्लॅन गुंतवणूक आणि आयपीओमधून नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवण्यात आले. त्यानंतर समोरील व्यक्तिंनी पिडी एंटरप्राइजेस येथील बँक खात्यावर वेगवेगळ्या कारणांसाठी त्यांच्याकडून ११ लाख रुपये घेतले आणि आणखी ३० लाख रुपये भरण्याची मागणी केली.

## शेतकऱ्याच्या घरातून वासरू पळवले



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील माले या गावातील शेतकऱ्याच्या गोठ्यामध्ये बांधलेले वासरू रात्रीच्या वेळी पळवून नेल्याची घटना घडली. वासरू चोरीला गेल्याने शेतकरी आर्थिक संकटात आले असून, याबाबत नेरळ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. महिला शेतकरी या स्वतः पुढाकार घेऊन शेती करीत असून, गोठ्यातून वासरू चोरीला गेल्याने शेतकरी महिला आर्थिक संकटात सापडली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, माले गावातील नीलिमा मोकल यांनी घराला लागून असलेल्या गोठ्यात बांधलेल्या वासरूला मध्यरात्री १.०० वाजता चारा देऊन झोपी गेल्या. त्यानंतर त्या पहाटेच्या सुमारास गोठ्यात गेल्या असता रात्री बांधून ठेवलेल्या ठिकाणी वासरू नव्हते. लक्ष्मी नावाच्या पांढऱ्या रंगाच्या या वासराचा शोध घेतला असता वासरू सापडले नाही. त्यामुळे मोकल यांनी कळंब येथील पोलीस चौकीत जाऊन वासरू हरवल्याची तक्रार दाखल केली. नेरळ पोलीस ठाण्याच्या कळंब आऊट पोस्ट मधील कर्मचारी पोलीस हवालदार महेश गोरे,आणि काळोखे हे अधिक

# मोदकांनी जिंकली रसिकांची मने

**। पनवेल । प्रतिनिधी ।**



गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पनवेल येथील ओरायन मॉलमध्ये ‘मॅड ओव्हर मोदक’ या विशेष मोदक बनवण्याच्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत स्पर्धकांनी आपल्या पाककौशल्यासोबतच सर्जनशीलतेचे अनोखे दर्शन घडवले. विविध आकार, रंग, सजावट आणि चवींच्या मोदकांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. या स्पर्धेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या स्पर्धेत पारंपरिक उकडीच्या मोदकांपासून ते आकर्षक पद्धतीने सजवलेल्या नाविन्यपूर्ण मोदकांपर्यंत विविध प्रकार पाहायला मिळाले. प्रत्येक स्पर्धकाने मोदकाची चव, आकारमान, सजावट आणि सादरीकरण यामध्ये वेगळेपणा आणण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे स्पर्धेच्या ठिकाणी जणू मोदकांच्या रूपात कल्पकतेचीच मेजवानी पाहायला मिळाली. या स्पर्धेत वैष्णवी कोचरेकर यांनी प्रथम क्रमांक, शर्वरी सुतार यांनी द्वितीय क्रमांक, तर अंकिता देसाई यांनी तृतीय क्रमांक पटकावला. विजेत्यांना आकर्षक बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. स्पर्धकांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्याबरोबरच गणेशोत्सवातील पारंपरिक खाद्यसंस्कृती नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला. या कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणून अभिनेत्री धनश्री कडगावकर यांची उपस्थिती लाभली.

**शहर कार्याध्यक्ष गौरव पोरवाल यांचा पुढाकार | पर्यावरण संवर्धनासाठी जनजागृतीचा संकल्प**

# सेवाभावी नागरिकांचा शेकापतर्फे गौरव

**। पनवेल । प्रतिनिधी ।**



गणेश विसर्जनाच्या वेळी गणेशभक्तांना सेवा देणाऱ्यांचा शेतकरी कामगार पक्षाचे शहर कार्याध्यक्ष गौरव पोरवाल यांच्या पुढाकाराने सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी कामोठे येथील शंकर मंदिर तलावाजवळ महानगरपालिका कर्मचारी, पोलीस, सुरक्षा रक्षक आणि सेवाभावी नागरिक यांच्या योगदानाचा गौरव करण्यात आला.

गणेशभक्त आपल्या लाडक्या बाप्पाला निरोप देण्यासाठी मोठ्या संख्येने विसर्जनस्थळी येतात. मात्र, विसर्जन प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी महानगरपालिकेचे स्वच्छता कर्मचारी, पोलीस अधिकारी व कर्मचारी, सुरक्षा रक्षक तसेच विविध सेवाभावी घटक अहोरात्र कार्यरत असतात. त्यांच्या योगदानाची दखल घेत या सर्वांचा यावेळी सन्मान करण्यात आला. या उपक्रमात शेकापचे उपाध्यक्ष रमेश गोरे, सेक्टर-१९ चे उपाध्यक्ष सचिन झांजणे, विद्यार्थी संघटनेचे रजनीश सिंह, आशुतोष पोरवाल यांच्यासह पनवेल महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे, पर्यावरण विभागाचे अधिकारी, पोलीस प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी भामरे, कामोठ्याचे प्रभारी ज्योती देशमुख, मनोहर पगार, डीसीपी रश्मी नांदेडकर आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना गौरव पोरवाल यांनी, सामाजिक बांधिलकीच्या माध्यमातून जनसेवेचे कार्य सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला. गणेश विसर्जनासोबतच पर्यावरण संवर्धनाची जबाबदारीही नागरिकांनी स्वीकारावी, यासाठी पुढील वर्षापासून कामोठे परिसरातील विविध सोसायट्यांमध्ये जनजागृती करण्याचा संकल्प करण्यात आला. घरगुती गणेशमूर्तींचे शक्यतो सोसायटी परिसरात कृत्रिम किंवा घरगुती पद्धतीने विसर्जन करणे, निर्माल्य व इतर कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे याबाबत नागरिकांना प्रोत्साहित करण्यात येणार आहे. तसेच, पीओपीच्या मूर्तीऐवजी पर्यावरणपूरक मातीच्या मूर्तींचा वापर वाढविण्यासाठी जनजागृती करण्यावर भर दिला जाणार आहे. धार्मिक श्रद्धा आणि परंपरा जपत पुढील पिढीसाठी पर्यावरणाचे रक्षण करणे ही सामूहिक जबाबदारी असल्याचे देखील यावेळी त्यांच्याकडून सांगण्यात आले.

## पनवेलमधील पान शॉपवर कारवाई

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल शहरातील ठाणा नाका परिसरातील नवरतन पान शॉपमध्ये प्रतिबंधित पानमसाला, सुगंधित तंबाखू व जर्दाचा साठा करून विक्री केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी दोघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. यावेळी सुरेश गुप्ता (४७) व त्याच्या साथीदाराविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईत रजनीगंधा पानमसाला, तुळसी जर्दा, विमल पानमसाला, व्ही-१ तंबाखू, राजश्री पानमसाला आणि डबल ब्लॅक तंबाखू अशा विविध प्रतिबंधित पदार्थांचा साठा जप्त करण्यात आला. जप्त मुद्देमालाची एकूण किंमत सुमारे १,९८१ रुपये आहे.

# मोठ्या संकटाची लक्षणे

राज्यात एक जून ते तीस सप्टेंबर हा मान्सूनचा कालावधी मानला जातो. तो पूर्णही झालेला नसताना त्याच्या एक आठवडा अगोदरच राज्यातील ७५ टक्के भागात अधिकृतरीत्या दृष्काळ जाहीर करण्याची वेळ आली आहे. यावरून यंदा स्थिती किती भीषण असेल याचा अंदाज यावा. एकूण ३५८ पैकी २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर झाला आहे. याबाबत शरद पवार यांनी पहिल्यांदा मागणी केली होती. इतर विरोधकही बोलत होते. तेव्हा देवेंद्र फडणवीस मात्र केंद्र सरकारच्या दुष्काळ निवारण कार्यक्रमाच्या नियमांकडे बोट दाखवत होते. चार ऑक्टोबरच्या आत दुष्काळाबाबतचा अहवाल केंद्राकडे पाठवता येऊ शकणार नाही, कारण तोवर पाऊस अधिकृतरीत्या संपलेला नसतो असे त्यामागचा तर्क होता. पण हवामान आणि शेतीचे वास्तव नोकरशाहीच्या नियमांनुसार चालत नाही. सरकारला यचे भान बाळगावे लागते. राज्यातील जनतेच्या दबावामुळे का होईना पण फडणवीस सरकारला हे भान आले हे चांगले झाले. आता दुष्काळ जाहीर झाल्यामुळे त्या भागातील शेतकऱ्यांना काही सवलती मिळतील. मुलांच्या शिक्षणाची फी माफ होईल. कर्जाच्या वसुलीला स्थगिती मिळेल. आतापर्यंत साडेसात एचपीपर्यंतच्या पंपांना मोफत वीजपुरवठा केला जातो. आता त्यावरच्या पंपांनाही वीजदर माफ राहील. दुष्काळी भागात गुरांना चारा पुरवण्याची तसेच माणसांना धान्यपुरवठा करण्याची तरतूद केली जाईल. पाण्यासाठी टँकर्सची व्यवस्था आधीच सुरू झाली आहे. एकट्या संभाजीनगर जिल्ह्यात दोनशेच्या वर टँकर चालू आहेत. या जिल्ह्यात सरासरीच्या जेमतेम तीस टक्के पाऊस झाला आहे. नाशिक जिल्ह्यात ही टक्केवारी ३५ ते ४० टक्के आहे. नाशिकमध्ये पाऊस झाला तरच गोदावरीला व पर्यायाने मराठवाड्यात पाणी येते. तेच नसल्याने यंदा भीषण स्थिती होणार आहे. सरकार धान्य आयात करू शकेल. माणसांना रोजगार पुरवू शकेल वा पैशांची मदत देऊ शकेल. पण पाण्याचे काय करणार हा मोठा प्रश्न असेल. पूर्वीच्या दुष्काळात सांगलीहून मराठवाड्याला रेल्वेने पाणी पुरवले गेले होते. पण यंदा सर्वत्रच टंचाई असल्याने तेही करणे कठीण आहे.

## स्थलांतराचे नियोजन

या स्थितीत दुष्काळी प्रदेशातून माणसांचे तांडे मुंबई-पुण्यासारख्या शहरांमध्ये येणार हे उघड आहे. सरकारला याबाबतचे नियोजन आधीपासूनच करावे लागेल. अशा स्थलांतरामध्ये वृद्ध माणसांचे आरोग्य व मुलांचे शिक्षण यांची हमखास आबाळ होते. ते कसे टाळता येईल हे पाहावे लागेल. कोकणातील जनतेला हे सगळे थोडेसे लांबचे व परके वाटेल असे चित्र आहे. पण स्थलांतराची झळ त्यांनाही लागणार आहे. ज्या ठिकाणी पाणी आहे अशा भागात माणसे येणार हे स्पष्ट आहे. रायगडचे पनवेल, पेण, कर्जत हे तालुके सध्या विकासाच्या वाटेवर आहेत. तेथे अनेकविध प्रकारचे घरांचे व रस्ते, धरणे, पूल इत्यादी प्रकल्प चालू आहेत. त्यामुळे माणसांचा ओढा या ठिकाणी अधिक असेल. या लोंढ्यांची व्यवस्था नीट लावणे व त्यातून आणखी काही प्रश्न निर्माण होऊ नयेत हे पाहण ही सरकारची जबाबदारी आहे. कोकणातही यंदा सिंधुदुर्गात नेहमीपेक्षा कमी पाऊस झाला आहे. त्यामुळे उन्हाळ्याच्या सुरुवातीलाच तेथे पाण्याची टंचाई जाणवू लागणार आहे. त्याचे नियोजन करावे लागेल. रायगडमध्येही विविध तालुक्यात असमान किंवा कमीअधिक पाऊस झाला आहे. त्यामुळे तेथेही बारकाईने उपाययोजना कराव्या लागणार आहेत. त्यासाठी सर्व पक्ष, संघटना यांना विश्वासात घ्यावे लागेल. कमी पावसामुळे बहुतेक भागातील सोयाबीन, तूर, मूग, उडीद इत्यादी पिके करपून गेली आहेत. त्यामुळे या धान्यांचे उत्पादन कमी होणार आहे. रबीलाही फटका बसणार असल्याने गव्हाचे उत्पादन घटणार आहे. कर्नाटक, तमिळनाडू, आंध्र, तेलंगणातही अवर्षण आहे. परिणामी भात तसेच भाज्यांचे उत्पादन घटणार आहे. याच दरम्यान तिकडे उत्तर प्रदेश, उत्तराखंड, बिहार इत्यादी ठिकाणी पुराचा कहर चालू आहे. याचा एकूण परिणाम पुढच्या काही महिन्यांमध्ये दिसेल. धान्याचे उत्पादन कमी होणार असल्याच्या नुसत्या शंकेने महागाई वाढायला सुरुवात होत असते. व्यापारी साठेबाजी व सट्टेबाजी करून याचा फायदा उठवत असतात. हे सरकार तो खेळ कसा रोखणार हे पाहावे लागेल. अन्यथा, खूप बोंबाबोंब झाली की नंतरच थोडे मारल्यासारखे करायचे अशा मलमपट्ट्या होत राहतील.

## उलट्या काळजाचे राजकारण

आधी दुष्काळाचे नावही घ्यायला तयार नसलेल्या मुख्यमंत्र्यांना गेल्या आठवड्यात दुष्काळी भागांचा दौरा करणे भाग पडले. मग सालाबादप्रमाणे मुख्यमंत्री शेताच्या बांधावर वगैरे बातम्या आल्या. शेतकऱ्यांनी डोळ्यात पाणी आणून त्यांच्या कहाण्या ऐकवल्या. आता याच्या पुढचा भाग म्हणजे दुष्काळ जाहीर केला म्हणजेच सरकारने मोठे मैदान मारले अशा रीतीने जाहिराती सुरू होतील. भाजप आणि शिंदे गटाच्या या जाहिरातींचे पैसे वाचवून दुष्काळी निधीसाठी दिले तरी खूप मदत होईल. सरकारी पक्षांनी या दुष्काळी मदतीचे राजकीय भांडवल करण्याचा प्रयत्न करू नये. विरोधकांनी काही मागण्या मांडल्या की दुष्काळाचे राजकारण करू नका असा सल्ला मुख्यमंत्री देतात. हे प्रकारही बंद झाले पाहिजेत. विरोधक जनतेची बाजू घेऊन बोलणार. ते तसे बोलणे म्हणजे राजकारण होत नाही. सोलापूर जिल्ह्यात राज्यातला सर्वात भयंकर दुष्काळ आहे. परवा तिथे गोपीचंद पडळकर आणि भाजपचे स्थानिक आमदारांनी मोठी परिषद कोणत्या विषयावर आयोजित केली तर मशिदींवरच्या भोंग्याचा निषेध. पडळकर हे फडणवीसांचे निकटवर्तीय. पण तेच तक्रार करतात की हिंदू सणांवर अन्याय होतो आणि मुस्लिमांना मात्र खुली छूट दिली जाते. सोलापुरातील लोक सांगतात की शहरातल्या एकाही मशिदीवर आता भोंगा नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर ते मागेच थांबले आहेत. तरीही या मुद्द्यावरून वातावरण पेटवण्याचा हा प्रयत्न हे चांगले लक्षण नाही. एकीकडे याच सोलापुरात मुख्यमंत्र्यांनी दुष्काळी दौरा केला, एका रडणाऱ्या मुलाला पोटाशी घेतल्याचा त्यांच्या फोटोची मोठी जाहिरात केली गेली. पण दुसरीकडे त्यांच्याच पक्षाचे लोक मशिदींवरचे भोंगे वगैरेंचे राजकारण करून पेटवापेटवी करतात, याचा अर्थ स्पष्ट आहे. दुष्काळामुळे जनतेत जी चीड निर्माण होणार आहे तिला भलतेच वळण देण्याचा व हिंदू विरुद्ध मुस्लिम अशी लढाई लावून देण्याचा हा कट आहे. गृहखाते हेही फडणवीसांकडे आहे. त्यांनी अशा प्रकारांवर कडक भूमिका घ्यायला हवी. अन्यथा, हे सर्व त्यांच्या आशीर्वादाने चालू आहे असे मानणे भाग पडेल. हे उदाहरण इतक्यासाठीच दिले की, दुष्काळ असो की पूर, लोक जगोत की मरोत, भाजपवाल्यांना सत्तेच्या राजकारणापलिकडे काहीही सुचत नाही हे सर्वांना कळावे. हे उलट्या काळजाचे राजकारण महाराष्ट्राच्या प्रगतपणाला काळिमा फासणारे आहे. आता तर केवळ सप्टेंबर महिना आहे. पुढील पाऊस येईपर्यंत आणखी आठ महिने जाणार आहेत. काळ कठीण आहे. त्यात शिवाय भाजपच्या या खालच्या दर्जाच्या राजकारणाचाही मुकाबला करावा लागणार आहे.

| विचार

# कायदा पाळू, सण जोशात साजरा करु!

**डॉ. सुकृत खांडेकर**

*डीजे आणि तत्सम ध्वनिक्षेपकांना विरोध करण्याच्या मुळाशी आवाजाची मर्यादा राखण्याचा आणि कायदापालन करुन गणेशोत्सव साजरा करण्याचा सहजसोपा मुद्दा आहे. त्याचे रुपांतर मोठ्या राजकीय वादात करण्याची गरजच नाही. नियम काटेकोरपणे पाळू, विद्यार्थी-ज्येष्ठ नागरिकांची अडचण लक्षात घेऊ आणि जोशात उत्सव साजरा करु, असे निसंदिग्ध आश्वासन मंडळे का देत नाहीत? तसे झाले तर हा विषय तिथेच संपेल.*



गणरायाचे आगमन होण्याच्या काही दिवस आधी सणामध्ये होणाऱ्या ध्वनिप्रदूषणाची चर्चा महाराष्ट्रात एक नवे वैचारिक आंदोलन पेटवून गेली. या वादाच्या निमित्ताने गेले काही दिवस राज्यातले वातावरण ढवळून निघाले, मात्र या प्रश्नाची उकल सहज होणे शक्य असताना मोठा वाद पेटवला गेला. ब्रिटीशांच्या विरोधात जनजागृती निर्माण करण्यासाठी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी १३२ वर्षांपूर्वी गणेशोत्सव सार्वजनिक केला. रस्त्यावर, चौकाचौकात आणि नाक्यानाक्यावर मंडप घालून सार्वजनिक गणेशोत्सव सुरू झाले. भाषणे, भजन, कीर्तन, गायन, मेळे, असे त्याचे सुरूवातील स्वरूप होते. मुंबई, पुण्यात सुरू झालेल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांचे महाराष्ट्रात सर्व लहान मोठ्या शहरात आकर्षण वाढले. महाराष्ट्रातच नव्हे, तर देशभर महाराष्ट्र मंडळे किंवा मराठी भाषिक वस्ती-वसाहती असलेल्या ठिकाणी सार्वजनिक गणेशोत्सव दिमाखाने साजरा होतो. राजधानी दिल्लीमध्येही गणेशोत्सव मंडळांची संख्या बरीच आहे, पण बहुतेक ठिकाणी भक्तिभावाने गणेशोत्सव साजरा करण्यावरच भर असतो. गेल्या वीस-पंचवीस वर्षांमध्ये गणेशोत्सव मंडळांमधे ढोल-ताशे, लेझिम या वाद्यांबरोरच डीजे आणि डॉल्बीचा प्रवेश झाला आणि दणदणीत आवाजात उत्सव साजरे होऊ लागले. डीजेचा आवाज कानठळ्या बसवणारा आहे, अनेकजणांना त्याचा त्रास होतो.

घरातील आजारी, वयोवृध्द, विद्यार्थी यांना डीजेचा आवाज म्हणजे शत्रू वाटतो. उत्सवाचे दहा दिवस डीजेचा भला मोठा आवाज निमूटपणे सहन करणे किंवा दुसरीकडे राहायला जाणे हे दोनच मार्ग खुले असतात. डीजेच्या दणदणीत नि खणखणीत आवाजापुढे तरूणाईला नाचायला आवडते. डीजेच्या आवाजाचा मजा लुटणारी शेकडो मुले-मुली आहेत. पण त्या आवाजाचा कळत नकळत कानावर, श्रवणशक्तीवर अगदी मेंदूपर्यंत जाणाऱ्या रक्तवाहिन्यांवर परिणाम होत असतो हे नाचताना कुणाच्या लक्षात येत नाही.

सार्वजनिक गणेशोत्सवाची कल्पना मांडली तेव्हा उत्सवात बेंजो, डॉल्बी किंवा डीजे येतील याची लोकमान्य टिळकांना कल्पनाही नव्हती. भल्या मोठ्या आवाजातील लाऊडस्पिकर्स लावले जातील हे त्यांच्या स्वप्नातही नव्हते. पण पुणे, मुंबई आणि विविध शहरातील गणेशोत्सव मंडळांमध्ये सुरु असलेल्या मोठ्या आवाजाच्या जीवघेण्या स्पर्धेचे कधी तरी बूमरँग होणार हे नक्की आहे. अति तिथे माती, हे निसर्गाचे सूत्र आहे. आज सर्वत्र डीजेचा अतिरेक झाला आहे. सर्वसामान्य माणूस डीजेच्या आवाजापुढे हतबल झाला आहे. डीजे बंद करा, आवाज कमी करा, असे सांगण्याची कोणाची हिंमत नाही. सार्वजनिक मंडळाचे भाई-दादा आणि त्यांच्या कार्यकर्त्यांना विनंती करण्याचीही कोणाची मानसिक तयारी नाही. पोलिसांकडे तक्रार नोंदवून डीजे बंद होत नाहीत. स्थानिक नगरसेवक किंवा आमदाराला सांगितले तर दहा दिवस सहन करा, असा सल्ला ते देतात. हिंदुंच्या सणात ध्वनिप्रदूषण नको म्हणता, मग इतर धर्मांच्या सणांना आणि मिरवणुकीच्या वेळी गप्प का बसता, असाही उलट प्रश्न विचारला जातो. अशा या सार्वजनिक मंडळांच्या दहशतीपुढे आवाज उठवण्याची हिम्मत दाखवली ती ३७ वर्षाच्या उच्चशिक्षित विद्यानंद बापट या तरूणाने. डीजे हवाच कशाला, डीजे बंद करा असे उघडपणे सांगण्याची हिंमत मूळचा रत्नागिरीकर असलेल्या विद्यानंद बापट यांनी पुण्यात दाखवली. विद्यानंद हे गेल्या आठ वर्षांपासून पुण्यात नारायण पेठेत राहतात. त्यांचे आई वडिल रत्नागिरीत असतात. त्यांनी मुंबई विद्यापीठातून वाणिज्य विषयात पदवी प्राप्त केली आहे.

श्री. बापट पुण्यात बीपीओचे काम करतात. त्यांचे मराठी आणि इंग्रजी भाषेवर प्रभुत्व आहे. ते संस्कृतप्रचुर मराठी बोलतात, नेहमीच मुद्देसूद चर्चा करतात. आपली भूमिका मांडताना ते अनेकदा संस्कृत सुभाषितांचा आधार घेतात. बोलण्यातून त्यांची विद्वत्ता दिसते आणि विश्वासही जाणवतो. ते कोणत्याही राजकीय पक्षाचे कार्यकर्ते नाहीत. त्यांच्या शुध्द मराठी भाषेतून बोलण्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही कौतुक केले आहे. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या कार्यकर्त्यांचा त्यांच्या भूमिकेला मोठा विरोध पहायला मिळत आहे. असे असतानाही ते मागे हटले नाहीत. गणेशोत्सव मंडळाच्याच एका पदाधिकाऱ्याने हल्ला केला तरी ते डगमगले नाहीत. विद्यानंद बापट म्हणतात, तुम्हाला ध्वनिप्रदुषण होऊ न होता आणि रहदारीला अडथळा न आणता गणेशोत्सव साजरे करायचे नसतील तर अजिबात करू नका, कुणाला काहीच फरक पडणार नाही. कोरोनाकाळात आम्ही हे बघितले आहे. बापट यांनी पुण्यात डीजेला कठोर विरोध करून सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या कार्यकर्त्यांना आपल्या अंगावर ओढून घेतले. पण त्यांची भूमिका पुणेकर जनतेला मनोमन पटल्यामुळेच हजारो पुणेकर आपणहून त्यांच्या समर्थनार्थ रस्त्यावर उतरले आहेत. डीजे नको किंवा ध्वनिप्रदुषण नको, अशी मागणी करण्यात गैर काय? ध्वनि प्रदुषणाविरोधात प्रशासन आणि पोलीस काही ठोस कारवाई करत नाहीत. पुणे पोलिसांकडे गेल्या काही महिन्यांमध्ये ध्वनिप्रदुषणाच्या विरोधात आलेल्या तक्रारींची संख्या चौदा हजारपेक्षा जास्त आहे. मग पोलिसांचे हात कोणी बांधून ठेवले आहेत का?

गेल्या पंचवीस-तीस वर्षांमध्ये ध्वनिप्रदुषणविषयक कायदा मोडला म्हणून कितीजणांना शिक्षा झाली, हे पोलिसांनी आकडेवारी देऊन जाहीर करण्याची गरज आहे. सार्वजनिक मंडळाच्या दादागिरी व दहशतीपुढे पोलीस प्रशासन काही करत नाही म्हणूनच सर्वत्र डीजेचा दणदणाट वाढला आहे. गणेशोत्सवाच्या पूर्वतयारीसाठी पुणे महापालिकेने सालाबादप्रमाणे बैठक बोलावली होती. महापौर, महापालिका व पोलीस दलाचे अधिकारी, सार्वजनिक मंडळांचे पदाधिकारी उपस्थित होते. तिथे विद्यानंद बापट एक नागरीक म्हणून गेले होते. त्यांनी बैठकीत बोलताना डीजेवर पूर्णपणे बंदी घालावी अशी मागणी केली तेव्हा विविध गणेशोत्सव मंडळांचे पदाधिकारी त्यांच्यावर भडकले. आम्हाला असे काही सांगणारे हे कोण, त्यांना प्रथम बाहेर काढा, त्यांना त्यांच्या गल्लीत एक कुत्रंही ओळखत नाही, अशी शेरेबाजीही तेथे झाली. त्या बैठकीत बापट एकटे पडले. त्यांना तिथे कोणी साथ दिली नाही, पण बापटांची भूमिका आणि त्यांचा आवाज दाबण्यासाठी झालेली दादागिरी याचे व्हिडिओ व्हायरल झाल्यावर पुणेकरांना कोणीतरी आपल्या मनातले काही मांडत आहे, हे समजले. त्यानंतरही बापट यांच्यावर गणेशोत्सव मंडळाच्या एका पदाधिकाऱ्याने हल्ला केल्यामुळे बापट यांच्या समर्थनार्थ लोक रस्त्यावर उतरले आणि सोशल मिडियावरून पुण्यातील मंडळांच्या झुंडशाहीचा निषेध करणाऱ्या पोस्टचा वर्षाव सुरू झाला.

श्री. बापट यांचा विरोध ध्वनिप्रदुषणाला आहे, पण ते गणेशोत्सवाला विरोध करत आहेत, असा कांगावा काहींनी सुरू केला. आपण नास्तिक असल्याचे बापट यांनी म्हटले आहे, पण लाखो आस्तिकांना डीजे हवा असेल आणि डीजेच्या तालावर नाचायचे आहे तर एका नास्तिकाचा विरोध का, असा सवाल विचारला जात आहे. लाखो आस्तिकांच्या आनंदावर बंदी कशी घालता येईल, बापट यांनी आस्तिकांची माफी मागावी अशी नवी मागणी पुण्यात सुरू झाली. मुळात विषय हा ध्वनि प्रदुषणाचा आहे. तिथे आस्तिक-नास्तिक हा वाद येतच नाही. गेले तीन महिने गणेशोत्सवातील ध्वनि प्रदुषावर बंदी घाला, डीजे ला परवानगी देऊ नका असे इमेल बापट पोलीस-प्रशासनाला सतत पाठवत होते. पण त्यांच्याकडून काहीच प्रतिसाद न मिळाल्याने त्यांनी डीजेला बंदी घालावी, अशी उघड मागणी केली आणि त्यावरून पुण्यात नवे वादळ निर्माण झाले. मुंबईत २०१५ पासून डीजेवर बंदी आहे. नवी मुंबई, नागपूर, सोलापूर येथेही डीजेवर बंदी आहे. मग पुण्यासह संपूर्ण राज्यात डीजेवर बंदीचा निर्णय जाहीर करायला सरकारला नेमकी अडचण काय आहे, असा सवाल विचारला जात आहे. वस्तुत: या सर्व गदारोळाच्या मुळाशी आवाजाची मर्यादा राखण्याचा आणि कायदापालन करुन गणेशोत्सव साजरा करण्याचा सहजसोपा मुद्दा आहे. त्याचे रुपांतर मोठ्या राजकीय वादात करण्याची गरजच नाही. नियम काटेकोरपणे पाळू, विद्यार्थी-ज्येष्ठ नागरिकांची अडचण लक्षात घेऊ आणि जोशात उत्सव साजरा करु, असे निसंदिग्ध आश्वासन मंडळांकडून का दिले जात नाही? तसे झाले तर हा विषय तिथेच संपेल.

| चर्चा आजची

# शेतकऱ्याच्या जगण्यातच दुष्काळ!

**राकेश लोहार**

जगाचा पोशिंदा असलेला शेतकरी, एकवेळ सर्वांची पोटे भरणारा शेतकरी आज दोन वेळच्या भाकरीसाठी रेशन दुकानाच्या रांगेत उभा राहात आहे, हेच खरे आजच्या शेतीप्रधान देशातील शेतकऱ्याचे भीषण वास्तव आहे. हाच खरा दुष्काळ आहे. तो आज सरकारने जाहीर केला, नेतेमंडळींनी शेताच्या बांधावर जाऊन पाहिला, सुकलेली पाने पाहिली, ढेंगळलेली जमीन पाहिली, कोरडीठाक जमीन पाहिली आणि आभाळाकडे आस लावून बसलेला शेतकरी पाहिला. पण साहेब, हा फक्त गाडीच्या काचा खाली केल्यावर दिसणारा दुष्काळ आहे. हा खरा दुष्काळ नाही. कारण दुष्काळ केवळ शेतात पडत नाही, तो शेतकऱ्याच्या जगण्यात पडतो.

ज्या राबणाऱ्या हातांनी जगाची पोटे भरली, त्या स्वाभिमानी हातांना आज दोन वेळच्या भाकरीसाठी रेशनच्या रांगेत उभे राहावे लागणे, हा खरा दुष्काळ आहे. दावणीतील तीच ती कोरडी चिपाडे चघळणाऱ्या त्या मुक्या जनावरांच्या पोटातील आग आणि त्यांच्या दुःखाने धन्याचा जळणारा जीव, हा खरा दुष्काळ आहे. शेतात पीक उभे राहिले नाही, यापेक्षा घरात चूल पेटणार नाही, पोरांच्या ताटात अन्न वाढता येणार नाही, जनावरांना चारा देता येणार नाही, याची चिंता शेतकऱ्याच्या काळजात घर करून बसते, हा खरा दुष्काळ आहे. प्रत्येक संकटाच्या छाताडावर उभे राहून पाय रोवून उभ्या राहिलेल्या त्या थकलेल्या बापाची हळूहळू जमिनीत रुतत जाणारी आशा आणि हरवत चाललेला श्वास, हा खरा दुष्काळ आहे. वर्षानुवर्षे उन्हातान्हात राबून, पावसाची वाट पाहून, कर्ज काढून, पुन्हा शेती उभी करून जगणाऱ्या शेतकऱ्याच्या हातात आज भविष्याचा आधार उरलेला नाही. पोरांना शिकवून या जमिनीतून बाहेर काढण्याचे स्वप्न पाहणाऱ्या बापानेच पोराच्या पाठीवरचे स्वतःचे दप्तर काढून घेणे, बापाची ही हतबलता, हाच खरा दुष्काळ आहे. ज्या पोरांसाठी त्याने आयुष्यभर मातीशी नाते जोडले, त्याच पोरांच्या शिक्षणाचे स्वप्न परिस्थितीसमोर गुडघे टेकते, तेव्हा दुष्काळाची खरी झळ समोर येते. कारण दुष्काळ पिके जाळतोच; पण त्याहून भयंकर म्हणजे तो स्वप्ने जाळतो. दोन वेळच्या अन्नासाठी सावकारासमोर मान झुकवणारा बाप आणि त्या हतबल थरथरत्या हातांना नियतीने दिलेला विषाचा घोट, हा खरा दुष्काळ आहे.

शेतकरी आत्महत्या ही केवळ आकडेवारी नाही. त्या आकड्यामागे एक संसार असतो, पोरांचे भविष्य असते, पत्नीच्या डोळ्यातील अश्रू असतात, वृद्ध आई-वडिलांची आस असते आणि वर्षानुवर्षे जगण्यासाठी केलेल्या संघर्षाची कहाणी असते. जेव्हा राबणाऱ्या हातांना जगण्याचा मार्ग दिसेनासा होतो, तेव्हा तो दुष्काळ केवळ शेतात राहत नाही; तो घराघरात शिरतो. सणासुदीच्या दिवसांत पोरांच्या कपड्यांवरील काळे-पांढरे ठिगळ आणि चालून चालून चाळण झालेल्या चपला घालण्याची लाचारी, हा खरा दुष्काळ आहे. इतरांच्या घरात सणाचा आनंद असताना आपल्या पोरांच्या चेहऱ्यावर नवीन कपड्यांची अपेक्षा पाहूनही ती पूर्ण करता न येणे, हा बापाचा पराभव नसून व्यवस्थेचा दुष्काळ आहे. आज जगावे की मरावे, हा एकच प्रश्न शेतकऱ्याच्या बांधावर उभा आहे. कारण मराठवाड्याच्या माथ्यावरील कुरूप आजही इतक्या वर्षांनंतर तसेच आहे. दुष्काळ येतो, सरकारे येतात, घोषणा होतात, पंचनामे होतात, मदतीची आश्वासने दिली जातात; मात्र शेतकऱ्याच्या जगण्याचा प्रश्न तिथेच राहतो. पाणी आले नाही म्हणून पिके गेली, पिके गेली म्हणून कर्ज वाढले, कर्ज वाढले म्हणून संसार अडचणीत आला आणि संसार अडचणीत आला की पुन्हा शेतकरी सावकाराच्या दारात उभा राहतो. या चक्रातून शेतकरी बाहेर कधी पडणार, हा खरा प्रश्न आहे. कारण आजचा दुष्काळ केवळ आभाळाने दिलेला नाही; हा वर्षानुवर्षे न सुटलेल्या प्रश्नांचा दुष्काळ आहे. आजचा दुष्काळ ७२ च्या दुष्काळापेक्षाही भयंकर आहे. १९७२ च्या दुष्काळाने हजारो संसार देशोधडीला लागले. मुंबई, पुण्याच्या वेशीवरच्या झोपडपट्ट्या ही ७२ च्या दुष्काळाची भळभळीत जखम आहेत. गाव सोडून शहराच्या आश्रयाला आलेली ही माणसे दुष्काळाच्या ५४ वर्षांनंतरही त्या जखमा घेऊन जगत आहेत. गाव सोडले, जमीन सोडली, शेती सोडली; पण त्या दुष्काळाच्या आठवणी मात्र सोडता आल्या नाहीत. त्या काळात पोटाची खळगी भरण्यासाठी माणसे शहराकडे आली; आज पुन्हा त्याच परिस्थितीची चाहूल लागत असेल, तर हा केवळ इशारा नाही, तर भविष्यासमोर उभा ठाकलेला गंभीर प्रश्न आहे.

शेताच्या बांधावर जाऊन सुकलेली पिके पाहणे सोपे आहे. गाडीच्या काचा खाली करून शेतकऱ्याच्या बांधावर उभे राहणे सोपे आहे. फोटो काढणे, पाहणी करणे, पंचनामे करणे आणि मदतीच्या घोषणा करणेही सोपे आहे. पण त्या शेतकऱ्याच्या घरात जाऊन रिकामी धान्याची कोठी पाहणे, थंड पडलेली चूल पाहणे, पोरांच्या डोळ्यातील प्रश्न पाहणे आणि बापाच्या चेहऱ्यावरची हतबलता पाहणे, हे खरे आव्हान आहे. कारण खरा दुष्काळ शेतात दिसत नाही. तो शेतकऱ्याच्या डोळ्यात दिसतो. तो त्याच्या रापलेल्या हातात दिसतो. तो जनावरांच्या रिकाम्या पोटात दिसतो. तो पोरांच्या फाटलेल्या चपलांत दिसतो. तो सावकारासमोर झुकलेल्या शेतकऱ्याच्या मानेत दिसतो आणि सर्वांत भयंकर म्हणजे तो जगाचा पोशिंदा असलेल्या शेतकऱ्याला स्वतःच्या दोन वेळच्या भाकरीसाठी रेशनच्या रांगेत उभे करतो. म्हणून साहेब, दुष्काळ पाहायचा असेल तर केवळ शेताच्या बांधावर जाऊ नका. त्या शेतकऱ्याच्या घरात जा. त्याच्या चुलीजवळ बसा. त्याच्या पोरांच्या डोळ्यात पाहा. दावणीतील जनावरांकडे पाहा. त्या बापाच्या हातांकडे पाहा. तिथे तुम्हाला दुष्काळाचा खरा चेहरा दिसेल. कारण हा फक्त पावसाचा दुष्काळ नाही, हा पिकांचा दुष्काळ नाही; हा शेतकऱ्याच्या जगण्याचा दुष्काळ आहे. ज्या हातांनी जगाची पोटे भरली, त्याच हातांना दोन वेळच्या भाकरीसाठी रेशनच्या रांगेत उभे राहावे लागत असेल, तर त्यापेक्षा मोठा दुष्काळ दुसरा कोणता असू शकतो?

हा दुष्काळ संपवण्यासाठी केवळ घोषणा नकोत, केवळ पंचनामे नकोत, केवळ आश्वासने नकोत. शेतकऱ्याच्या कष्टाला न्याय, पिकाला योग्य भाव, शेतीला पाणी, जनावरांना चारा आणि त्याच्या कुटुंबाला जगण्याची हमी हवी. कारण शेतकरी वाचला तर शेती वाचेल आणि शेती वाचली तर देशाची भाकरी वाचेल. अन्यथा आज रेशनच्या रांगेत उभा असलेला शेतकरी उद्या आपल्या व्यवस्थेलाच एक कठोर प्रश्न विचारेल; तो म्हणजे, ‘‘जगाचे पोट भरणाऱ्या माझ्या हातांना दोन वेळची भाकरी देण्याची ताकद या देशात नाही का?’’ हा प्रश्न केवळ शेतकऱ्याचा नाही; हा संपूर्ण शेतीप्रधान समाजव्यवस्थेच्या अस्तित्वाचा प्रश्न आहे. आणि या प्रश्नाचे उत्तर आता घोषणांनी नाही, तर कृतीने द्यावे लागेल.

## लोकसंसद

### ‘गुगल’ गुरू चा वाढदिवस!

आजचे युग हे इंटरनेटचे युग आहे. इंटरनेट म्हणजे माहितीचा खजिना. इंटरनेटवर कोणतीही माहिती एका क्लिकवर उपलब्ध असते. कोणतीही माहिती शोधायची असेल तर गुगलवर सर्च केले जाते. अभ्यासाच्या काही नोट्स काढायच्या असतील किंवा काही संदर्भ शोधायचे असेल तर गुगलला सर्च केले जाते. गुगलही क्षणात हवी ती माहिती पुरवते म्हणूनच गुगलला गुरु असे म्हटले जाते. गुगल गुरूमुळे माहितीचा महास्फोट झाला आहे. गुगल म्हणजे इंटरनेट वरील एक विश्वच आहे. आज त्याच गुगल गुरू चा वाढदिवस आहे. अमेरिकेतील मेनलो पार्कमधील सुसान वेजोसिकी गॅरेजमध्ये लॅरी पेज व सर्जेई ब्रिन यांनी ७ सप्टेंबर १९९८ साली गुगल कंपनीची स्थापना केली. लॅरी पेज व सर्जेई ब्रिन यांनी सुरवातीला या कंपनीचे नाव ‘बॅकरब’ असे ठेवले होते. मात्र नंतर ते बदलून गुगल असे ठेवण्यात आले. त्याचे कारणही रंजक आहे. गुगल ही एक गणिती संज्ञा आहे. एकावर १०० शुन्ये दिल्यावर जो आकडा येतो त्याला गुगल म्हटले जाते. मिल्टन सिरोट्टा या गणित तज्ज्ञाने ही संज्ञा शोधून काढली व वापरली. जगातील प्रचंड माहितीच्या साठ्याचे व्यवस्थापन करणे व जगातील कोणालाही ही माहिती सहजगत्या उपलब्ध करून देणे हा हेतू असल्याने कंपनीचे नाव गुगल असे ठेवण्यात आले. गुगल कंपनीची स्थापना ७ सप्टेंबरला झाली असली तरी २००५ पासून कंपनीने २७ सप्टेंबर हा दिवस वाढदिवसासाठी जाहीर केला. या पाठीमागचे कारण म्हणजे २७ सप्टेंबर रोजी गुगलला सर्वात अधिक पेज व्ह्यू मिळाले. २७ सप्टेंबर या दिवशी सर्वात जास्त पेज व्ह्यू मिळाल्याने हाच दिवस गुगलचा वाढदिवस म्हणून साजरा करण्यात यावा असा अट्टाहास गुगलमधील कर्मचाऱ्यांनी धरला. कंपनीने तो मान्य केला तेंव्हापासून म्हणजे २००५ पासून २७ सप्टेंबर याच दिवशी गुगलचा वाढदिवस साजरा केला जातो. ७ सप्टेंबर १९९५ रोजी स्थापन झालेल्या गुगल कंपनीच्या रोपट्याचे आज वटवृक्षात रूपांतर झाले आहे. गुगल ही आज जगातील सर्वात मोठ्या कंपनीपैकी एक कंपनी आहे. गुगल कंपनी केवळ भूतकाळात रमत नाही तर भविष्याचा वेध घेऊन नवीन नवीन फीचर्स आपल्या ग्राहकांना देते. गुगलने त्यांच्या मुख्य शोध यंत्रात अनेकदा सुधारणा केली असून, इतर अनेक उपकरणांवर त्याचा वापर कसा वाढवता येईल याचा विचार केला आहे. १९९८ साली गुगलने तंत्रज्ञानाचे जग नाट्यमयरित्या बदलून टाकले व सर्च इंजिन कायमचे सुधारून टाकले. गुगलवर आपण आपल्याला पडलेल्या कोणत्याही प्रश्नांचे उत्तर शोधू शकतो म्हणूनच आज ज्याच्या त्याच्या तोंडी गुगल गुरू हा शब्द रूढ झाला आहे. जगातील कोणतीही माहिती अथवा प्रश्नाचे उत्तर हवे असल्यास गुगल गुरूला विचारा तो क्षणात ती माहिती किंवा प्रश्नाचे उत्तर तुम्हाला देईल. गुगल गुरूला वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

**– श्याम ठाणेदार, पुणे**

| दिनविशेष

# दैवी स्वरांची देणगी लाभलेल्या लतादीदी

आपल्या मंजुळ आवाजाने संपूर्ण जगाला मोहिनी घालणारी भारताची गान कोकिळा भारतरत्न लता मंगेशकर यांची आज जयंती. लता मंगेशकर यांचा आवाज म्हणजे जगातील आठवे आश्चर्य होते. त्यांचा आवाज म्हणजे रसिकांसाठी मोठी पर्वणीच होती. लता मंगेशकर यांचा जन्म २८ सप्टेंबर १९२९ रोजी इंदूर येथे एका गोमंतकीय कुटुंबात झाला. लता दिदींना गायनाचा वारसा त्यांच्या वडिलांकडून मिळाला. त्यांचे वडील मास्टर दीनानाथ मंगेशकर हे शास्त्रीय गायक आणि नाट्य अभिनेते होते. त्यांच्या वडिलांकडूनच त्यांनी गायनाचे धडे गिरवले. तेच त्यांचे गायनातील पहिले गुरू होते. लता दिदींना लहानपणी हेमा नावाने हाक मारली जायची पण मास्टर दीनानाथ यांच्या एका नाटकातील नाव लतिका असे होते या नावावरूनच त्यांनी त्यांचे नाव लता असे ठेवले. हेच नाव आज जगातील आठवे आश्चर्य ठरले. आपल्या वडिलांच्या संगीत नाट्यात त्यांनी वयाच्या पाचव्या वर्षी काम केले. वयाच्या तेराव्या वर्षी लता दीदींनी गायन क्षेत्रात पाऊल ठेवले आणि १९४२ साली त्यांनी आपले पहिले गाणे रेकॉर्ड केले. किती हसाल? या चित्रपटातील नाचू या गडे खेळू सारे..... हे गाणे त्यांनी गायले मात्र या गाण्याचा चित्रपटात समावेश झाला नाही. त्याचवर्षी मंगळागौर या चित्रपटात नटली चैत्राची नवलाई.... हे गाणे गायले. या चित्रपटात त्यांनी छोटीशी भूमिकाही केली होती. त्यानंतर त्यांनी काही मराठी चित्रपटात गाणी गायली. लता दिदींचे खूप गाजलेले पहिले गाणे म्हणजे १९४९ सालच्या महल चित्रपटातील खेमचंद प्रकाश या संगीतकाराने स्वरबद्ध केलेले आयेगा आनेवाला.... हे गाणे इतके लोकप्रिय झाले की त्यांच्याकडे संगीतकारांची रांग लागली. त्यांनी गायलेली गाणी लोकप्रिय होऊ लागली. १९५० नंतर दिदींचा उत्कर्षाचा काळ सुरू झाला. त्या काळातील नौशाद, सज्जाद, वसंत देसाई, दत्ता डावजेकर यासारखे जुने आणि त्या काळात उदयाला येणारे एस डी बर्मन, सी रामचंद्र, शंकर - जयकिशन, मदन-मोहन, उषा खन्ना, कल्याणजी - आनंदजी, रवी, लक्ष्मीकांत - प्यारेलाल, आर डी बर्मन अशा सर्वच संगीतकारांकडे दीदी गाऊ लागल्या. या सगळ्यांकडे गायलेल्या दिदींच्या गाण्याला अमाप लोकप्रियता मिळत गेली. त्यांच्या आवाजाने रसिक तृप्त होत गेले. १९६२ साली चीनने भारतावर आक्रमण केले. त्या युद्धात भारताचे शेकडो जवान धारातीर्थी पडले. या शहीद जवानांना श्रद्धांजली वाहण्यासाठी २७ जून १९६३ रोजी दिल्लीत एक समारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी एक खास गीत कवी प्रदीप यांनी लिहिले आणि सी. रामचंद्र यांनी संगीतबद्ध केले होते. ते गीत लता दीदींनी गायले. ते गीत आजही लोकप्रिय असलेले ये मेरे वतन के लोगो....... हे गीत ऐकून तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना आपले आश्रू आवरता आले नाही. मराठीतही दीदींनी असंख्य गाणी गायली. आनंदघन या नावाने दीदींनी काही चित्रपटांना संगीतही दिले. जवळपास सात दशके आपल्या मंजुळ आवाजाने रसिकांना मंत्रमुग्ध करणाऱ्या लता दीदींनी जवळपास एक हजार चित्रपटातून ३० हजारांहून अधिक गाणी गायली.

**- श्याम ठाणेदार, पुणे**

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

- मुख्य संपादक,कृषीवल


## अंबा घाटावर गणेशभक्तांची गर्दी

**नागोठणे :** नागोठणे शहर व परिसरांतील अनंत चतुर्दशीच्या २२० खासगी व ८ सार्वजनिक गणपती बाप्पांना शुक्रवारी (दि.२५) भावपूर्ण निरोप देण्यात आला. अनंत चतुर्दशीच्या बाप्पांच्या विसर्जनाच्या वेळी पावसाने पूर्णपणे विश्रांती घेतल्याने नागोठण्यातील अंबा विसर्जन घाटावर गणेशभक्तांची गर्दी पहायला मिळाली.

नागोठणे शहर व ग्रामीण भागात आपल्या लाडक्या बाप्पांना निरोप देण्यासाठी सायंकाळी पाच वाजल्यापासूनच सुरुवात झाली होती. नागोठणे शहर व परिसरांत पारंपारिक पद्धतीने ढोल ताशांच्या गजरात वाजत, गाजत, नाचत बाप्पांची मिरवणूक काढण्यात आली. नागोठणे व परिसरांत तलाव व अंबा नदीमध्ये बाप्पांचे विसर्जन करण्यात आले.

नागोठण्यातील अंबा घाटावरील विसर्जनस्थळी नागोठणे ग्रामपंचायतीने मंडप उभारून विसर्जनासाठी येणाऱ्या बाप्पांवर पुष्पवृष्टी करण्याची व्यवस्था केली होती. नागोठण्यातील सार्वजनिक गणपतींमध्ये दरवर्षीप्रमाणे यावर्षीही सर्वात आधी सायंकाळी ६.५० वाजता श्री गणेशोत्सव मंडळ हायवेनाकाच्या गणपतीचे विसर्जन करण्यात आले.

नागोठणे पोलीस ठाण्याचे सपोनि रविंद्र पारखे यांच्या मार्गदर्शनाखाली २ पोलीस अधिकारी, ३२ पोलीस अंमलदार व १० होमगार्ड यांच्याकडून नागोठणे व परिसरांतील विसर्जन स्थळी सर्वत्र चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# लाडक्या बाप्पाला भावपूर्ण निरोप

## ● 'गणपती बाप्पा मोरया'चा जयघोष; परिसरात भक्तिमय वातावरण

**| खांदेश्वर | प्रतिनिधी |**

दोन महिन्यांपासून केलेली तयारी, सजावट आणि नियोजन यानंतर ढोल-ताशांच्या गजरात लाडक्या गणरायाचे आगमन झाले. 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषाने पनवेल परिसर भक्तिमय झाला होता. मात्र, अनंत चतुर्दशीचा दिवस उजाडताच बाप्पाला निरोप देण्याची वेळ आली. विसर्जन मिरवणुकीसाठी पनवेल शहरातील रस्ते भक्तांच्या गर्दीने फुलून गेले. ढोल-ताशांचा निनाद, लेझीमचे ताल आणि गुलालाची उधळण करत गणरायाला निरोप देण्यात आला.



आगमनाच्या दिवसापासून पुढील बारा दिवस भक्तांनी बाप्पाची मनोभावे सेवा केली. सकाळ-संध्याकाळ आरती, प्रसाद, भजन आणि विविध धार्मिक कार्यक्रमांनी मंडळांच्या परिसरात उत्साहाचे वातावरण होते. विसर्जनाच्यावेळी बाप्पाच्या चरणी नतमस्तक होताना भक्तांनी आपल्या मनातील इच्छा आणि घरातील सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली. लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत प्रत्येकाच्या चेहऱ्यावर बाप्पाच्या दर्शनाचा आनंद दिसत होता.

काही मंडळांनी आकर्षक सजावटीसह भव्य मिरवणुका काढल्या. 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या'च्या घोषणांनी वातावरण दुमदुमून गेले.

बाप्पाच्या विसर्जनाच्या क्षणी अनेक भक्तांच्या डोळ्यांत अश्रू तरळले. बारा दिवस घरात आणि मंडळात असलेला बाप्पा आता निरोप घेत असल्याची हुरहूर भक्तांच्या मनात होती.

विसर्जन मिरवणुकीत सहभागी झालेल्या प्रत्येक भक्ताच्या मनात एकच भावना होतीबाप्पा पुन्हा लवकर यावा. जाताना बाप्पाने आपल्या कुटुंबाला सुखी ठेवावे, अशी प्रार्थना अनेकांनी केली.

काहींनी आरोग्य मागितले, तर काहींनी व्यवसाय-नोकरीत यश मिळावे, अशी इच्छा व्यक्त केली.

विद्यार्थ्यांनी शिक्षणात यश मिळावे, तर पालकांनी आपल्या मुलांचे भविष्य उज्ज्वल व्हावे, अशी मागणी केली. घरातील अडचणी दूर व्हाव्यात आणि प्रत्येकाच्या आयुष्यात आनंद नांदावा, अशीही प्रार्थना करण्यात आली.

कोणाच्याही घरी दुःख येऊ नये, सर्वांना सुख-शांती आणि समाधान मिळावे, अशी सामूहिक भावना दिसून आली. बाप्पाच्या मूर्तीसमोर हात जोडून अनेक भक्तांनी मनातील इच्छा व्यक्त केल्या.

विसर्जनाच्या वेळी 'बाप्पा, पुढच्या वर्षी नक्की या' अशी भावनिक साद भक्तांनी घातली.

मिरवणुकीतील उत्साह आणि निरोपाच्या क्षणातील भावूक वातावरण यामुळे पनवेलमध्ये गणेशोत्सवाची सांगता झाली.

जरी बाप्पा पाण्यात विसर्जित झाला असला, तरी त्याच्या आठवणी आणि भक्तीचा सुगंध प्रत्येकाच्या मनात कायम राहणार आहे. आता पुढील वर्षी पुन्हा त्याच उत्साहाने गणरायाच्या आगमनाची प्रतीक्षा सुरू झाली आहे.

'गणपती बाप्पा मोरया... पुढच्या वर्षी लवकर या!' या जयघोषात पनवेलकरांनी लाडक्या बाप्पाला भावपूर्ण निरोप दिला.

## खांब विभागात बाप्पांना भक्तिभावाने निरोप

**| खांब | प्रतिनिधी |**

गणेश चतुर्थीच्या दिवशी मोठ्या भक्तीमय वातावरणात घरोघरी आगमन झालेल्या गणरायांचे शुक्रवारी (दि.२५) रोहा तालुक्यातील खांब विभागात मोठ्या भक्तीमय वातावरणात विसर्जन करून भावपूर्ण निरोप देण्यात आला.



गणेश चतुर्थीला मोठ्या आनंददायी व भक्तीमय वातावरणात गणरायाची घरोघरी स्थापना केल्यानंतर दररोज मनोभावे पूजन, भजन, आरती, हरिपाठ, किर्तन, जागर भजन आदी धार्मिक तथा अध्यात्मिक कार्यक्रमाबरोबरच पुरूष व महिला वर्गाचे नृत्य तसेच काही ठिकाणी अन्य मनोरंजनाचे कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडले.

विसर्जनाच्या बाराव्या दिवशी मोठ्या उत्साहात व भक्तीमय वातावरणात घरोघरी व सार्वजनिक ठिकाणी विराजमान झालेल्या बाप्पांना निरोप देण्यात आला. टाळ मृदुंग वाजवित हरिनामाच्या गजरात सार्वजनिक तलाव, नद्या आदी ठिकाणी 'गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या' अशी आर्त साद घालून गणरायांचे विसर्जन करण्यात आले. या विसर्जनावेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी प्रशासनाकडूनही पुरेशी खबरदारी घेऊन ठिकठिकाणी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## उत्साही वातावरणात गणेशाचे विसर्जन



**| म्हसळा | प्रतिनिधी |**

म्हसळा तालुक्यातील दहा दिवसाच्या बाप्पांचे विसर्जन शांततेत आणि उत्साही वातावरणात करण्यात आले. तालुक्यातील सुमारे ३५० घरगुती आणि म्हसळा शहरातील बंजारी समाजाचा एकमेव सार्वजनिक गणपतींना निरोप देण्यात आला.

त्यामध्ये म्हसळा शहरातील, सुरई, म्हसळा आदिवासी वाडी, म्हसळा गौळवाडी येथील सुमारे ३० ते ३५ बाप्पांचा समावेश आहे. ढोल ताशांच्या माध्यमातून वाजत गाजत काढण्यात आलेल्या विसर्जन मिरवणुकीत शहरातील सारेच उत्साहात सहभागी झाले होते.

उपविभागीय पोलीस अधिकारी योगिता कुटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक आणि उपनिरीक्षक यांनी सर्वत्र चोख पोलीस बंदोबस्त तैनात ठेवला होता. विसर्जनस्थळी नगरपंचायतीने लाईटची व्यवस्था केली होती. मुख्याधिकारी विठ्ठल राठोड आणि नगरपंचायतीचे सर्व कर्मचारी प्रत्यक्ष हजर होते.

## टाळ-मृदुंगाच्या गजरात कांबळेकर परिवाराच्या गणरायाला निरोप



**| तळा | प्रतिनिधी |**

तळा तालुक्यात वारकरी संप्रदायाची परंपरा अविरत जपणाऱ्या कांबळेकर परिवाराच्या गणपती बाप्पाचे पारंपरिक पद्धतीने भक्तिमय वातावरणात विसर्जन करण्यात आले. गेले १२ दिवस कांबळेकरांच्या घरी गणरायाच्या दरबारात वारकरी परंपरेचा जागर सुरू होता. दररोज भजन, पारंपरिक गीते, वारकरी संप्रदायावर आधारित प्रवचन आणि पौराणिक देखाव्यांचे आयोजन करण्यात आले होते. टाळ-मृदुंगाच्या गजरात बाप्पाची सेवा करण्यात आली. विसर्जनाच्या दिवशी समस्त कांबळेकर परिवार, नातेवाईक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने दिंडीत सहभागी झाले होते.

## बाप्पाला निरोप देताना डोळ्यांत अश्रू





**| खांदेश्वर | प्रतिनिधी |**

बारा दिवस भक्तांच्या घरात आणि मंडळांच्या मंडपात विराजमान झालेल्या लाडक्या गणरायाला अखेर भावपूर्ण निरोप देण्यात आला. अनंत चतुर्दशीच्या दिवशी पनवेलमधील विविध विसर्जन घाटांवर गणेशभक्तांची मोठी गर्दी उसळली होती.

कोळीवाडा, गाढी नदी, खांदेश्वर सरोवर, बल्लाळेश्वर तसेच गणेश विसर्जन घाटांवर सकाळपासूनच गणेशमूर्तींच्या विसर्जनासाठी भक्तांची लगबग सुरू होती. ढोल-ताशांचा गजर, गुलालाची उधळण आणि 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. मात्र, बाप्पाला निरोप देतानाचा क्षण अनेकांसाठी भावूक करणारा ठरला. लाडक्या बाप्पाची शेवटची आरती करताना चिमुकल्यांचेही कंठ दाटून आले. आरतीच्या ताटासमोर हात जोडून आपल्या बाप्पाकडे पाहताना त्यांच्या डोळ्यांत विरहाचे अश्रू तरळले.

विसर्जनाच्या क्षणापर्यंत बाप्पाचे रूप डोळ्यांत साठवून ठेवण्याचा भक्तांचा प्रयत्न सुरू होता. बाप्पाची मूर्ती पाण्यात विसर्जित होत असताना अनेक भक्तांचे डोळे पाणावले.

## पारंपरिक वाद्यांच्या गजरात बाप्पाला निरोप

**| पाली/बेणसे | प्रतिनिधी |**

पाली सुधागडसह शिहू-बेणसे विभागात अनंत चतुर्दशीच्या दिवशी गणरायाला भावपूर्ण वातावरणात निरोप देण्यात आला. यावेळी सकाळपासूनच आंबा नदीसह विविध विसर्जन घाटांवर गणेशभक्तांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. तर सायंकाळी ढोल-ताशांचा गजर, गुलालाची उधळण आणि पुढच्या वर्षी लवकर येण्याचे साकडे घातले.



■ (छायाचित्र: धम्मशील सावंत)

अनेक ठिकाणी मिरवणुकांमध्ये ढोल-ताशा पथके, लेझीम आणि पारंपरिकवाद्यांच्यागजरातगणेशमूर्ती विसर्जनासाठी नेण्यात आल्या. शिहू बेणसे झोतीरपाडा परिसरातही उत्साह शिगेला पोहचला होता. दरम्यान, विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर प्रशासन आणि स्थानिक स्वराज्य संस्थांकडून विविध विसर्जन घाटांवर सुरक्षा, वाहतूक नियंत्रण, प्रकाश व्यवस्था, वैद्यकीय सुविधा आणि आपत्कालीन यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली होती.

## श्रीवर्धनमध्ये पारंपरिक पद्धतीत गणेश विसर्जन

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

श्रीवर्धन शहरात अनंत चतुर्दशीचे घरगुती तसेच सार्वजनिक गणपतींचे भक्तिमय वातावरणात विसर्जन करण्यात आले. यावर्षी ६७ घरगुती गणेशमूर्तींसह सोमजाई मंदिर, कसबा पेठ आणि श्रीवर्धन आगार येथील सार्वजनिक गणपतींचे विसर्जन पारंपरिक पद्धतीनुसार करण्यात आले. विविध पाखाड्या आणि आळींमधील घरगुती गणपती एकत्रित आणून श्रींचे विसर्जन करण्याची परंपरा यंदाही कायम राखण्यात आली.

विसर्जन दरम्यान मृदंग आणि टाळांच्या गजरात पारंपरिक भजने सादर करण्यात आली. गणेशमूर्तींना निरोप देण्यासाठी समुद्रकिनाऱ्यावर भाविकांनी मोठी गर्दी केली होती. कोणताही अनुचित प्रकार घडू नये आणि विसर्जन प्रक्रिया सुरळीत पार पडावी, यासाठी श्रीवर्धन नगरपरिषद प्रशासनाकडून चोख व्यवस्थापन ठेवण्यात आले होते. समुद्रकिनाऱ्यावर सुरक्षारक्षक, जीवरक्षक आणि आपत्कालीन यंत्रणा तैनात करण्यात आली होती.

■ (छायाचित्र: समीर रिसबूड)



**गणेशोत्सव निर्विघ्न पार पाडण्यासाठी पोलीस यंत्रणा सज्ज | घाटांसह मिरवणूक मार्गांचा घेतला आढावा**

# खांदेश्वर येथे विसर्जन सोहळ्याला शिस्तबद्ध स्वरुप

**| खांदेश्वर | प्रतिनिधी |**

गणेशोत्सवाच्या बारा दिवसांत भक्तीचा उत्साह शिगेला पोहोचला असताना, हा उत्सव शांततेत आणि कोणत्याही विघ्नाविना पार पडावा, यासाठी नवी मुंबई पोलिसांनी रात्रंदिवस बंदोबस्त ठेवला होता. गणेशोत्सवाच्या सुरुवातीपासूनच पोलिस अधिकारी आणि कर्मचारी विविध भागांत सतत गस्त घालत होते.



अनंत चतुर्दशीच्या दिवशी गणेशमूर्तींच्या विसर्जनासाठी पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील विविध विसर्जन घाटांवर गणेशभक्तांची मोठी गर्दी झाली. या पार्श्वभूमीवर पोलीस अधिकारी, कर्मचारी आणि वाहतूक पोलिसांनी घाटांसह मिरवणूक मार्गांचा आढावा घेतला. कोळीवाडा, गाढी नदी, खांदेश्वर सरोवर, बल्लाळेश्वर तसेच अन्य विसर्जनस्थळांवर पोलिसांची विशेष नजर होती. विसर्जन मिरवणुका सुरळीत पार पडाव्यात, गर्दीचे नियोजन व्हावे आणि वाहतुकीला अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी पोलिसांकडून विशेष नियोजन करण्यात आले.

गणेशभक्तांची गर्दी वाढत असताना पोलीस अधिकारी प्रत्यक्ष ठिकाणी उपस्थित राहून परिस्थितीचा आढावा घेत होते. मिरवणुकीतील गर्दी, वाहतूक व्यवस्था आणि विसर्जन घाटावरील सुरक्षितता याकडे पोलिसांकडून लक्ष देण्यात आले.

बारा दिवस डोळ्यांत तेल घालून कर्तव्य बजावणाऱ्या पोलीस अधिकारी-कर्मचाऱ्यांमुळे गणेशोत्सवाच्या काळात सुरक्षा व्यवस्थेला महत्त्व प्राप्त झाले. भक्तांचा उत्साह कायम ठेवत कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवण्याचे आव्हान पोलिसांनी पेलले.

अनंत चतुर्दशीच्या दिवशीही पोलीस अधिकारी आणि कर्मचारी विसर्जन घाटांवर तैनात राहून परिस्थितीवर लक्ष ठेवत होते. त्यामुळे विसर्जन सोहळ्याला शिस्तबद्ध स्वरूप मिळाले.

## निवडक



### कर्जतमध्ये बाप्पांचे उत्साहात विसर्जन

**नेरळ** : कर्जत तालुक्यात ९,५९० बाप्पा विराजमान झाले होते. त्यापैकी ४२४ बाप्पा अनंत चतुर्दशीपर्यंत भक्तांनी विराजमान केले होते. या बाप्पांना बहुतांश ठिकाणी वाहत्या पाण्यात विसर्जन करून निरोप देण्यात आला. यादरम्यान, तालुक्यात सर्वत्र शांततेत विसर्जन सोहळा पार पडला असून, कर्जत नगरपरिषद, नेरळ ग्रामपंचायत आणि दहिवली तर्फे वरेडी ग्रामपंचायतीमध्ये विसर्जन सोहळ्यासाठी भव्य शामियाने उभारण्यात आले होते. यावेळी विसर्जनासाठी दहिवली, प्रति पंढरपूर, मुद्रा, महावीर पेठ, शनि मंदिर याशिवाय गुंडगे आणि भिसेगाव येथे नगरपरिषदेकडून व्यवस्था करण्यात आली होती. नेरळ-कळंब रस्त्यावर उल्हास नदीवरील दहिवली पुलावर गणेश घाटांवर गणेश भक्तांसाठी व्यवस्था करण्यात आली होती. तेथे मोठ्या प्रमाणावर गणेशभक्त आपल्या बाप्पांना निरोप देण्यासाठी घेऊन येत होते. तेथे वाहत्या पाण्यात ग्रामपंचायत तसेच स्थानिक कार्यकर्त्यांनी गणेशमूर्तींचे विसर्जन केले.



### खांब देवकान्हेत गणपती बाप्पांना निरोप

**कोलाड** : खांब, देवकान्हे विभागातील दहा दिवसांच्या गणपती बाप्पांच्या विसर्जनाला पावसाची मोठी विश्रांती मिळाल्याने गणेशभक्तांनी भक्तिमय वातावरणात बाप्पाला निरोप दिला. यावेळी सार्वजनिक आणि खासगी बाप्पांचे विसर्जन ढोल-ताशे, ख्यालू बाजा व फटाक्याची आतिषबाजी करण्यात आली. दुपारी चार वाजल्यानंतर गणरायांचे विसर्जन करण्यासाठी नदी व तलाव या ठिकाणी गर्दी उसळली होती. तत्पूर्वी कोलाड पोलीस प्रशासनाच्यावतीने दुपारपासूनच कोलाड विसर्जन स्थळांकडे जाणारे मार्ग मोकळे रहावेत, यासाठी मुंबई-गोवा मार्गावरील सुकेळी खिंड ते तिसे तळवली भुवन आणि काही ठराविक ठिकाणी गस्त घालण्यात आली होती.

### पालीत 'डीजे'मुक्त गणेशोत्सवाची परंपरा

(छायाचित्र: गौसखान पठाण)



**सुधागड-पाली :** पाली शहरातील गणरायाला शुक्रवारी (दि.२५) भक्तिमय आणि भावपूर्ण वातावरणात निरोप देण्यात आला. यावेळी 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या'च्या जयघोषाने संपूर्ण पाली शहर दुमदुमून गेले होते. तसेच, विविध गणेश मंडळांच्या विसर्जन मिरवणुका उत्साहात पार पडल्या. तसेच, यंदा पालीत डीजेमुक्त गणेशोत्सवाची सकारात्मक दिशा पाहायला मिळाली. डीजे, डॉल्बी आणि लेझरचा दणदणाट टाळून पारंपरिक ढोल-ताशांच्या गजरात आणि गणरायाच्या जयघोषात विसर्जन मिरवणुका पार पडल्या. प्रशासनाच्या आवाहनाला गणेश मंडळं आणि नागरिकांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. गणेश विसर्जनासाठी पाली नगरपंचायतीकडून विसर्जन घाटांवर आवश्यक व्यवस्था करण्यात आली होती. तसेच, निर्माल्य नदीपात्रात जाऊ नये, यासाठी निर्माल्य संकलनाची व्यवस्था करण्यात आली होती. विसर्जन मिरवणुका शांततेत आणि सुरळीत पार पडाव्यात, यासाठी पोलिसांकडूनही चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

### गणरायाला भावपूर्ण वातावरणात निरोप

**सोगाव :** अलिबाग तालुक्यातील सोगाव, मुनवली येथे यंदाच्या गणेशोत्सव काळातील शुक्रवारी दि.२५ बारा दिवसांनी अनंत



चतुर्दशीच्या गणरायाला भावपूर्ण वातावरणात निरोप देऊन विसर्जन करण्यात आले. या गणेशोत्सव काळात गणरायाच्या आगमनानंतर आरती, पूजन, भजन, नाच व इतर अनेक अध्यात्मिक कार्यक्रमाचे ठिकठिकाणी आयोजन करण्यात आले होते. यावेळी लहानांपासून मोठ्यांपर्यंतच्या महिला व पुरुष गणेश भक्तांमध्ये आनंदाचे व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. एकंदरीतच हा गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

### गणरायाला वाजत-गाजत निरोप

**कोलाड :** गेले १० दिवस कोलाड पोलिसांनी बंदोबस्ताची जबाबदारी पार पडल्यानंतर कोलाड पोलीस ठाण्यात विराजमान झालेल्या गणरायाला शनिवारी (दि.२६) भक्तिमय वातावरणात भावपूर्ण निरोप देण्यात आला. पोलीस अधिकारी, भारत फ़ारने



कर्मचारी तसेच नागरिकांच्या उपस्थितीत गणेशमूर्तीची ताशांच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली. 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या'च्या जयघोषात गणरायाचे थाटात विसर्जन करण्यात आले. यावेळी पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी गणरायाची विधिवत पूजा-अर्चा करून आरती केली. विसर्जन मिरवणुकीत पोलीस कर्मचारी तसेच नागरिक मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते. ताशांचा गजर, गणरायाचा जयघोष आणि भक्तांच्या उत्साहामुळे संपूर्ण परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. विसर्जन सोहळा शांततेत, उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात पार पडला.

# हुतात्म्यांच्या स्मृती अमर राहतील

**|| पालकमंत्री भरत गोगावले यांचे प्रतिपादन || चिरनेरमध्ये 'हुतात्मे अमर रहे'च्या ललकारांनी जागा झाला शौर्याचा इतिहास**

| चिरनेर | प्रतिनिधी |

चिरनेरच्या भूमीत स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या हुतात्म्यांचे स्मरण म्हणजे देशाच्या स्वातंत्र्यलढ्याच्या जाज्वल्य इतिहासाला उजाळा देणे होय. जोपर्यंत चंद्र-सूर्य आहेत, तोपर्यंत छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांच्याप्रमाणेच स्वातंत्र्यासाठी प्राणाची आहुती देणाऱ्या हुतात्म्यांच्या स्मृतीही तेजाने कायम तेवत राहतील, असे प्रतिपादन कॅबिनेट मंत्री तथा रायगडचे पालकमंत्री भरत गोगावले यांनी केले.



उरण तालुक्यातील चिरनेर येथे २५ सप्टेंबर १९३० रोजी झालेल्या जंगल सत्याग्रहातील हुतात्म्यांच्या ९६व्या स्मृतीदिनानिमित्त शुक्रवारी (दि.२५) शासकीय इतमामात अभिवादन सोहळा झाला. यावेळी गोगावले अध्यक्षीय भाषणात बोलत होते.

ब्रिटिश पोलिसांनी जंगल सत्याग्रहात सहभागी आंदोलकांवर केलेल्या बेछूट गोळीबारात धाकू गवत्या फोफेरकर, नाग्या महादू कातकरी, आलू बेमट्या म्हात्रे, आनंदा माया पाटील, रामा बामा कोळी, रघुनाथ मोरेश्वर न्हावी, परशुराम रामा पाटील आणि हसुराम बुध्या पाटील या आठ शूर शेतकऱ्यांना हौतात्म्य आले होते. त्यांच्या बलिदानाचे स्मरण दरवर्षी २५ सप्टेंबर रोजी करण्यात येते.

यावेळी गोगावले म्हणाले की, हुतात्म्यांच्या स्मृतिदिनाला मंत्री उपस्थित राहिले तर काही वेगळे घडते, असे मला समजले. मात्र, ज्यांनी मातृभूमीसाठी प्राणाची आहुती दिली, त्यांचे स्मरण करण्यासाठी आत्ताच नव्हे तर, यापुढेही येणार आहे. हुतात्मा स्मृतीदिनाचा शताब्दी महोत्सव मोठ्या दिमाखात साजरा करू, असे आश्वासन त्यांनी दिले.

नैना, एमएमआरडीएसारख्या विकास प्रकल्पांसाठी शेतकरी महत्त्वाचा आहे. शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन सकारात्मक चर्चा करत प्रश्न प्राधान्याने सोडवू, असेही त्यांनी सांगितले. आ. महेश बालदी यांनीही शेतकऱ्यांच्या प्रश्नांमध्ये त्यांच्या पाठीशी राहण्याची ग्वाही दिली.

यावेळी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, माजी आमदार बाळाराम पाटील, माजी आमदार मनोहर भोईर, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, सरपंच भास्कर मोकल, पी.पी. खारपाटील, संतोष ठाकूर, तहसीलदार उद्धव कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक जगदीश शेलकर यांच्यासह विविध मान्यवर, ग्रामस्थ, हुतात्म्यांचे नातेवाईक व इतिहासप्रेमी उपस्थित होते.

महाराष्ट्र पोलीस दलातर्फे हुतात्मा स्मृतीस्तंभासमोर हवेत २१ फैरी झाडून व बिगुल वाजवून शासकीय मानवंदना देण्यात आली. मान्यवरांनी स्मृतीस्तंभाला पुष्पचक्र अर्पण केले. हुतात्मा चौकातील पूर्णाकृती शिल्पांनाही पुष्पमाला अर्पण करण्यात आल्या. यावेळी 'हुतात्मे अमर रहे'च्या ललकारांनी चिरनेरची शौर्यभूमी दुमदुमून गेली.

सरपंच भास्कर मोकल यांनी सेझबाधित शेतकऱ्यांना जमिनी परत मिळाव्यात, ३५ सेक्शन व वन शिक्क्यांचे प्रश्न, वाहतूक कोंडी तसेच गावातील विकासकामांसाठी निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी केली.

चिरनेर ग्रामपंचायत, उरण पंचायत समिती व रायगड जिल्हा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी हुतात्मे व स्वातंत्र्यसैनिकांच्या नातेवाईकांचा सत्कार करण्यात आला. तसेच अक्कादेवी येथील जंगल सत्याग्रहाच्या रणभूमीवरील हुतात्मा नाग्या महादू कातकरी यांच्या पूर्णाकृती स्मृतीस्तंभाला पेण, कर्जत, पनवेल व उरण तालुक्यातील आदिवासी बांधवांनी मानवंदना देऊन अभिवादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नितेश पंडित यांनी केले.

## निवडक

### परवानगीविना रसविक्रीचा धंदा

**उरण :** उरण शहर व परिसरात विविध नियम धाब्यावर बसवून व्यवसाय सुरू असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत असताना, आता रसवंतीगृहांच्या कारभाराचाही प्रश्न ऐरणीवर आला आहे. काही रसवंतीगृहांकडे गुमास्ता परवाना अथवा इतर आवश्यक परवानग्या नसतानाही खुलेआम रसविक्रीचा व्यवसाय सुरू असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे संबंधित यंत्रणांच्या कारभारावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. रसवंतीगृहांमध्ये स्वच्छतेच्या नियमांना हरताळ फासला जात असल्याची तक्रार असून, रस तयार करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या बर्फाच्या गुणवत्तेबाबतही गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात येत आहेत. अस्वच्छ परिसर, स्वच्छतेकडे दुर्लक्ष आणि निकृष्ट दर्जाचा बर्फ वापरला जात असल्यास त्याचा थेट परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होऊ शकतो. त्यामुळे संबंधित रसवंतीगृहांची तातडीने तपासणी करून वस्तुस्थिती समोर आणण्याची मागणी होत आहे. याशिवाय संबंधित व्यवसायिकांकडे गुमास्ता अथवा व्यवसायासाठी आवश्यक इतर परवानग्या आहेत का, अन्नसुरक्षा विभागाची नोंदणी किंवा परवाना आहे का, स्थानिक स्वराज्य संस्थेची परवानगी घेण्यात आली आहे का, तसेच व्यवसायाच्या ठिकाणी आरोग्य व स्वच्छतेच्या नियमांचे पालन केले जाते का, याचीही चौकशी करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे. नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित बाब असल्याने केवळ कागदोपत्री नोटिसा न बजावता नियमांचे उल्लंघन आढळल्यास कायद्यानुसार कठोर कारवाई करावी. तसेच परवानगी नसलेल्या व्यवसायांवर कारवाई न करण्यामागे कोणाची भूमिका आहे, याचीही चौकशी करण्याची मागणी होत आहे. आता प्रशासन या तक्रारींची दखल घेऊन प्रत्यक्ष कारवाई करणार की पुन्हा 'तपासणी सुरू आहे'च्या फेऱ्यात प्रकरण अडकणार, याकडे उरणकरांचे लक्ष लागले आहे.

■ उरणमध्ये कारवाईचा बोजवारा?

### कुंडलिकेच्या प्रवाहात अडकलेल्या व्यक्तीची सुखरुप सुटका



**रोहा :** रोहा धाटाव एमआयडीसी परिसरातील जैनवाडी येथील कुंडलिका नदीमध्ये एक व्यक्ती अंघोळीसाठी गेली होती. परंतु, नदीचा प्रवाह अचानक वाढल्याने ती व्यक्ती नदीपात्राच्या मध्यभागी अडकली. तब्बल चार तासांच्या अथक प्रयत्नांनंतर सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ रेस्क्यू टीमने या व्यक्तीची सुखरूप सुटका केली. संबंधित व्यक्ती सकाळच्या सुमारास कुंडलिका नदीत अंघोळीसाठी गेली होती. अंघोळ करत असताना अचानक नदीच्या पाण्याचा प्रवाह वाढल्याने तिला नदीपात्रातून बाहेर पडता आले नाही. त्यामुळे ती नदीच्या मध्यभागी अडकून पडली. घटनेची माहिती मिळताच सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ रेस्क्यू टीमने घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले. नदीचा वाढलेला प्रवाह आणि प्रतिकूल परिस्थितीमुळे बचावकार्य आव्हानात्मक ठरले. अखेर चार तासांच्या प्रयत्नांनंतर रेस्क्यू टीमला संबंधित व्यक्तीला सुरक्षितपणे नदीबाहेर काढण्यात यश आले. सुखरूप सुटका झाल्याने मोठा अनर्थ टळला. पावसाळ्यात नदीच्या पाण्याच्या प्रवाहात अचानक वाढ होण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी नदीपात्रात उतरताना विशेष खबरदारी घ्यावी, असे आवाहन पोलिसांच्यावतीने करण्यात आले आहे.



### रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**चणेरा :** धाटाव औद्योगिक क्षेत्रातील सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या डीएमसीसी स्पेशालिटी कंपनीच्या वतीने गुरुवारी (दि.२४) कंपनीच्या परिसरात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. जिल्हा शासकीय रक्त केंद्र, सिव्हिल हॉस्पिटल अलिबाग, रायगड यांच्या वतीने हे रक्तदान शिबीर घेण्यात आले. कंपनीच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित या शिबिराला कंपनीतील कंत्राटी कामगार, कायमस्वरूपी कामगार, स्टाफ कर्मचारी, कार्यालयीन कर्मचारी तसेच कंपनीचे अधिकारी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या शिबिरात तब्बल १०८ रक्तदात्यांनी रक्तदान करून १०८ रक्तपिशव्यांचे संकलन करण्यात आले. वर्धापन दिनानिमित्त आयोजित या उपक्रमातून 'उद्योगाची प्रगती आणि समाजसेवा' हा संदेश अधोरेखित झाला.

## नवी मुंबई विमानतळाच्या तिसऱ्या टप्प्याची निविदा प्रक्रिया सुरू

| पनवेल | विशेष प्रतिनिधी |

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या विस्ताराची प्रक्रिया आता प्रत्यक्ष निविदा टप्प्यात पोहोचली आहे. सिडकोच्या भागीदारीतील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ कंपनीकडून (एनएमआयएएल) विमानतळाच्या तिसऱ्या टप्प्याच्या विकासासाठी इच्छुक कंपन्यांकडून 'एक्स्प्रेशन ऑफ इंटरेस्ट कम रिक्वेस्ट फॉर क्वालिफिकेशन' मागविण्यात आले आहे. विमानतळाच्या अधिकृत संकेतस्थळावर २१ सप्टेंबर २०२६ रोजी ही निविदा प्रसिद्ध करण्यात आली असून, इच्छुक कंपन्यांना १३ ऑक्टोबर रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत अर्ज करता येणार आहे.

नवी मुंबई विमानतळाच्या पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यांची प्रवासी हाताळणी क्षमता २० दशलक्ष प्रवासी प्रतिवर्ष म्हणजेच दोन कोटी इतकी आहे. आता तिसऱ्या टप्प्यात आणखी ३० दशलक्ष प्रवासी प्रतिवर्ष म्हणजेच तीन कोटी प्रवाशांची क्षमता वाढविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यामुळे तिसरा टप्पा पूर्ण झाल्यानंतर नवी मुंबई विमानतळाची एकूण प्रवासी हाताळणी क्षमता ५० दशलक्ष म्हणजेच पाच कोटी प्रवासी प्रतिवर्ष इतकी होणार आहे.

■ सिडकोच्या भागीदारतील विमानतळ कंपनीकडून आणखी तीन कोटी प्रवासी क्षमतेच्या विस्ताराची तयारी

■ अंतिम क्षमता पाच कोटी

तिसऱ्या टप्प्यात प्रवासी क्षमतेसोबतच मालवाहतूक हाताळणी क्षमतेतही वाढ करण्याचे नियोजन आहे. या टप्प्यात अतिरिक्त ०.७ दशलक्ष टन प्रतिवर्ष मालवाहतूक क्षमता विकसित करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. विमानतळाच्या उत्तरेकडील भागात हा विस्तार करण्याची योजना असून, सध्या कार्यरत असलेल्या विमानतळाच्या कामकाजावर परिणाम होऊ नये, याची काळजी घेत विस्ताराचे नियोजन करण्यात आले आहे.

नवी मुंबई विमानतळाची प्रवासी व मालवाहतूक क्षमता वाढविण्याच्या दृष्टीने तिसऱ्या टप्प्याचीही निविदाप्रक्रिया महत्त्वाची मानली जात आहे. विमानतळाच्या क्षमतेत होणाऱ्या वाढीमुळे पनवेल, उलवे, पुष्पकनगर, द्रोणागिरी आणि परिसरातील वाहतूक, व्यावसायिक तसेच विमानतळाशी संबंधित सेवा क्षेत्राच्या विकासालाही चालना मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे विमानतळाचा तिसरा टप्पा प्रत्यक्षात आणण्यासाठी सुरू झालेल्या निविदा प्रक्रियेकडे परिसरातील व्यावसायिक आणि पायाभूत सुविधा क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

## विसर्जनानंतर अवजड वाहने रस्त्यावर

| पनवेल | विशेष प्रतिनिधी|



गणेश विसर्जनाच्या दुसऱ्या दिवशी शनिवारी (दि.२६) पनवेल परिसरातील प्रमुख मार्गांवर वाहतूक कोंडी झाली. मुंब्रा-पनवेल महामार्गावर नावडा फाटा ते शीळ फाटा, तर सायन-पनवेल महामार्गावर मुंबई-पुणे महामार्गाकडून तळोजा लिंक रोडपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या. या कोंडीचा परिणाम कामोठे आणि कळंबोलीच्या प्रवेशमार्गांवरही झाला.

गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर कल्याण फाटा येथे मुंब्रा वाहतूक विभागाकडून अवजड वाहनांना रोखण्यात आले होते. विसर्जनाचा दिवस संपल्यानंतर शुक्रवारी रात्रीपासून ही वाहने पुन्हा सोडण्यात आली. त्यामुळे शनिवारी सकाळच्या नियमित वाहतुकीत अवजड वाहनांची भर पडली. त्यातच विसर्जनानंतर नागरिकांची वाहतूकही सुरू असल्याने तळोजा वाहतूक विभागाच्या हद्दीतील मार्गांवर अतिरिक्त ताण निर्माण झाला.

■ पनवेल परिसरात कोंडी

■ नावडा फाटाशीळ फाटा आणि तळोजा लिंक रोडवर वाहनांच्या रांगा

नावडा फाटा, शीळ फाटा आणि तळोजा लिंक रोड परिसरात वाहनांचा वेग मंदावल्याने मुख्य मार्गावरील कोंडीचा फटका कामोठे-कळंबोलीच्या प्रवेशद्वारांनाही बसला. त्यामुळे शहरात ये-जा करणाऱ्या वाहनचालकांना विलंबाचा सामना करावा लागला.

परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी तळोजा वाहतूक विभागाने प्रमुख चौक आणि जोडरस्त्यांवर पोलीस कर्मचारी तैनात करून वाहतुकीचे नियमन केले. अडकलेली वाहने मार्गस्थ करण्यासाठी प्रयत्न करण्यात आल्याने दुपारनंतर वाहतुकीचा प्रवाह हळूहळू सुरळीत झाला.

विसर्जनानंतर रात्रीपासून अवजड वाहनांची वाहतूक पुन्हा सुरू होणे आणि सकाळच्या वेळेत वाढलेली वाहनसंख्या यामुळे पनवेल-तळोजा परिसरातील प्रमुख मार्गांवर अतिरिक्त ताण आला. मात्र, दुपारनंतर वाहतूक पूर्वपदावर आली.

## वीज कोसळल्याने घरातील उपकरणे जळाली

| कोर्लई | प्रतिनिधी |

मुरुड तालुक्यातील नांदगाव गणेशनगर कुंभारवाड्यात गुरुवारी (दि.२४) पहाटे साडेपाचच्या दरम्यान वीज कोसळल्याने घरातील वीज उपकरणे जळून नुकसान झाले, सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.



तालुक्यात दोन दिवसांपासून सकाळ व सायंकाळच्या वेळी ढगाळ वातावरणानंतर पाऊस पडतो आहे. पहाटे पाच-साडेपाचदरम्यान नांदगाव कुंभारवाडा येथे वीज चमकली, मोठा आवाज झाला. यामुळे संध्या मिठाग्री व प्रवीण कोरलेकर यांच्या घरातील टीव्ही, पंखा, बल्ब, वायरिंग जळून दहा ते बारा हजारांचे, तर मनोहर मोकल यांच्या घरातील ५५ इंची ५७ हजारांचा एलइडी टीव्ही, पंखा व सिद्धेश तळेकर यांच्या घरातील टीव्ही, पंखा, एलईडी बल्ब उपकरणांचे जळून नुकसान झाले.

परिसरात विजांचा कडकडाट, वीजपुरवठा चालू असताना अचानक झालेल्या उच्च दाबामुळेच विद्युत उपकरणांचे नुकसान झाल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे असून, नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी आहे.

या घटनेची माहिती मिळताच तहसीलदार आदेश डफळ यांच्या मार्गदर्शनाखाली नांदगाव मंडळ सजाचे मंडळ अधिकारी मंगेश इग्रुळकर व तलाठी अनिल ढोले यांनी वीज कोसळून झालेल्या नुकसानीचा पंचनामा केला.

## अवैध दारु विक्री, वाहतूक करणाऱ्यांना दणका

### गणेशोत्सवामध्ये सात दिवसांत ४५ गुन्हे दाखल

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

गणेशोत्सवाच्या कालावधीत अवैधरित्या दारु वाहतूक, निर्मिती आणि विक्री करणाऱ्यांना दणका मिळाला आहे. रायगडच्या राज्य उत्पादन शुल्क विभागाने सात दिवसांमध्ये गावठी दारुसह देशी-विदेशी दारु विक्रेत्यांविरोधात कारवाई केली. या कारवाईत ४५ जणांविरोधात गुन्हे दाखल केले असून, नऊ लाख सात हजार ८६५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यामध्ये २८ जणांना अटक करण्यात यश आले आहे.

कोकणासह रायगड जिल्ह्यात गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. जिल्ह्यामध्ये एक लाखाहून अधिक गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना १४ सप्टेंबरला झाली. जिल्ह्यात सर्वत्र धार्मिक व सांस्कृतिक धामधूम सुरु होती. याचा फायदा घेत काही मंडळी गावठी, देशी-विदेशी दारु विक्री, वाहतूक व निर्मिती करीत असल्याची माहिती रायगडच्या राज्य उत्पादन शुल्क विभागाला मिळाली होती. अधीक्षक आदित्य पवार यांच्या मार्गदर्शनाखाली या कालावधीत कारवाईची मोहीम हाती घेण्यात आली.

गणेशोत्सवाच्या काळात जिल्ह्यात अवैध मद्यविक्री आणि हातभट्टी दारूला आळा घालण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाने विशेष मोहिमेद्वारे कारवाई सुरु केली. जिल्ह्यामध्ये सोमवारी (दि.१४) ते रविवारी (दि.२०) या सात दिवसांच्या कालावधीत वेगवेगळ्या ठिकाणी कारवाई करण्यात आली. त्यामध्ये ४५ गुन्हे दाखल करून २८ आरोपींना अटक करण्यात आली.

गणेशोत्सवात मोठ्या प्रमाणात भाविकांची ये-जा, सार्वजनिक मंडळांचे कार्यक्रम आणि विविध ठिकाणी होणाऱ्या उत्सवांच्या पार्श्वभूमीवर अवैध मद्यविक्रीला आळा घालण्यासाठी उत्पादन शुल्क विभागाने जिल्ह्यात विशेष लक्ष केंद्रित केले होते. हातभट्टी दारूनिर्मितीची ठिकाणे, अवैध मद्यविक्री केंद्रे तसेच मद्याची बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्यांवर पथकांकडून कारवाई करण्यात आली होती. या कारवाईमुळे अवैध दारु, विक्री, वाहतूक व निर्मिती करणाऱ्यांना दणका मिळाला. या कारवाईमध्ये ४२२ लिटर गावठी दारू आणि १४ हजार ६०० लिटर रसायन तसेच ५९.५८ बल्क लिटर देशी मद्य आणि ६०.१८ बल्क लिटर विदेशी मद्यही जप्त करण्यात आले आहे. अवैध मद्य वाहतुकीसाठी वापरण्यात येणारे एक वाहनही विभागाने ताब्यात घेतले. गणेशोत्सव काळात अवैध मद्यविक्री रोखण्यासाठी विभागाकडून विशेष पथकांच्या माध्यमातून तपासणी आणि कारवाई करण्यात आली. उत्सवाच्या काळात बेकायदेशीर मद्यनिर्मिती, विक्री आणि वाहतूक होऊ नये, यासाठी अशा कारवाया पुढेही सुरू राहणार असल्याचे विभागाकडून सांगण्यात आले.

**अधीक्षकांकडून नागरिकांना आवाहन**

**बनावट मद्य, शासनाचा कर किंवा उत्पादन शुल्क चुकवून होणारी मद्यविक्री तसेच हातभट्टी दारूची निर्मिती, वाहतूक किंवा विक्री याबाबत नागरिकांकडे माहिती असल्यास त्यांनी राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या १८०० २३३ ९९९९ या टोल-फ्री क्रमांकावर माहिती द्यावी, असे आवाहन अधीक्षक आदित्य पवार यांनी केले आहे.**

**दिल्लीतील राष्ट्रीय संस्थेकडून दखल | विद्यार्थीसंख्या ३२ वरून १०३ वर**

## वडगाव शाळेचा शैक्षणिक कायापालट

| पाताळगंगा | प्रतिनिधी |

जिद्द, चिकाटी आणि प्रभावी नेतृत्वाच्या जोरावर ग्रामीण भागातील शाळेचे चित्र बदलता येते, हे खालापूर तालुक्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, वडगावने सिद्ध करून दाखविले आहे. मुख्याध्यापक सुभाष राठोड यांच्या नेतृत्वाखाली शाळेत झालेल्या शैक्षणिक परिवर्तनाची दखल आता थेट राष्ट्रीय पातळीवर घेण्यात आली असून, नवी दिल्ली येथील राष्ट्रीय शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्थेने (एनआयईपीए) या कार्याची नोंद केली आहे.

पनवेल येथील जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्या संघमित्रा त्रिभुवन यांनी तयार केलेल्या विशेष कार्यअभ्यासातून वडगाव शाळेच्या उल्लेखनीय



कामगिरीचा आढावा घेण्यात आला. त्यामुळे ग्रामीण शाळेतील शैक्षणिक परिवर्तनाची राष्ट्रीय स्तरावर चर्चा झाली आहे.

सन २०२३ मध्ये सुभाष राठोड यांनी शाळेचा पदभार स्वीकारला, त्यावेळी विद्यार्थीसंख्या केवळ ३२ होती. विद्यार्थीसंख्या वाढविण्यासाठी त्यांनी 'शाळा गैरहजर विद्यार्थ्यांच्या दारी' हा अभिनव उपक्रम राबविला. शिक्षकांसह विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन पालकांशी प्रत्यक्ष संवाद साधत शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्यात आले. या प्रयत्नांना मोठे यश मिळाले आणि २०२४-२५ मध्ये विद्यार्थीसंख्या ४९, तर २०२५-२६ मध्ये विद्यार्थीसंख्या तब्बल १०३ वर पोहोचली.

**मुख्याध्यापक सुभाष राठोड यांच्या नेतृत्वाची राष्ट्रीय पातळीवर नोंद**

'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यात वडगाव शाळेने रायगड जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला. तसेच मुंबई विभागात द्वितीय क्रमांक मिळवत शाळेने १५ लाख रुपयांचे पारितोषिक मिळविले आहे.

जून २०२५ मध्ये झालेल्या अपघातात उजवा पाय गमावल्यानंतरही मुख्याध्यापक सुभाष राठोड यांनी शाळेच्या गुणवत्तावाढीचे प्रयत्न थांबविले नाहीत. त्यांच्या नेतृत्वाखाली सामाजिक उत्तरदायित्व निधीतून संगणक प्रयोगशाळा, तंत्रज्ञानाधारित वर्ग, वीज आणि शुद्ध पाण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे.

शाळेत वृक्षारोपण, कचरा वर्गीकरण, गांडूळखत निर्मिती तसेच 'पाणी अडवा-पाणी जिरवा' यांसारखे उपक्रमही राबविले जात आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार आणि आधुनिक शिक्षण मिळावे, यासाठी वडगाव शाळेला आंतरराष्ट्रीय दर्जाची शाळा बनविण्याचे ध्येय राठोड यांनी ठेवले आहे.

**क्लासिफाईड**
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- Vacancy in furniture factory as a office boy/girl. Education- Graduation. Experience-3-4 years. Salary- 20,000 per month. Location- Bamansure, chondhi. Contact- 9823585321.
- Vacancy for store Manager in furniture store. Experience in sale- 5+years. Salary- 50,000 per month. Location-Zirad. Contact- 9823585321
- होम स्टे कामासाठी जोडपे पाहिजे आहे. ठिकाण : चोंढी मो.नं. ८७७९७७६७१४
- O'NEST Group of Hotels येथे हाऊसकीपर, वेटर, ऑल राऊंडर शेफ, तातडीने हवे. ठिकाण: अलिबाग/रत्नागिरी. संपर्क: ९९७५५१६१२३.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# नेरळ पोलीस ठाण्याच्या बाप्पाचे विसर्जन



। नेरळ । प्रतिनिधी ।

गणेशोत्सव काळात सुरक्षा व्यवस्था ठेवण्यासाठी अहोरात्र बंदोबस्त करणारे पोलीस प्रशासनाच्या बाप्पाला १३ व्या दिवशी निरोप देण्यात आला. बँड पथकाच्या साथीने रथांमधून निघालेली मिरवणूक रात्री १०.०० वाजता थांबली. त्यानंतर बाप्पाचे गणेश घाट येथील ब्रिटिश कालीन तलावात विसर्जन करण्यात आले.

कर्जत तालुक्यातील गणेशोत्सव उत्सवात पार पाडला जावा, यासाठी कर्जत आणि नेरळ पोलिस ठाणे येथे विराजमान झालेल्या बाप्पाचे विसर्जन अनंत चतुर्दशी नंतरच्या दिवशी होत असते. सालाबादप्रमाणे या बाप्पाचे विसर्जन मोठ्या थाटात कर्जत उल्हास नदी आणि नेरळ गणेश घाट ब्रिटिश कालीन धरण येथे झाले. नेरळ येथील पोलीस ठाण्याच्या बाप्पाची मिरवणूक सायंकाळी ६.०० वाजता निघाली. नेरळमधील सर्व पोलीस कर्मचारी पारंपरिक वेषात सहभागी झाले होते. त्यावेळी बाप्पाची आरती झाल्यानंतर रथांमध्ये बाप्पाला विराजमान करण्यात आले. पोलिस अधिकारी राहुल वरोटे यांच्या मार्गदर्शनाखाली बेकरे येथील बँड पथकाच्या साथीने कल्याण कर्जत रस्त्याने निघालेली मिरवणूक रात्री साडेनऊ वाजता गणेश घाट येथे पोहचली. मागील महिन्याचा कायदा सुव्यवस्था यांचा थकवा पोलिस अधिकारी आणि कर्मचारी यांनी बेधुंद होऊन नाचत बाप्पाची मिरवणूकीमध्ये सहभागी होऊन घालवला. यावेळी पोलीस अधिकारी राहुल वरोटे यांच्यासह अधिकारी श्रीरंग किसवे, वरक, काजरोळकर, शेमडे तसेच पोलीस कर्मचाऱ्यांचा उत्साह या मिरवणुकीत दिसून आला.

# सेवा संकल्प अभियानात सर्व शाळांचा सहभाग

। खरोशी । प्रतिनिधी ।

शालेय शिक्षण विभागाच्या आदेशानुसार राज्यात ''सेवा संकल्प अभियान'' राबविण्यात येत आहे. त्यानुसार पेण तालुक्यातील सर्व शाळांमध्ये दि.२४ सप्टेंबर रोजी चित्रकला व वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. या अभियानासाठी विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यासाठी पेण तालुक्यातील कृषी, पशुसंवर्धन व दुध सामिती सभापती वैकुंठ पाटील, सर्व जिल्हा परिषद सदस्य, पेण पंचायत समिती सभापती स्मिता पाटील, उपसभापती संजय डंगर, सर्व पंचायत समिती सदस्य शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, विषय साधनव्यक्ती मुख्याध्यापक शिक्षक यांनी प्रत्यक्ष सहभाग घेऊन मार्गदर्शन करण्यात आले. सेवा संकल्प अभियानात शाळा, केंद्रस्तरातून तालुका व जिल्हास्तरावर मूल्यांकन होणार आहे. या उपक्रमासाठी राजिप शिक्षणाधिकारी संजय नाईकडे, गटविकास अधिकारी गजानन लेंडी यांच्या मार्गदर्शनाखालील व पेण पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी शर्मिला शेंडे नियोजनातून या स्पर्धा पार पडल्या.



प्रथम क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांमध्ये

## जाहीर नोटीस

दि. २७/०९/२०२६

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेल्या मिळकती कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीच्या विक्री संबंधीत बोलणी विद्यमान मालक १) संध्या धर्माजी पाटील २) अनिल धर्माजी पाटील ३) सुनिल धर्माजी पाटील ४) रुपेश धर्माजी पाटील रा. बांधण, आंबेपूर ता. अलिबाग जि. रायगड ५) संगिता संदेश म्हात्रे रा. पेझारी पो. आंबेपूर ता. अलिबाग जि. रायगड यांचेसोबत झालेली आहे. सदर मिळकती या निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतींचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिध्द करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे.

मिळकतीचे वर्णन

| मौजे | नगर भूमापन क्रमांक | क्षेत्र (चौ.मी) | आकार |
|---|---|---|---|
| आंबेपूर ता.अलिबाग | १३७/३ | ०-४२-५०<br>पो.ख ०-७-३०<br>एकुण ०-४९-८० | ६.८७ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीपैकी संध्या धर्माजी पाटील, संगिता संदेश म्हात्रे यांच्या हिश्यातील ०-३६-५० हे.आर आकार ६.८७ रु.पै.या मिळकतीपैकी ०-१८-०० हे. आर ही मिळकत या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या मुळ सही शिक्क्याची कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून होणाऱ्या १४ (चौदा) दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

सही/-
**ॲड. मानस सुधाकर पाटील**
मु. आंबेघर, पो. पोयनाड ता. अलिबाग,
जि. रायगड. मोबा.नं. ७७४३८०९६५३

## रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग
## विशेष वसूली अधिकारी कार्यालय, अलिबाग रायगड
**फॉर्म झेड**
**(नियम १०७ चा उपनियम ११ (डी ११))**
**स्थावर मिळकतीचा कब्जा सुचना.**

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा पनवेलचे विशेष वसुली अधिकारी या नात्यांने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये न्यायनिर्णित ऋणको याना म्हणजे कर्जदार व हमीदारांना मागणी नोटीस दिनांक २७/११/२०२५ रोजी निर्गमित केली. व त्या पाठोपाठ दिनांक ३०/०६/२०२६ रोजी जप्ती सुचनेचा आदेशही देण्यात आला. कर्जदार श्री. आत्माराम बापू पाटील (मयत कर्जदार) व श्रीमती. सविता आत्माराम पाटील (वारसदार) यांच्यासह इतर न्यायनिर्णित ऋणको यांना सुचनेत नमुद केलेली दिनांक ३१/०३/२०२४ पर्यतची रक्कम रूपये ३४४६५७/- व दिनांक ०१/०४/२०२४ पासून पुढे होणारे व्याज सरचार्ज यांची परतफेड सदरहू सुचना प्राप्त झालेनंतर वसूलीच्या तारखेपर्यंत त्यावरील १२ टक्के व्याज दराने भरण्यास सांगितले होते आणि न्यायनिर्णित ऋणको रक्कमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने निम्नस्वाक्षरीकारणाने जप्तीची सुचना जारी करून येथे खालील माहिती झालेली मिळकत जप्त केलेली आहे.

न्यायनिर्णित ऋणकांनी संपूर्ण रक्कमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्याने याद्वारे न्यायनिर्णित ऋणको आणि सर्वसामान्य जनतेला सुचना देण्यास येते की, निम्नस्वाक्षरीकाराने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या नियम १०७ चा उपनियम (११ डी-१) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून मौजे महालुंगी हद्दीतील सर्वे नं ८८ क्षेत्रफळ ०.९८.१० हे. आर खालील मिळकतीचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी कोणताही करण्यात आलेला व्यवहार हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा पनवेल च्या दिनांक ३१/०३/२०२४ रोजी येणे रक्कम रूपये ३४४६५७/- व त्यावरील व्याजाचा आणि इतर शुल्काचा अधिन राहील.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

कर्जदार :- श्री. आत्माराम बापू पाटील (मयत कर्जदार) व श्रीमती सविता आत्माराम पाटील (वारसदार) मौजे आंबे तर्फे तलोजा, पो वावंजे, ता. पनवेल येथील श्री. आत्माराम बापू पाटील (मयत कर्जदार) व श्रीमती सविता आत्माराम पाटील (वारसदार) यांचे नावे असलेले मौजे महालुंगी हद्दीतील सर्वे नं ८८ क्षेत्रफळ ०.९८.१० हे. आर

स्थळ - पनवेल
दिनांक : २६/०९/२०२६ **श्री.एन.जी.भोंडकर**
वसूली व विक्री अधिकारी अलिबाग रायगड
द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग

## जाहीर सूचना

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशील यांनी खालील वर्णनाच्या शेतजमीन मिळकत अशोक मोरेश्वर जाधव रा. ११११४, नेरळ कशेळे रोड, हनुमान मंदिर जवळ, अंत्राट नीड, रायगड ४१०१०१ यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे - अंत्राट तर्फे नीड, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेतजमीन मिळकत**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र | आकार रुपये-पैसे |
|---|---|---|---|
| ३० | १/ब | ०-४५-०० (हे.आर.चौ.मी.) | ०-३२ |

वरील शेतजमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, दान, भाडेपट्टा, लिज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशीलांच्या लाभात सोडून दिलेला असून त्यांची आमचे अशीलांच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.
येणेप्रमाणे जाहीर सूचना आहे.

दिनांक : २८ सप्टेंबर २०२६ **ॲडव्होकेट प्रवीण पुंडलिक कराळे**
पत्ता : ओमकार अपार्टमेंट, डिकसळ, पो. कोषाणे,
ता. कर्जत, जि. रायगड

## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मिळकत आमचे अशिल यांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. रघुनाथ बाळकृष्ण जाधव यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्याप्रमाणे त्यांच्यात बोलणी झालेली आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण, वहिवाट इ. स्वरुपाचे हक्क हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटिस प्रसिद्धद झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पुर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वास कळावे.

**मौजे महाळुंगे खुर्द, ता. मुरुड, जि. रायगड**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| महाळुंगे खुर्द, ता.मुरुड | ४/१/ब/१ | क्षेत्र ०-६३-८०<br>पो.ख. ०-००-००<br>एकूण क्षेत्र ०-६३-८० | ९.४६ |

वर नमुद मिळकतीमधील खाते क्र. ३२९ मधील श्री. रघुनाथ बाळकृष्ण जाधव यांच्या मालकीचे एकूण क्षेत्र ०-४३-८० हे. आर., आकार ६.४९ रु.पै. ही मिळकत

दिनांक :- २६/०९/२०२६
अशिलांची सही **ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता :- फ्लॅट नं. १०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट, जे.एस.एम कॉलेज
जवळ अलिबाग-रायगड, मोबा. ९७६७०१०९०२

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद केलेली मौजे-तळवली, ता. पेण, जि. रायगड येथील सामाईक शेत जमीन मिळकतीचे विद्यमान मालक यांच्या मालकी हक्क व ताबेकब्जा, वहिवाटीतील शेत जमीन मिळकत ही रजि. खरेदीखताने खरेदी करण्याबाबत आमचे अशिल यांच्यासोबत सदरहू शेत जमीन मिळकतीचा खरेदी व्यवहार ठरविण्यात आलेला आहे. सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यास सदरहू सामाईक शेत जमिन मिळकतीचे विद्यमान मालक यांनी अनुमती दिलेली आहे. सदरच्या सामाईक शेत जमिन मिळकतीचे ७/१२ उताऱ्याप्रमाणे असलेले वर्णन खालीलप्रमाणे-

**शेत जमीन मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकारणी (रु.पै.) |
|---|---|---|---|
| तळवली | १/१ | जिरायत १.५४.५०<br>वरकस ०.२४.९०<br>एकूण ला.यो.क्षेत्र १.७९.४०<br>एकूण पो.ख. ०.२१.५०<br>एकूण क्षेत्र २.००.९० | २६.९० |

**वरील सामाईक शेत जमीन मिळकतीचे संपूर्ण क्षेत्र म्हणजेच २.००.९० हे.आर.चौ.मी. क्षेत्र या जाहीर नोटीसचा विषय आहे.**

वरील वर्णनाच्या सामाईक शेत जमीन मिळकतीचे जमीन मालक यांच्या मालकी हक्क व ताबेकब्जातील संपूर्ण क्षेत्र म्हणजेच २.००.९० हे.आर.चौ.मी. क्षेत्र हे पूर्णत: हा निर्वेध, बोजाविरहित व विनाजोखीम असल्याबाबतचा हवाला सदरच्या शेत जमीन मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिलांस दिला आहे. याउपरही सदरच्या शेत जमीन मिळकतीमध्ये अन्य कोणाचाही भाडेपट्टा, गहाण, बोजा, कुळ, वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, खरेदीखत, विकसन करारनामा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, लिन अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह अगर लेखी दाखल करण्यात याव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने २१ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे पोहचतील अशा रीतीने पाठवाव्यात.

याप्रमाणे वरील मुदतीत हरकत न आल्यास सदरहू सामाईक शेत जमीन मिळकतीचे विद्यमान जमीन मालक यांचा मालकीची संपूर्ण शेत जमीन मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजून त्यासंबंधी कोणाचेही कोणत्याही प्रकारचे कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजण्यात येऊन आमचे अशिल हे वरील सामाईक शेत जमीन मिळकतीचे विद्यमान मालकांच्या मालकी हक्क व ताबेकब्जातील शेत जमीन मिळकतीचे संपूर्ण क्षेत्राच्या खरेदी व्यवहाराबाबत सुरू असलेली बोलणी पूर्ण करून सदरहू सामाईक शेत जमीन मिळकतीच्या संपूर्ण क्षेत्राचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील. तसेच सदरच्या वरील मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही तक्रार अगर हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.
येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

पेण- रायगड
दिनांक २८/०९/२०२६ अशिलांचे वकील
**ॲड. श्री. जयंत घ. वैरागी**
ऑफिस :- 'वैरागी व्हिला',
पेण नगरपरिषद कार्यालय समोर, पेण, चिंचपाडा
रोड, पेण, ता. पेण, जि. रायगड.
मो.नं. ९८८१६७१४२४

## रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग
## विशेष वसूली अधिकारी कार्यालय, अलिबाग रायगड
**फॉर्म झेड**
**(नियम १०७ चा उपनियम ११ ( डी ११ ) )**
**स्थावर मिळकतीचा कब्जा सुचना.**

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा पनवेल चे विशेष वसुली अधिकारी या नात्यांने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये न्यायनिर्णित ऋणको याना म्हणजे कर्जदार व हमीदारांना मागणी नोटीस दिनांक २२/१२/२०२२ रोजी निर्गमित केली. व त्या पाठोपाठ दिनांक १७/०१/२०२३ रोजी जप्ती सुचनेचा आदेशही देण्यात आला. कर्जदार श्री. मनोजकुमार मुरलीधर साहू (कर्जदार) सौ. जयंती मनोजकुमार साहू (सहकर्जदार) यांच्यासह इतर न्यायनिर्णित ऋणको यांना सुचनेत नमुद केलेली दिनांक ३१/०३/२०२० पर्यतची रक्कम रूपये २२२२६१५/- व दिनांक ०१.०४.२०२० पासून पुढे होणारे व्याज सरचार्ज यांची परतफेड सदरहू सुचना प्राप्त झालेनंतर वसूलीच्या तारखेपर्यत त्यावरील १०.७५ टक्के व्याज दराने भरण्यास सांगितले होते आणि न्यायनिर्णित ऋणको रक्कमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने निम्नस्वाक्षरीकारणाने जप्तीची सुचना जारी करून येथे खालील माहिती झालेली मिळकत जप्त केलेली आहे.

न्यायनिर्णित ऋणकांनी संपूर्ण रक्कमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्यांने याद्वारे न्यायनिर्णित ऋणको आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यास येते की, निम्नस्वाक्षरीकाराने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या नियम १०७ चा उपनियम (११ डी १) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून खोपोली नगरपालिका हद्दीतील डेक्कन रेसिडेंसी येथील ए-विंग मधील सदनिका क्रं. ६११ क्षेत्र ४५७ चौ. फू येथील खालील मिळकतीचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी कोणताही करण्यात आलेला व्यवहार हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा रसायनीच्या दिनांक ३१/०३/२०२० रोजी येणे रक्कम रुपये २२२२६१५/- व त्यावरील व्याजाचा आणि इतर शुल्काचा अधिन राहील.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

कर्जदार :- मनोजकुमार मुरलीधर साहू (कर्जदार) सौ. जयंती मनोजकुमार साहू (सहकर्जदार) खारघर, पनवेल येथील मनोजकुमार मुरलीधर साहू (कर्जदार) सौ. जयंती मनोजकुमार साहू (सहकर्जदार) यांचे नावे असलेले खोपोली नगरपालिका हददीतील डेक्कन रेसिडेंसी येथील ए-विंग मधील सदनिका क्रं. ६११ क्षेत्र ४५७ चौ.फू.

स्थळ : पनवेल
दिनांक : २६/०९/२०२६ **श्री. एन. जी. भोंडकर**
**वसूली व विक्री अधिकारी अलिबाग रायगड**
**द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग**

## रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग
## विशेष वसूली अधिकारी कार्यालय, अलिबाग रायगड
**फॉर्म झेड**
**(नियम १०७ चा उपनियम ११ ( डी ११ ) )**
**स्थावर मिळकतीचा कब्जा सुचना.**

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा पनवेलचे विशेष वसुली अधिकारी या नात्यांने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये न्यायनिर्णित ऋणको याना म्हणजे कर्जदार व हमीदारांना मागणी नोटीस दिनांक ०९/०२/२०२३ रोजी निर्गमित केली. व त्या पाठोपाठ दिनांक १०/०३/२०२३ रोजी जप्ती सुचनेचा आदेशही देण्यात आला. कर्जदार श्री. दत्तात्रेय पांडुरंग मुंढे यांच्यासह इतर न्यायनिर्णित ऋणको यांना सुचनेत नमुद केलेली दिनांक ३०/०९/२०२१ पर्यंतची रक्कम रूपये १००४८८/- व दिनांक ०१/१०/२०११ पासून पुढे होणारे व्याज सरचार्ज यांची परतफेड सदरहू सुचना प्राप्त झालेनंतर वसूलीच्या तारखेपर्यत त्यावरील ११ टक्के व्याज दराने भरण्यास सांगितले होते आणि न्यायनिर्णित ऋणको रक्कमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने निम्नस्वाक्षरीकारणाने जप्तीची सुचना जारी करून येथे खालील माहिती झालेली मिळकत जप्त केलेली आहे.

न्यायनिर्णित ऋणकांनी संपूर्ण रक्कमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्यांने याद्वारे न्यायनिर्णित ऋणको आणि सर्वसामान्य जनतेला सुचना देण्यास येते की, निम्नस्वाक्षरीकाराने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या नियम १०७ चा उपनियम (११ डी -१) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून चांभार्ली ता. खालापूर हद्दीतील मालमत्ता क्रमांक २०९ क्षेत्रफळ ८२५ चौ.फू. येथील खालील मिळकतीचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी कोणताही करण्यात आलेला व्यवहार हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा रसायनीच्या दिनांक ३०/०९/२०२१ रोजी येणे रक्कम रुपये १००४८८/- व त्यावरील व्याजाचा आणि इतर शुल्काचा अधिन राहील.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**
**कर्जदार :- श्री.दत्तात्रेय पांडुरंग मुंढे**

मु. चांभार्ली, ता. खालापूर येथील श्री.दत्तात्रेय पांडुरंग मुंढे व सौ. दर्शना दत्तात्रेय मुंढे (तारणदार) यांचे नावे असलेले मु. चांभार्ली, ता. खालापूर हद्दीतील मालमत्ता क्रमांक २०९ क्षेत्रफळ ८२५ चौ.फू.

स्थळ : पनवेल
दिनांक : २६/०९/२०२६ **श्री. एन. जी. भोंडकर**
**वसूली व विक्री अधिकारी अलिबाग रायगड**
**द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., अलिबाग**

## रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग
## विशेष वसूली अधिकारी कार्यालय, अलिबाग रायगड
**फॉर्म झेड**
**(नियम १०७ चा उपनियम ११ (डी ११)**
**स्थावर मिळकतीचा कब्जा सुचना.**

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा पनवेलचे विशेष वसुली अधिकारी या नात्यांने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये न्यायनिर्णित ऋणको याना म्हणजे कर्जदार व हमीदारांना मागणी नोटीस दिनांक २७/०३/२०२६ रोजी निर्गमित केली. व त्या पाठोपाठ दिनांक १५/०५/२०२६ रोजी जप्ती सुचनेचा आदेशही देण्यात आला. कर्जदार श्री. सत्यवान कान्हा पाटील यांच्यासह इतर न्यायनिर्णित ऋणको यांना सुचनेत नमुद केलेली दिनांक ३१/०८/२०२५ पर्यतची रक्कम रूपये १४३९९८६/-व दिनांक ०१/०९/२०२६ पासून पुढे होणारे व्याज सरचार्ज यांची परतफेड सदरहू सुचना प्राप्त झालेनंतर वसूलीच्या तारखेपर्यंत त्यावरील १०.५० टक्के व्याज दराने भरण्यास सांगितले होते आणि न्यायनिर्णित ऋणको रक्कमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने निम्नस्वाक्षरीकारणाने जप्तीची सुचना जारी करून येथे खालील माहिती झालेली मिळकत जप्त केलेली आहे.

न्यायनिर्णित ऋणकांनी संपूर्ण रक्कमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्यांने याद्वारे न्यायनिर्णित ऋणको आणि सर्वसामान्य जनतेला सुचना देण्यास येते की, निम्नस्वाक्षरीकाराने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या नियम १०७ चा उपनियम (११ डी १) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून मु. पो. वावंजे, ता. पनवेल हद्दीतील मालमत्ता क्रमांक ५८/२ क्षेत्रफळ ८८२ चौ.फु येथिल खालील मिळकतीचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी कोणताही करण्यात आलेला व्यवहार हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा देवीचापाडाच्या दिनांक ३१/०८/२०२५ रोजी येणे रक्कम रूपये १४३९९८६/- व त्यावरील व्याजाचा आणि इतर शुल्काचा अधिन राहील.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**
**कर्जदार :- श्री. सत्यवान कान्हा पाटील**

मु.पो.वावंजे, ता. पनवेल येथील श्री. सत्यवान कान्हा पाटील यांचे नावे असलेले मु. पो. वावंजे, ता. पनवेल हद्दीतील मालमत्ता क्रमांक ५८/२ क्षेत्रफळ ८८२ चौ.फु

स्थळ - पनवेल
दिनांक : २६/०९/२०२६ **श्री.एन.जी.भोंडकर**
वसूली व विक्री अधिकारी अलिबाग रायगड
द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., अलिबाग

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार १) श्री. समीर सफरअली विराणी, २) श्री. अल्ताफ लियाकत डोंगरे, यांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत त्या मिळकतीचे मालक १) श्री.नारायण शिवन्ना नायक, २) श्री. रफिक मकबुल सहेद, यांचेकडून विकत घेण्याचे ठरवले आहे.

**मिळकतीचे वर्णन:**
**मौजे माले, ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्व्हे नं | हिस्सा नं | क्षेत्र हे. आर. चौ. मी. | आकार रूपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|
| ३५ | २ | एकुण ०-५५-७० | १ | ३२ |
| ३८ | ४ | एकुण ०-२०-७० | ० | १४ |
| ३९ | ११ | एकुण ०-३९-०० | ० | ३९ |
| ३९ | १२ | एकुण ०-५३-०० | ० | ५६ |
| ३९ | १३ | एकुण ०-०९-०० | ० | ०८ |
| ३९ | १४ | एकुण ०-०४-०० | ० | ०३ |
| ३९ | १५ | एकुण ०-१४-०० | ० | १६ |
| ३९ | १६ | एकुण ०-१४-०० | ० | १७ |
| ३९ | १८/अ | एकुण ०-३१-५० | ० | ३६ |

सबब सदर बाबत कोणाचीही दान, गहाण, साठेकरार, खरेदीखत, ताबा, कब्जा, वहीवाट, बक्षीसपत्र लिज अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत दाखल करावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार केला जाईल. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : २८/०९/२०२६
पत्ता: १०१, १०२, १०३, बुरहान प्लाझा,
दिलकप कॉलेज रोड, ममदापुर पो. नेरळ, सही/-
ता. कर्जत, जि. रायगड- ४१०१०१ **ॲड. भावेश रघुनाथ विरले**
मो. ८८०६०२५८३१ (वकील उच्च न्यायालय)

## रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग
## विशेष वसूली अधिकारी कार्यालय, अलिबाग रायगड
**फॉर्म झेड**
**(नियम १०७ चा उपनियम ११ (डी ११)**
**स्थावर मिळकतीचा कब्जा सुचना.**

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा नवीन पनवेलचे विशेष वसुली अधिकारी या नात्यांने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये न्यायनिर्णित ऋणको याना म्हणजे कर्जदार व हमीदारांना मागणी नोटीस दिनांक २६/०३/२०२४ रोजी निर्गमित केली. व त्या पाठोपाठ दिनांक ०४/०६/२०२४ रोजी जप्ती सुचनेचा आदेशही देण्यात आला. कर्जदार श्री. सुवर्णा सुनील पाटील यांच्यासह इतर न्यायनिर्णित ऋणको यांना सुचनेत नमुद केलेली दिनांक ३०/०९/२०२३ पर्यतची रक्कम रूपये ३२१६०७/- व दिनांक ०१/१०/२०२३ पासून पुढे होणारे व्याज सरचार्ज यांची परतफेड सदरहू सुचना प्राप्त झालेनंतर वसूलीच्या तारखेपर्यंत त्यावरील ११ टक्के व्याज दराने भरण्यास सांगितले होते आणि न्यायनिर्णित ऋणको रक्कमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने निम्नस्वाक्षरीकारणाने जप्तीची सुचना जारी करून येथे खालील माहिती झालेली मिळकत जप्त केलेली आहे.

न्यायनिर्णित ऋणकांनी संपूर्ण रक्कमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्यांने याद्वारे न्यायनिर्णित ऋणको आणि सर्वसामान्य जनतेला सुचना देण्यास येते की, निम्नस्वाक्षरीकाराने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या नियम १०७ चा उपनियम (११ डी १) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून मु.वाजे, पो.वाजे, ता.पनवेल हद्दीतील ग्रामपंचायत वाजे येथील मालमत्ता क्रमांक ९९ अ क्षेत्रफळ ६२५ चौ.फु येथील खालील मिळकतीचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी कोणताही करण्यात आलेला व्यवहार हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा नवीन पनवेल च्या दिनांक ३०/०९/२०२३ रोजी येणे रक्कम रूपये ३२१६०७/- व त्यावरील व्याजाचा आणि इतर शुल्काचा अधिन राहील.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**
**कर्जदार :- सौ. सुवर्णा सुनील पाटील**

मु. वाजे, पो. वाजे, ता. पनवेल येथील सौ. सुवर्णा सुनील पाटील व श्री. सुनील लहू पाटील यांचे नावे असलेले मु.वाजे, पो.वाजे, ता. पनवेल हद्दीतील मालमत्ता क्रमांक ९९ अ क्षेत्रफळ ६२५चौ.फु.

स्थळ - पनवेल
दिनांक : २६/०९/२०२६ **श्री.एन.जी.भोंडकर**
वसूली व विक्री अधिकारी अलिबाग रायगड
द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग

## रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग
## विशेष वसूली अधिकारी कार्यालय, अलिबाग रायगड
**फॉर्म झेड**
**(नियम १०७ चा उपनियम ११ (डी ११)**
**स्थावर मिळकतीचा कब्जा सुचना.**

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा तलोजाचे विशेष वसुली अधिकारी या नात्यांने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये न्यायनिर्णित ऋणको याना म्हणजे कर्जदार व हमीदारांना मागणी नोटीस दिनांक २२/०१/२०२४ रोजी निर्गमित केली. व त्या पाठोपाठ दिनांक ०४/०६/२०२४ रोजी जप्ती सुचनेचा आदेशही देण्यात आला. कर्जदार श्री. आकाश परशुराम तांडेल यांच्यासह इतर न्यायनिर्णित ऋणको यांना सुचनेत नमुद केलेली दिनांक ३१/०३/२०२३ पर्यतची रक्कम रूपये ९६०७८४/- व दिनांक ०१/०४/२०२३ पासून पुढे होणारे व्याज सरचार्ज यांची परतफेड सदरहू सुचना प्राप्त झालेनंतर वसूलीच्या तारखेपर्यत त्यावरील १०.५० टक्के व्याज दराने भरण्यास सांगितले होते आणि न्यायनिर्णित ऋणको रक्कमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने निम्नस्वाक्षरीकारणाने जप्तीची सुचना जारी करून येथे खालील माहिती झालेली मिळकत जप्त केलेली आहे.

न्यायनिर्णित ऋणकांनी संपूर्ण रक्कमेची परतफेड करण्यास कसूर केली असल्यांने याद्वारे न्यायनिर्णित ऋणको आणि सर्वसामान्य जनतेला सुचना देण्यास येते की, निम्नस्वाक्षरीकाराने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ या नियम १०७ चा उपनियम (११डी१) अन्वये त्यांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून मु. गौळवाडी, पो. कडाव, ता. कर्जत हद्दीतील ग्रामपंचायत भाळीवडी येथील मालमत्ता क्रमांक ५११/२ क्षेत्रफळ १४५२ चौ.फु येथील खालील मिळकतीचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी कोणताही करण्यात आलेला व्यवहार हा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि अलिबाग शाखा देवीचापाडाच्या दिनांक ३१/०३/२०२३ रोजी येणे रक्कम रूपये ९६०७८४/- व त्यावरील व्याजाचा आणि इतर शुल्काचा अधिन राहील.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**
**कर्जदार :- श्री. आकाश परशुराम तांडेल**

मु. गौळवाडी, पो. कडाव, ता. कर्जत येथील श्री. आकाश परशुराम तांडेल यांचे नावे असलेले मु.गौळवाडी, पो.कडाव, ता.कर्जत हद्दीतील मालमत्ता क्रमांक ५११/२ क्षेत्रफळ १४५२ चौ.फु.

स्थळ - पनवेल
दिनांक : २६/०९/२०२६ **श्री.एन.जी.भोंडकर**
वसूली व विक्री अधिकारी अलिबाग रायगड
द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., अलिबाग

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## निवडक

### १३ वर्षीय लेकाने गाजवलं मैदान

**हरारे :** सध्या भारतीय क्रिकेटपटूंमध्ये वीरेंद्र सेहवाग आणि राहुल द्रविड यांची मुले भारतासाठी १९ वर्षांखालील क्रिकेटमध्ये उत्तम कामगिरी करत आहे. त्यामध्ये आणखी एका नावाची भर पडली आहे. झिम्बाब्वे क्रिकेट संघाचा कर्णधार सिकंदर रझा याचा मुलगा, मुहम्मद ईसा बट याने २० षटकारांच्या सहाय्याने २७९ धावांची तुफानी खेळी करत लक्ष वेधले आहे. आपल्या वडिलांप्रमाणे ईसा बटही संघाचा कर्णधार आहे. त्याचबरोबर तो यष्टीरक्षकही आहे. १३ वर्षांच्या ईसा बटने १४ वर्षांखालील शालेय क्रिकेट स्पर्धेत ही अप्रतिम कामगिरी केली आहे. त्याने हेलनिक अकादमीकडून खेळताना सीबीसीविरुद्ध अवघ्या १४६ चेंडूंत २० षटकार आणि ३० चौकार मारून २७९ धावा कुटल्या. यावेळी त्याचा स्ट्राईक रेट १९१.१० एवढा राहिला. ईसा बटच्या खेळीमुळे हेलनिक अकादमीने ५० षटकांत ६ गडी गमावत ५१८ धावसंख्येचा डोंगर उभारला. लक्ष्याचा पाठलाग करताना सीबीसी संघ १७.१ षटकांत केवळ ८५ धावसंख्येपर्यंत मजल मारू शकला. त्यामुळे हा सामना हेलनिक अकादमीने तब्बल ४३३ धावांनी जिंकला.

### गोलंदाजाच्या दुखापतीमुळे धक्का



**नवी दिल्ली :** ऑस्ट्रेलियाच्या १९ वर्षांखालील संघाविरुद्धच्या पहिल्या युवा कसोटी सामन्याच्या पहिल्या दिवशी भारताच्या १९ वर्षांखालील संघाला मोठा धक्का बसला. एकदिवसीय मालिकेत दणदणीत विजय मिळवल्यानंतर भारताचा संघ कसोटीत आपले नाणे खणखणीत वाजवण्यासाठी मैदानावर उतरला होता; परंतु, त्यांना प्रमुख गोलंदाज प्रणव राघवेंद्र याच्या दुखापतीमुळे धक्का बसला. राघवेंद्रला स्ट्रेचरवरून मैदानाबाहेर न्यावे लागले. त्याच्या पायाला ही दुखापत झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे आणि हॉस्पिटलमध्ये त्याच्यावर उपचार सुरू असून, वैद्यकीय अहवालाची प्रतीक्षा आहे.

### सुवर्णपदकांची हॅट्ट्रिक थोडक्यात हुकली




**नागोया :** जपानमध्ये सुरू असलेल्या आशियाई क्रीडा २०२६ स्पर्धेत ॲथलेटिक्समध्ये शनिवारी (दि.२६) भारताचा अनुभवी गोळाफेकपटू तेजिंदरपाल सिंग तूर याने रौप्यपदक जिंकले. मात्र, त्याची आशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदकांची हॅट्ट्रिक साधण्याची संधी अगदी थोडक्यात हुकली. तेजिंदरपाल याने यापूर्वी २०१८ च्या जकार्ता आणि २०२३ च्या हांगझोऊ आशियाई क्रीडा स्पर्धांमध्ये पुरुषांच्या गोळाफेक प्रकारात सुवर्णपदके जिंकली होती. त्यामुळे यंदा तो जपानमध्ये सलग तिसरे सुवर्णपदक जिंकण्याच्या हेतूने मैदानात उतरला होता. परंतु, त्याची सुवर्णपदकाची संधी अवघ्या १७ सेंटीमीटरने हुकली. शनिवारी पुरुषांच्या गोळाफेक प्रकारात अंतिम फेरीत त्याने २०.६४ मीटरचा सर्वोत्तम थ्रो केला. मात्र, इराणच्या मोहम्मदरेझा तायबिसे याने २०.८१ मीटर लांब गोळा फेकल्याने त्याने सुवर्णपदक पटकावले. त्यामुळे तेजिंदरपालला रौप्य पदकावर समाधान मानावे लागले.

### नमन धीरचे भारतीय संघात पदार्पण

**तिरुअनंतपुरम :** भारत विरुद्ध वेस्ट इंडिज संघात तिरुअनंतपुरम येथे एकदिवसीय मालिकेतील पहिला सामना रविवारी (दि.२७) खेळवला गेला. याशिवाय ८ महिन्यांनंतर विराट कोहली आणि रोहित शर्मा एकत्र मायदेशात खेळताना दिसले. ही मालिका २०२७ च्या एकदिवसीय चषकाच्या दृष्टीनेही महत्त्वाची आहे. त्याचबरोबर या सामन्यासाठी २६ वर्षीय नमन धीर याला भारताकडून पदार्पणाची संधी मिळाली आहे. त्याला कर्णधार शुभमन गिलने पदार्पणाची कॅप दिली. नमन धीर पंजाबकडून देशांतर्गत क्रिकेट खेळला असून, तो भारत अ संघाकडूनही खेळला आहे. तो मधल्या फळीत फलंदाजी करण्यासोबतच गोलंदाजीतही योगदान देऊ शकतो. त्याच्याकडे १४ लिस्ट ए क्रिकेट सामने खेळण्याचा अनुभव असून, त्याने ३५१ धावा केल्या आहेत आणि ७ बळी घेतले आहेत. त्याने नुकतेच शेर-ए-पंजाब टी स्पर्धेत चांगली कामगिरी केली होती.




### नाशिकच्या सर्वेशची ऐतिहासिक कामगिरी

**नागोया :** आशियाई क्रीडा स्पर्धेत महिलांच्या लांब उडी क्रीडा प्रकारात एन्सीने ६.५३ मीटर लांब उडीसह रौप्यपदक जिंकले. शैलीला ६.४२ मीटर लांब उडीमुळे चौथ्या स्थानावर रहावे लागले. चीनच्या यिनजिइंग हुआंग (६.५५ मी.) व मेन्गई टॅन (६.४५ मी.) यांना अनुक्रमे सुवर्ण व कांस्यपदक मिळाले. तर, पुरुषांच्या उंच उडीत नाशिकच्या सर्वेशने ऐतिहासिक कामगिरी केली. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेमध्ये २.२५ मीटर उंच उडीसह रौप्यपदक जिंकणारा तो पहिला भारतीय खेळाडू ठरला होता. भारतीय सैन्यात तो नाईब सुभेदार या पदावर कार्यरत आहे.

# सुवर्णपदक जिंकण्यासाठी भारत सज्ज

## उपांत्यपूर्व फेरीत अफगाणीस्तानशी भिडणार

## मागील कामगिरीच्या पुनरावृत्तीची संधी

**। नागोया । वृत्तसंस्था ।**

सध्या जपानमधील आयची-नागोया येथे सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत पुरुष क्रिकेट स्पर्धेला सुरुवात झाली आहे. सध्या गटातील सामने खेळवले जात आहेत. त्यामुळे आशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकण्यासाठी भारतीय संघ पूर्णपणे सज्ज झाला आहे. भारतीय संघ आपला पहिला सामना आज दि.२८ सप्टेंबरला थेट उपांत्यपूर्व फेरीत खेळणार आहे.




भारताला उपांत्यपूर्व फेरीत गट-अ मध्ये दुसऱ्या क्रमांकावर राहिलेल्या संघाशी खेळायचे होते. आता हे निश्चित झाले असून, भारताची गाठ अफगाणिस्तानशी पडणार आहे. अफगाणिस्ताननेे गट-अ मध्ये दोन सामने खेळले आहेत. त्यापैकी एका सामन्यात त्यांना विजय मिळवता आला, तर एका सामन्यात पराभव पत्करावा लागला. भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील उपांत्यपूर्व फेरीचा सामना आज कोरोगी स्पोर्ट्स पार्क येथे भारतीय वेळेनुसार सकाळी १०.०० वाजता खेळवला जाणार आहे.

श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखाली आशियाई क्रीडा स्पर्धेत सहभागी होण्यासाठी भारतीय संघ आधीच जपानमध्ये पोहोचला होता. परिस्थिती आणि सराव या सर्व बाबींचा विचार करता संघाने लवकरच तेथे दाखल होण्याचा निर्णय घेतला होता. भारतीय संघाने यजमान जपानविरुद्ध एक टी-२० सामनाही खेळला. मात्र, पावसामुळे हा सामना ५-५ षटकांचा झाला आणि भारताने तो जिंकला. आता आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय क्रिकेट संघ आपल्या अभियानाची सुरुवात अफगाणिस्तानविरुद्ध उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्याने करणार आहे. भारताने मागील आशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले होते. यंदाही भारतीय संघाचे लक्ष्य मागील कामगिरीची पुनरावृत्ती करण्याचे असेल.

अफगाणिस्तानची गट-अ मध्ये कामगिरी फारशी चांगली राहिलेली नाही. नेपाळविरुद्धच्या सामन्यात अफगाणिस्तानला ५ गडींनी पराभव स्वीकारावा लागला होता. गट-अ मध्ये अव्वल स्थान मिळवणाऱ्या नेपाळनेही उपांत्यपूर्व फेरीतील आपले स्थान निश्चित केले आहे. आता दि.२९ सप्टेंबरला नेपाळचा सामना श्रीलंकेशी होणार आहे. दरम्यान, उपांत्यपूर्व फेरीत पोहोचणाऱ्या आणखी दोन संघांचा निर्णय अद्याप झालेला नाही. गट-ब मधून या दोन संघांची निवड होईल. गट-ब मध्ये अव्वल स्थान मिळवणाऱ्या संघाचा सामना उपांत्यपूर्व फेरीत बांगलादेशशी, तर दुसऱ्या क्रमांकावर राहणाऱ्या संघाचा सामना पाकिस्तानशी होणार आहे.

# कबड्डीमध्ये भारताला आणखी एक सुवर्ण



**। नागोया । वृत्तसंस्था ।**

जपानमध्ये सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताच्या महिला कबड्डी संघा पाठोपाठ पुरूष कबड्डी संघानेही सुवर्ण कामगिरी केली आहे. सुवर्ण पदकाच्या लढतीत शनिवारी (दि.२६)भारतीय पुरुष संघाचा सामना बलाढ्य इराणशी झाला. यावेळी भारताने ४०-३४ असा विजय मिळवला आणि पुन्हा एकदा आपले वर्चस्व सिद्ध केले.

पहिल्या हाफच्या अंतिम क्षणी इराणने १८-१७ अशी छोटी आघाडी घेतली होती. दोन्ही संघ प्रत्येक पॉइंटसाठी प्रयत्न करताना दिसले, त्यामुळे हा एक अटीतटीचा सामना झाला. दुसऱ्या हाफच्या सुरूवातीला भारतीय खेळाडूंनी आपला ट्रॅक बदलला. भारताने आपल्या रणनीतीमध्ये बदल करत एक उत्कृष्ट पुनरागमन केले. अस्लम इनामदारच्या यशस्वी सुपर टॅकलने भारत सामन्यात परतला. इराणचा कर्णधार फझल अत्राचली आणि इतर खेळाडूंनी भारतावर एकामागोमाग हल्ले चढवले आणि पुन्हा आघाडी घेतली, मात्र भारतीय डिफेंडर्सने उल्लेखनीय कामगिरी करत पहिला ऑल आऊट केला आणि सामन्यात २९-२४ अशी आघाडी घेतली. सामना संपण्यास दोन मिनिटे शिल्लक असताना भारताने ७ गुणांची आघाडी घेतली होती. तेव्हाच भारताचा विजय निश्चित झाला.

# अजिंक्यपद निवड चाचणीला सुरूवात

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

नगर शिक्षण प्रसारक मंडळ संचालित, लोकमान्य गुरुकुल संकुल यांच्या सहकार्याने डोंबिवली(पूर्व) येथील एम.आय.डी.सी. सुदर्शन नगर येथे ठाणे जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेला सुरूवात झाली आहे.




या स्पर्धेतील ‘अ’ गटातील चुरशीच्या सामन्यात कल्याणच्या नव तरुण मंडळाने वाशीच्या रा.फ. नाईक संघाला ३०-२९ असे चकवित विजयी सलामी दिली. विश्रांतीला १०-१७ अशा पिछाडीवर पडलेल्या नव तरुणने विश्रांतीनंतर जोरदार मुसंडी मारत हा विजय खेचून आणला. डोंबिवलीच्या अश्वमेघ मंडळाने ‘ब’ गटात पहिल्या डावातील १५-२५ अशा १० गुणांच्या पिछाडीवरून कल्याणच्या ज्ञानशक्ती मंडळाला ३७-३२ असे नमविले. साई कृष्णाईने ‘क’ गटात माऊली स्पोर्ट्सला ३१३-१८ असे नमविले. ‘ग’ गटात स्व. राकेशदादा मंडळाने ज्ञानविकास मंडळावर ३१-२४ अशी मात केली. सुरुवातीच्या आक्रमक खेळाने राकेशदादाने पूर्वार्धात २३-०७ अशी भक्कम आघाडी घेतली होती. उत्तरार्धात ज्ञान विकासने खेळ गतिमान करीत ही लढत चूरशीची केली. रा.फ. नाईक संघाने ‘ल’ गटात मात्र संघर्ष मंडळाला २५-१८ असे नमवीत आगेकूच केली. प्रेरणा मंडळाने जय अंबे मंडळावर ३१-२६ अशी मात केली. हिरकणी स्पोर्ट्सने ‘ज’ गटात जिजाऊ मंडळावर १४-१२ असा विजय मिळविला.

# डीन एल्गरचा गोड शेवट

## अखेरच्या डावात अविस्मरणीय खेळी

**। कार्डिफ । वृत्तसंस्था ।**

दक्षिण आफ्रिकेच्या माजी कर्णधार डीन एल्गरने त्याच्या व्यावसायिक क्रिकेटमधील अखेरच्या डावात अविस्मरणीय खेळी केली आहे. कार्डिफ येथे एसेक्स आणि ग्लॅमॉर्गन यांच्यातील काउंटी चॅम्पियनशीप डिव्हिजन वन सामन्यावेळी एल्गरने आपला अखेरचा डाव खेळला. या स्पर्धेत तो एसेक्सकडून खेळला.



ग्लॅमॉर्गनने फॉलोऑन दिल्यानंतर एल्गरने एसेक्सच्या दुसऱ्या डावात १८१ चेंडूंत १५ चौकारांच्या सहाय्याने १०८ धावा केल्या. याबरोबर त्याने त्याच्या प्रथम श्रेणी कारकिर्दीतील ५७ वे शतक पूर्ण केले. एल्गरची प्रथम श्रेणी कारकिर्द पाहिली तर त्याने २८४ सामन्यांमध्ये ५७ शतक आणि ७७ अर्धशतके केली आहेत. त्याने ५७ वे शतक पूर्ण करताना ३८,६४१ चेंडूंचा सामना केला. एल्गरच्या या शतकी खेळीच्या जोरावर एसेक्सने तिसऱ्या दिवसाचा खेळ संपताना आपल्या दुसऱ्या डावात पाच गडी गमावत ३३१ धावा केल्या. तसेच, त्यांचा पहिला डाव १२९ धावसंख्येवरच संपुष्टात आला होता. त्यामध्ये एल्गरने केवळ २ धावा केल्या होत्या. या सामन्यात एसेक्सने नाणेफेक जिंकत ग्लॅमॉर्गनला प्रथम फलंदाजी करण्याचे आव्हान दिले होते. त्यांनी आसा ट्राईब आणि कीरन कार्लसन यांच्या शतकी खेळीमुळे सर्व गडी गमावत ५०५ धावसंख्येचा डोंगर उभारला. एल्गर हा एक फिरकी गोलंदाजही आहे. त्याने दक्षिण आफ्रिकेसाठी कसोटीमध्ये १५ आणि एकदिवसीयमध्ये २ बळी घेतले आहेत.

# कूपर कॉनोलीचा अफलातून झेल

**। सिडनी । वृत्तसंस्था ।**

ऑस्ट्रेलियाला दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात दक्षिण आफ्रिकेविरुद्ध पहिल्याच चेंडूवर यश मिळाले. यजमान आफ्रिका मालिकेत १-० अशा आघाडीवर असताना जोश हेझलवूडने त्यांना रविवारच्या सामन्यात धक्का दिला. कूपर कॉनोलीने अफलातून झेल घेताना एडन मार्करमाला गोल्डन डक्‍वर माघारी जाण्यास भाग पाडले. कॉनोलीचा टीपलेल्या अविश्वसनीय झेलचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे.



जोहान्सबर्ग येथील वॉन्डरर्स स्टेडियमवर एडन मार्करमला खाते उघडता आले नाही. प्लेइंग इलेव्हनमध्ये टोनी डी झोर्झीच्या जागी स्थान मिळालेल्या मार्करमला वेगवान गोलंदाज जोश हेझलवूडने सामन्याच्या पहिल्याच चेंडूवर शून्यावर बाद केले. मार्करम कूपर कॉनोलीच्या हाती झेलबाद झाला आणि त्याच्या नावावर नकोसा विक्रम नोंदवला गेला. डावाच्या पहिल्याच चेंडूवर बाद होणारा तो चौथा आफ्रिकन फलंदाज ठरला. तसेच, मार्करामचा बळी घेतल्यामुळे हेझलवूडला ऑस्ट्रेलियन गोलंदाजांच्या एका विशेष यादीत स्थान मिळाले. एकदिवसीय सामन्याच्या पहिल्याच चेंडूवर बळी घेणारा तो आठवा ऑस्ट्रेलियन खेळाडू ठरला.

# भारताला स्क्वॅशमध्ये दोन रौप्य

**। नागोया । वृत्तसंस्था ।**

आशियाई क्रीडा स्पर्धेत रविवारी (दि.२७) भारताला स्क्वॅशमध्ये १८ वर्षीय अनाहत सिंग आणि अभय सिंग यांनी दोन रौप्यपदके जिंकून दिली आहेत. मात्र, त्यांचे ऐतिहासिक सुवर्णपदके थोडक्यात हुकली. याशिवाय रविवारी भारताचे बॉक्सिंगमधील दोन पदकेही पक्की झाली आहेत. मात्र, बॅडमिंटनमधील आव्हान मात्र एकाच पदकासह संपले.



स्क्वॅशमध्ये पुरुषांच्या वैयक्तिक प्रकारात अभय सिंगने अंतिम सामन्यात स्थान मिळवून आधीच पदक पक्के केले होते. त्यामुळे तो रविवारी अंतिम फेरीत सुवर्णपदकासाठी मलेशियाच्या एनजी ईन यो विरुद्ध खेळला. मात्र, यो याने त्याला ९-११, ५-११, ५-११ अशा तीन सरळ गेममध्ये पराभूत केले. त्यामुळे यो याने सुवर्णपदक जिंकले आणि २०२८ ऑलिम्पिकसाठी थेट पात्रताही मिळवली. त्यामुळे अभयला मात्र रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. त्याच्यापाठोपाठ युवा अनाहतकडेही सर्वांचे लक्ष होते. अनाहतने यापूर्वी तिच्या खेळाने सर्वांनाच प्रभावित केले होते. तिने महिला वैयक्तिक प्रकारात अंतिम फेरीत धडक मारत पदक पक्के केले होते. त्यामुळे ती सुवर्णपदक जिंकून इतिहास घडवणार का, याकडे लक्ष होते. परंतु, तिलाही अंतिम सामन्यात मलेशियाच्याच शिवसंगारी सुब्रमण्यम हिने ४-११, ४-११,७-११ अशा सरळ तीन गेममध्ये पराभूत केले. अनाहतने झुंज दिली, परंतु शिवसंगारीने संपूर्ण सामन्यात तिला वरचढ होऊ न देता तिच्यावर वर्चस्व ठेवले. त्यामुळे शिवसंगारीने विजयासह सुवर्णपदक जिंकेल आणि २०२८ ऑलिम्पिकचे तिकीटही पक्के केले. तसेच, बॉक्सिंगमध्ये अंकुश पंघालने सर्वात आधी पदक पक्के केले. त्याने पुरुषांच्या ८० किलो वजनी गटात उपांत्यपूर्व फेरीत नेक्रुझ सलीमोव्ह याला पराभूत केले. त्यामुळे उपांत्य फेरीत धडक मारल्याने पदक पक्के झाले आहे. महिलांच्या ६५ किलो वजनी गटात परवीन हुडा हिने उपांत्यपूर्व फेरीत उझबेकिस्तानचा नवबखोर खामिदोवा हिला ५-० असं पराभूत करत उपांत्य फेरीत दणक्यात प्रवेश केला.

# नवी मुंबईच्या हरिताला कांस्य

**। नागोया । वृत्तसंस्था ।**

आशियाई क्रीडा स्पर्धेत रविवारी नवी मुंबईच्या हरिताने महिलांच्या २०० मीटर शर्यतीत कांस्यपदकाची कमाई करताना चीनी खेळाडूला कडवी टक्कर दिली. हरिता भद्रा, नवी दिल्लीत झालेल्या २०२६ च्या इंडियन ॲथलेटिक्स सिरीज फायनलमध्ये ११.२२ सेकंदांची ऐतिहासिक वेळ नोंदवून १०० मीटर शर्यत जिंकली आणि भारताची दुसरी सर्वात वेगवान महिला धावपटू बनली. तिने जपानमध्ये रविवारी २३.२० सेकंदाची वेळ नोंदवून २०० मीटर शर्यतीचे कांस्यपदक निश्चित केले. ०.०१ सेकंदाच्या फरकाने तिने जपानच्या एडो एबीगेईरुफुकाला चौथ्या स्थानावर समाधान मानण्यास भाग पाडले.

# इराणच्या खेळाडूंकडून नियमभंग हालचाली

**। नागोया । वृत्तसंस्था ।**

आशियाई क्रीडा स्पर्धेत महिला कबड्डी स्पर्धेचा अंतिम सामना चुरशीचा झाला. यावेळी भारताने ३७-३४ अशा फरकाने हा सामना जिंकला आणि सुवर्णपदक नावावर केले. या सामन्यात सामनाधिकाऱ्यांचे अनेक निर्णय भारताच्या विरुद्ध दिलेले पाहायला मिळाले आणि त्याचवेळी इराणच्या खेळाडूंकडून सरळसरळ नियमभंग हालचाली झाल्या, त्यावरून आयोजक अडचणीत येण्याची शक्यता बळावली आहे. सामना सुरू असताना इराणचे खेळाडू मोबाईलवर चित्रण करताना दिसले आणि नियमानुसार हे चुकीचे असल्याचे समालोचकांनी सांगितले. त्यांनी हा प्रकार उघडकीस आणला आणि आयोजकांना जाब विचारला.

## फिफा विश्वचषकात खेळलेल्या संघाला रोखले | ऑस्ट्रेलियातून आलेल्या खेळाडूचा भारतासाठी गोल

# भारतीय फुटबॉल संघाचा मोठा धमाका

**। बंगळूरू । वृत्तसंस्था ।**

भारतीय पुरुष फुटबॉल संघाचे वेळापत्रक सध्या अत्यंत व्यस्त आहे. शुक्रवारी (दि.२५) बंगळुरूच्या श्री कांतिरवा स्टेडियमवर झालेल्या आंतरराष्ट्रीय मैत्रीपूर्ण सामन्यात भारताने बलाढ्य पनामाला १-१ असे बरोबरीत रोखले. भारतासाठी हा निकाल अतिशय महत्त्वाचा आहे, कारण जागतिक क्रमवारीत भारत १३८ व्या स्थानावर आणि पनामा ४४ व्या स्थानावर आहे.

या संपूर्ण सामन्यादरम्यान भारतीय खेळाडूंनी जिद्द आणि आक्रमकता दाखवत अप्रतिम कामगिरी केली. सामन्याच्या सुरूवातीपासूनच पनामाने वर्चस्व राखण्याचा प्रयत्न केला, मात्र भारतीय डिफेंडर्सनी त्यांच अनेक हल्ले परतवून लावले. या सामन्यात पहिला गोल करून भारताने १-० अशी आघाडी घेतली होती. रायन विल्यम्सने ४१ व्या मिनिटाला पनामाच्या बचावफळीला चकमा देत हा गोल केला. भारताने ही ऐतिहासिक आघाडी पहिल्या हाफच्या शेवटपर्यंत टिकवून ठेवली. या सामन्यातील रायनचा गोल विशेष होता, कारण याआधी तो ऑस्ट्रेलियाकडून खेळला आहे. त्याची आई भारतीय असून तो २०२६ हंगामापासून भारताचे प्रतिनिधित्व करत आहे. तसेच, या सामन्याला भारताचा माजी कर्णधार आणि स्टार सुनील छेत्रीनेही हजेरी लावली होती.



दुसऱ्या हाफची सुरूवात झाली असता, पाहुण्या संघाने हल्ल्याची तीव्रता वाढवली. त्यांनी सतत गोल करण्याचे प्रयत्न करत भारतीय संघावरील दबाव वाढवला. अखेर त्यांना ६८ व्या मिनिटाला यश आले. ओमर व्हॅलेन्सियाने भारताचा गोलकीपर गुरप्रीत सिंग संधूला चकमा देत गोल करून सामना १-१ असा बरोबरीत केला. दोन्ही संघांनी नंतर पुन्हा आघाडी घेण्याचे प्रयत्न केले, मात्र सामना बरोबरीत संपला.

पनामा लोकसंख्येने छोटा देश असला, तरी आंतरराष्ट्रीय फुटबॉलमध्ये त्यांचा मोठा प्रभाव आहे. ते २०१८ आणि २०२६ च्या फिफा विश्वचषकासाठी पात्र ठरले होते. २०२६ च्या फिफा विश्वचषकात त्यांचा सामना इंग्लंड, क्रोएशिया आणि घानाशी झाला होता. तसेच ते २०२४-२५ च्या कॉनककॅफ नेशन्स लीगचे उपविजेते होते. आता पनामाचा सामना केल्यानंतर भारत कोलकाता येथे पाच वेळेचा विश्वविजेता ब्राझीलशी दोन हात करणार आहे. हा सामना ३ ऑक्टोबर रोजी खेळला जाणार आहे. त्यानंतर ६ ऑक्टोबर रोजी दोन वेळेचा विश्वविजेता उरुग्वेशी होणार आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)